
कमला
२००२
युद्ध
नको-
शांती
हवी !



**विजयी विश्व तिरंगा प्यारा !**
२६ जानेवारी २००२ प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव, शाखाप्रमुख व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी.



**"भवानीमहोत्सव"**
घटस्थापना समारंभप्रसंगी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी मा. श्री. राजगोपाल देवरा त्यांच्या सुविद्य पत्नी मा. सौ. माधवी आर. देवरा (कोल्हापूर विभाग आयकर कमिशनर) संस्थेचे पदाधिकारी व इतर मान्यवर.




**"कौतुक सोहळा"**
वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरु मा. डॉ. व्ही. एम. चव्हाण विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना.

ताराराणी विद्यापीठाच्या

# कमला महाविद्यालयाचे



## नियतकालिक

# कमला

२००१ - २००२

**अंक सतरावा**

# कमला

## २००१-२००२


**अध्यक्ष**

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रंगराव पाटील

**प्रमुख संपादिका**

सौ. नीता सतीश धुमाळ

**विभागीय संपादक**

- मराठी विभाग ................ श्री. एच. व्ही. पुजारी
- हिंदी विभाग .................. डॉ. श्रीमती भारती शेळके
- इंग्रजी विभाग ................ श्री. जे. बी. पाटील
- संपादक सहाय्यक ............ श्री. ए. एम. साळोखे,
  श्री. ए. एस्. घस्ते
- विद्यार्थिनी प्रतिनिधी .......... कु. छाया गुंडद, बी. ए. भाग-३


*या अंकात प्रसिद्ध (व्यक्त) झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# रणरागिणीस अभिवादन



## युगस्त्री छत्रपती ताराराणी

'झळकती ही इतिहासाची
सोनेरी पाने,
महाप्रतापी ताराराणी
शौर्याचे लेणे'

# स्नेहसुधेची अमृतधार



**कै. सौ. काकीजी**

**तथा**

**सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील**

दिव्यत्वाची जेथे प्रचिती
तेथे कर माझे जुळती



**कै. मा. काकाजी**

**तथा**

**डॉ. व्ही. टी. पाटील**

# प्रेरणास्त्रोत



**प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील**

**एम. ए. पीएच.डी.**

# संपादकीय...

कमला २००१-२००२ चा सतरावा वैविध्यपूर्ण अंक सादर करत असताना आम्हास अतिशय आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'कमला' चा अंक दर्जेदार करण्यासाठी संपादक मंडळाने प्रामाणिक प्रयत्न केलेले आहेत.

११ सप्टेंबर २००१ या तारखेने दहशतवादावर जागतिक पातळीवर शिक्कामोर्तब केले. गेली वीस वर्षे भारत हा दहशतवाद सहन करत आहे. हा भारताचा नाकर्तेपणा निश्चितच नव्हता. आदर्शांचा-नीतिमत्तेचा वारसा जपणाऱ्या भारताने अतिरेकी धोरण कधीच स्वीकारले नाही पण वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्याने सर्वजण खडबडून जागे झाले. महाशक्तीवरील हल्ल्याने सर्वांना चांगलाच हादरा बसला, आणि हे निश्चित झाले की कुणीही 'सुरक्षित' नाही. सर्वांनी एकमुखाने दहशतवादाविरूद्ध संघर्ष करण्याचा नारा पुकारला. काही धर्मांधांच्या मनमानीसाठी सर्व जगभरातल्या निष्पापांना शिक्षा कुठवर देणार ? दहशतवाद थोपविण्यासाठी एक निर्णायक पाऊल उचलण्याची गरज आज सर्वच राष्ट्रांना आहे. सर्वसामान्यांना युद्ध नको, शांती हवी आहे हेच 'कमला २००२' च्या मुखपृष्ठातून अभिव्यक्त होत आहे.

चालू वर्ष 'महिला सबलीकरण' वर्ष म्हणून घोषित झाले. वृत्तपत्रांमध्ये सविस्तर चर्चा झडल्या, आजवर स्त्रियांना सक्षम बनविण्यासाठी अनेक योजना घोषित झाल्या परंतु प्रत्यक्षात या सर्व योजना तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. ह्या पार्श्वभूमीवर कमला महाविद्यालयाचे योगदान निश्चितच कौतुकास्पद आहे. महाविद्यालयाने सातत्याने विद्यार्थिनींना सबल, सक्षम बनविण्याकरिता सजगतेने पावले उचललेली आहेत. क्रीडा, एन.एस्.एस्., एन.सी.सी. या क्षेत्रात महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी कौतुकास्पद कामगिरी बजावलेली आहे. काळाची गरज ओळखून इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी हा विषय अकरावीपासून सुरू केलेला आहे. कॉम्प्युटर विभाग, व्यवसायाभिमुख शिक्षण विभाग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास विभाग, वक्तृत्व व निबंध लेखन समिती, गुंजारव भित्तीपत्रक व इतर विभाग विद्यार्थिनींचा परिपूर्ण व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणण्यास अचूकपणे मार्गदर्शन करीत आहेत.

## कमलाची उत्तुंग झेप

कै. मा. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजींनी सन १९४५ साली ताराराणी विद्यापीठाची स्थापना करून स्त्री-शिक्षण क्षेत्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. महाराणी ताराराणीप्रमाणे या विद्यापीठातून आत्मविश्वासपूर्ण तेजस्वी प्रतिताराराणी घडाव्यात म्हणून 'ताराराणी विद्यापीठ' असे अत्यंत संयुक्तिक नामाभिधान करण्यात आले. संस्थेचा मानबिंदू ठरलेल्या 'कमला महाविद्यालयाची' स्थापना १९८४ साली कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजींच्या असीम त्यागातून झाली. मांगल्याची, स्नेहसुधेची साक्षात अमृतधार असणाऱ्या काकीजींचे नाव या महाविद्यालयास प्रदान करण्यात आले. मा. काकाजी व मा. काकीजींच्या उदात्त विचारांना मूर्तरूप देण्याचे कार्य अव्याहतपणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रंगराव पाटील करीत आहेत. मा. प्राचार्यांची प्रशासकीय दूरदृष्टी, उत्कृष्टतेचा ध्यास व शिस्तबद्धतेने कमला महाविद्यालयाच्या यशाचा आलेख उंचावला आहे. महाविद्यालयाच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढही लक्षणीय ठरली आहे.

## संख्यात्मक वाढ

- कनिष्ठ विभाग ८४८ विद्यार्थिनी
- वरिष्ठ विभाग ८२३ विद्यार्थिनी

## शिक्षण क्षेत्रातील नेत्रदीपक यश

सन २०००-२००१ चे उच्च गुणवत्ता सिद्ध करणारे निकाल

- बारावी कला ९७%
- बारावी वाणिज्य ९६.११%
- बारावी शास्त्र ९६%
- प्रथम वर्ष वाणिज्य ८३.१६%
- प्रथम वर्ष कला ९६.३३%
- द्वितीय वर्ष वाणिज्य ९३.४२%
- द्वितीय वर्ष कला ९७.८५%
- तृतीय वर्ष वाणिज्य ८८.४६%
- तृतीय वर्ष कला ८९.४७%

पदवी विभागात ४ विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य प्राप्त केले तर ५२ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

### कला विभाग प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी

- अर्थशास्त्र स्पेशल १७
- इंग्रजी स्पेशल ६
- हिंदी स्पेशल १०
- समाजशास्त्र स्पेशल ५
- होमसायन्स स्पेशल २

### वाणिज्य विभाग प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी

- ॲडव्हान्स अकौंट अँड ऑडिटिंग १०
- ऑफिस मॅनेजमेंट २

## कौतुकास्पद यश

मार्च २००१ परीक्षेत कोल्हापूर विभागीय मंडळात कु. कविता पांडुरंग जाधव हिने सहकार विषयात प्रथम क्रमांक मिळवला. कु. जानका मल्लाप्पा गडगे ११ वी विज्ञान हिने राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त केली.

## 'कमला २००१' नियतकालिकाचे नेत्रदीपक यश

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कमला नियतकालिकाने पारितोषिके मिळवण्याची परंपरा टिकवून ठेवली. सन २०००-२००१ या वर्षी शिवाजी विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत कमला नियतकालीकातील साहित्यास खालील पारितोषिके मिळाली.

- Republic Day 2001 (इंग्रजी कविता) कु. सीमा गावडे कला भाग ३ - प्रथम क्रमांक
- Who Is This Veerappan Anyway ! (इंग्रजी वैचारिक लेख) ज्योत्स्ना मुद्राळे, कला भाग ३-तृतीय क्रमांक
- सुहाना सफर (हिंदी प्रवास वर्णन) कु. सुजाता कागलकर कला भाग-२ -प्रथम क्रमांक
- मराठीच्या माजघरातील शीतल ज्योत मालवली (मराठी साहित्य समीक्षा) कु. स्वाती चिटणीस कला भाग २- द्वितीय क्रमांक

## राष्ट्रीय छात्र सेनेची आघाडी

छात्रसैनिकांची घोडदौड याही वर्षी लक्षणीय ठरली. एन्. सी. सी. कोल्हापूर ग्रुपने आयोजित केलेल्या आर.डी.कँपमध्ये सहभागी झालेल्या कॅडेटस्ना बक्षीस वितरणाचा कार्यक्रम, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. एम्. जी. ताकवले यांच्या हस्ते संपन्न

झाला. त्यात कु. चंदा नलवडे हिला थल सैनिक कँपमध्ये महाराष्ट्र संघातून निवड झालेबद्दल विशेष पुरस्कार मिळाला.

यावर्षीची विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे शाहू स्टेडियम येथे संपन्न झालेल्या प्रजासत्ताक दिन २००२ निमित्त आयोजित संचलनामध्ये कमला महाविद्यालयाची एन्.सी.सी. तुकडी सहभागी झाली होती. 'सी' सर्टिफिकेट परीक्षेसाठी ७ कॅडेटस् व 'बी' सर्टिफिकेटसाठी २० कॅडेटसूनी परीक्षा दिली.

## क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय बाबी

पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय मुष्ठीयुद्ध स्पर्धेत कु. रूपा सुतार कु. रोमा सावंत व कु. स्वाती पाटील यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. अश्वमेध स्पर्धा व आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत कु. कविता डोईफोडे सहभागी झाली तर बास्केटबॉल संघामध्ये कु. क्षमा पाटील सहभागी झाली.

## माजी विद्यार्थिनी संघ

महाविद्यालयातून पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींशी ऋणानुबंध टिकवून ठेवण्यासाठी तसेच त्या विद्यार्थिनींशी स्नेह वृद्धींगत करण्यासाठी 'माजी विद्यार्थिनी संघाची' स्थापना यावर्षी होत आहे. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. 'कमला' परिवाराशी या विद्यार्थिनी सदैव जोडल्या जातील.

## ऋणनिर्देश

सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाने विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध उपक्रम राबवून उच्च अभिरूची संपन्नता सिद्ध केली. या उपक्रमांचा आढावा 'कमला २००२' मध्ये घेण्यात आलेला आहे. 'कमला'चा अंक बहारदार करण्यासाठी साहित्यिक विद्यार्थिनींचे योगदान कौतुकास्पद आहे. मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन अंक वेळेत पूर्ण करण्यास बहुमोल ठरले आहे त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार ! विभागीय संपादक प्रा. श्री. एच्. व्ही. पुजारी (मराठी), प्रा. डॉ. सौ. भारती शेळके (हिंदी), तसेच प्रा. श्री. जे. बी. पाटील (इंग्रजी) यांनी आपले विभाग बहारदार बनवले आहेत. मराठी विभागाचे प्रा. श्री. एस. बी. पाटील व शिक्षकेतर कर्मचारी श्री. वाय. बी. निवळे यांचेही सहकार्य मोलाचे आहे. त्यांचे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बहुमोल सहकार्य 'कमला'चा अंक सजविताना लाभले त्याबद्दल त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

राजहंस प्रिंटिंग प्रेसचे श्री. अशोक कुलकर्णी यांनी निर्दोष व नाविन्यपूर्ण छपाई केलेबद्दल त्यांचेही आभार. नियतकालिकाचा चेहरा म्हणजे मुखपृष्ठ, ते जास्तीत जास्त संयुक्तिक बनविणे गरजेचे आहे. कु. माला पाथरे यांनी अत्यंत सूचक मुखपृष्ठ केल्याबद्दल त्यांचेही आभार !

'कमला'च्या अंकात काही उणिवा राहिल्या असतील तर त्या माझ्या मर्यादा समजाव्यात.

**सौ. नीता सतीश धुमाळ**
प्रमुख संपादिका



# भावपूर्ण श्रद्धांजली

- **सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील,** ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष श्री. रंगरावदादा पाटील यांच्या पत्नी व मा. प्राचार्यांच्या मातोश्री.
- **निखिल इंदुलकर,** प्रा. श्रीमती यु. डी. इंदूलकर यांचे चिरंजीव.
- **श्री. विठ्ठल रतनजी इंगवले,** कनिष्ठ लिपिक श्री. राजेंद्र इंगवले यांचे वडील.
- **श्री. दादू नरसू पाटील,** प्रा. श्री. जे. बी. पाटील यांचे कनिष्ठ बंधू.
- **श्री. बाबुराव बळवंत कोले,** शिपाई श्री. डी. बी. कोले यांचे वडील.
- **श्रीमती आनंदीबाई आत्माराम यादव,** प्रा. श्रीमती एस्. ए. पाटील यांच्या मातोश्री.
- **श्री. बाळू गोपाळ शिंदे,** कनिष्ठ लिपिक श्री. एस. बी. शिंदे यांचे वडील.
- **श्रीमती भगीरथीबाई तांबट,** कोल्हापूरच्या ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक.
- **ज्येष्ठ साहित्यकार श्री. व्यंकटेश माडगूळकर.**
- **लोकप्रिय कथाकार श्री. व. पू. काळे.**
- ज्येष्ठ भारतीय शास्त्रोक्त संगीत गायिका व अभिनेत्री **श्रीमती ज्योत्स्ना भोळे**
- काँग्रेस नेते **श्री. माधवराव शिंदे.**
- ज्येष्ठ बालकुमार साहित्यिक **श्री. रामचंद्र वासुदेव तथा रा. वा. शेवडे (गुरुजी).**
- हिंदी चित्रपटसृष्टीचे पितामह 'दादामुनी' **श्री. अशोककुमार.**
- राजहंस प्रिंटिंग प्रेसचे संस्थापक, महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे माजी अध्यक्ष **श्री. श्रीपाद सीताराम गोसावी.**
- ज्येष्ठ अभिनेत्री **श्रीमती लिलाबाई भालजी पेंढारकर तथा माई पेंढारकर.**
- हिंदी चित्रपटसृष्टीतील अलबेला, नामवंत अभिनेते, निर्माता दिग्दर्शक **मास्टर भगवान.**
- ज्येष्ठ समाजवादी नेत्या **श्रीमती प्रमिला दंडवते.**
- लोकसभेचे सभापती **श्री. जी. एम. सी. बालयोगी.**
- ज्येष्ठ कादंबरीकार **प्रा. श्री. देवदत्त पाटील.**
- राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय चिटणीस, माजी राज्यमंत्री व ज्येष्ठ हिंदी पत्रकार, साहित्यकार **डॉ. राममनोहर त्रिपाठी**



पुस्तकाचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे.
पुस्तके व्यक्तीला घडवीत असतात.
त्यांच्या माध्यमातूनच व्यक्ती समाजाकडे
बघत असते. कारण पुस्तकांतून व्यक्तीला
विविध प्रकारची माहिती मिळते.

- तणकटकार-राजन गवस

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त

# मराठी विभाग

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


- एक उपेक्षित आणि शापित वाङ्मय सेवक (वैचारिक लेख) - कु. धनश्री कांबळे
- माणदेशी मोठा माणूस : व्यंकटेश माडगूळकर (प्रासंगिक लेख) - कु. वर्षा सुर्यवंशी
- अस्तित्व (कथा) - कु. प्राजक्ता कणबर्गी
- वपु आणि वपुच (वैचारिक लेख) - कु. भक्ती कुलकर्णी
- फुले कर्मवीरांच्या वारसदार : कै. कल्पनादेवी पाटील (सामाजिक लेख) - कु. दर्शना आड
- मराठीतील रोमँटिक काव्यप्रतिभा अविष्कार - कु. रुपाली टोमके
- न्हाय मी शाळतं जानारंच हाय ! (ग्रामीण एकांकिका) - कु. वसुंधरा इंचनाळे
- दहशतवाद (वैचारिक लेख) - कु. दिपाली पाटील
- वेरुळची जगप्रसिद्ध लेणी (ललित लेख) - कु. पुजा जोशी
- संगीत रंगभूमीवरील जोत्स्ना निमाली (प्रासंगिक लेख) - कु. तेजस्विनी चिमणे
- तणकटकार : राजन गवस (वैचारिक लेख) - कु. नीता कांबळे
- जीवनाचा खरा अर्थ (वैचारिक लेख) - कु. अनिता घाटगे


## पद्य विभाग


- आई - कु. मंगल कुंभार
- सूर - कु. मंगल कुंभार
- मन - कु. अश्विनी जाखले
- सांग पाखरा - कु. माया नवाळे
- कळी - कु. माया नवाळे
- आजची स्त्री - कु. सीमा कांबळे
- ज्योत - कु. माधुरी सांगावकर
- व्यथा बालकामगाराची - कु. राजलक्ष्मी चव्हाण
- गीता - कु. निवेदिता गांवकर
- व्यथा मनाची - कु. सुचिता घोरपडे
- प्रेमात महत्त्व फुलांना - कु. सुचिता घोरपडे
- आई - कु. पद्मिनी शिंदे
- प्राण्यांची शाळा - कु. माधुरी आयरेकर
- कोकिळेची शाळा - कु. माधुरी आयरेकर
- मला - कु. कल्पना जाधव



# एक उपेक्षित आणि शापित वाङ्मय सेवक

कु. धनश्री कांबळे - बी. ए. भाग-२

प्रख्यात वैदर्भीय ग्रामीण लेखक आणि वैदर्भीय बोलीला सर्वप्रथम मराठी साहित्यात मानाचं स्थान मिळवून देणारे 'धग'कार उद्धव शेळकेंची मराठी साहित्य क्षेत्रातील मौलिक कामगिरी पाहता, व्यक्ती आणि वाङ्मय या दोन्ही पातळीवर आलेल्या उपेक्षितपणावर एक दृष्टिक्षेप....

मराठी साहित्यात वैदर्भीय ग्रामीण जीवनाला ग्रामीण साहित्यातून वैदर्भीय प्रादेशिकतेची नवी दृष्टी देणारे आणि वैदर्भीय प्रादेशिकतेला नागर आणि ग्रामीण अशा दोन्हीही पातळीवर साहित्यातून मूल्यगर्भता प्राप्त करून देणारे उद्धव शेळके आधुनिक मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे ग्रामीणसिद्ध हस्तलेखक होते.

उद्धव शेळके यांनी १९५५ नंतर सर्वच वाङ्मय प्रकारात विविध आणि विपुल स्वरूपाचे लेखन केले आहे. समाजातील वेगवेगळ्या स्तरांतील माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तींचा घेतलेला शोध, जीवन जगण्यासाठी चाललेला संघर्ष, गरिबीने ग्रामीण समाज कसा पिळून गेलेला आहे याचे वास्तव चित्रण ग्रामीण आणि नागर अशा दोन्ही पातळीवर शेळके यांनी आपल्या समग्र साहित्यातून घडविले आहे. त्यामुळे 'जीवनाचा शोध' घेत वास्तवतेच्या जवळ जाणारे उद्धव शेळके यांचे साहित्य आहे, तर 'धग' १९६० ही ''कठोर वास्तवाचे कलात्मक रूप आविष्कृत करणारी मराठीतील पहिली कादंबरी आहे'' असे मत म. सु. पाटील यांनी मांडले आहे. 'धग' मराठी कादंबरीच्या इतिहासातील एक क्रांतीदर्शी कादंबरी म्हणून ओळखली जाते. उद्धव शेळके यांनी सर्वच वाङ्मय प्रकारात लेखन करून दीडशतकभर साहित्यकृतीचे एवढे विपुल आणि विविधस्पर्शी लेखन केले आहे. तथापि त्यांचे साहित्य समीक्षक, अभ्यासकांचा अभ्यासविषय होण्याची आवश्यकता होती. पण त्याची दखल घेतली नाही.

१९५६ मध्ये 'नांदतंघर' या कादंबरीने शेळक्यांनी साहित्यक्षेत्रात पदार्पण केल्यानंतर 'धग', 'अगतिका', 'बाई विना बुवा', 'साहेब' 'खंजिरीचे बोल', 'डाळिंबाचे दाणे,', 'लेडिज होस्टेल' इत्यादी कादंबऱ्या आणि 'शिळान', 'वानगी', 'घुसळण' या कथासंग्रहाने व 'पोहा चालला महादेवा' या नाटकाने उद्धव शेळकेंना साहित्यिक म्हणून प्रतिष्ठा मिळाली.

प्रारंभी शेळक्यांनी शिळान, वानगी, घुसळण, कथावली, हिरवी झुळुक इत्यादि कथासंग्रहातून ग्रामीण जीवनातील दुःख, अज्ञान, दारिद्र्य, पिळवणूक यांचे वास्तव दर्शन, जगण्यासाठी सामाजिक व आर्थिक विषमतेशी चाललेला संघर्ष, ग्रामीण लोकांच्या वृत्ती आणि प्रवृत्ती, दैवाधीनता आणि नियतीशरणता यांनी खालावलेल्या माणसांचे नाट्यमय चित्रण शेळक्यांच्या प्रतिभाशक्तीची जाणीव करून देणारे आहे. वैदर्भीय बोलीला मूल्यगर्भता प्राप्त करून देणारे आहे. त्यामुळे सूर्यकांत खांडेकर यांनी उद्धव शेळकेंच्या रूपाने ''विदर्भाचे वेगळे काही ग्रामीण साहित्यात मांडले जात आहे'' याची साहित्यिकांना, अभ्यासकांना जाणीव करून दिली होती.

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांचं आकर्षण शेळकेंना होते. या आकर्षणातूनच त्यांनी मानवी जीवनाचा शोध नागर आणि ग्रामीण अशा दोन्हीही पातळीवर घेतलेला आहे. 'धग'मधून देशी भावनाशीलतेचा अपूर्व आविष्कार घडविला. मानव व मानवी जीवन अपूर्ण आहे-ही अपूर्णता जातीयता, संस्कृती,



सामाजिक, आर्थिक विषमता यांचे दर्शन अगतिका, असा उधळतो डाव, गर्विता डाळिंबाचे दाणे, आडवाट इत्यादी कादंबऱ्यातून घडविले आहे. तर मन:पूत, साहेब, खंजिरीचे बोल इत्यादि चरित्रात्मक कादंबरीद्वारे सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींच्या जीवनाचा शोध घेतला आहे. व्यक्तिवादी आशयसूत्रातून सामाजिक वास्तव, अवास्तवाची उभारणी करून समाजातील वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन लेडिज होस्टेल, हव्यास, डाग, पुनर्मीलन, ध्यास, नृत्यांगना अशा अनेक रितीनिष्ठ कादंबऱ्यातून केले आहे.

प्रारंभी गंभीर स्वरूपाचे लेखन करणाऱ्या उद्धव शेळके यांनी जीवनातील अस्थिर अवस्थेमुळे नंतरच्या काळात उपजीविकेसाठी साहित्याला साधन मानले. प्रश्न जगण्याचा होता. लेखनाखेरीज जगण्यासाठी जवळ काहीच नव्हते. सर्वसामान्य माणसांनाही ज्या गोष्टी सहजासहजी मिळतात त्याच गोष्टी शेळके यांना मिळविण्यासाठी अथक परिश्रम करावे लागले. या तडजोडी करताना सर्जनशील लेखकांना ज्या व्यथा वेदना होतात त्याप्रकारच्या जीवघेण्या स्वरूपाच्या वेदना शेळकेंना होत होत्या. त्याचवेळी लेखन हा उपजीविकेचा मार्ग होऊ शकत नाही, असा सल्ला देणारे कित्येक त्यांना भेटले. त्यांनी पुढे त्यांच्या वर्मावरंच बोट ठेवले.

प्रत्येक बाबतीत शेळक्यांची उपेक्षाच होत राहिली. 'किशोर' मासिकाच्या संपादक पदासाठी सेवाज्येष्ठता असूनही त्यांना डावलले गेले. रॉक फॉलर फोर्ड, फौंडेशनने जाहीर केलेल्या अभ्यासवृत्तीच्या वेळी अंतिम फेरीत निवड होऊनही एकच कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाला शिष्यवृत्ती दिली गेली. 'धग' कादंबरीचे सर्वत्र कौतुक झाल्यानंतर त्याचवेळी सत्काराच्या शाली त्यांच्या खांद्यावर पाहिजे होत्या. पण शेवटच्या वेळी झालेला सत्कार. तसेच जीवनाच्या उत्तरार्धात 'इर्विन' सारख्या खाजगी दवाखान्यात जनरल वार्डमध्ये अक्षरश: मरणप्राय यातना भोगत असताना स्थानिक लोकप्रतिनिधींचे झालेले दुर्लक्ष इत्यादी घटना प्रसंगातून शेळक्यांच्या वाट्याला आलेले उपेक्षितपण दुर्दैवी स्वरूपाचे आहेच, शिवाय त्यांच्या साहित्यालाही उपेक्षितच रहावे लागले.

'शिळान' १९५८ या कथासंग्रहाला ज्यावेळी राज्य शासनाचे पारितोषिक मिळाले त्याचवेळी 'मले-तुले' हे साहित्य होते काय ? अशी त्यांच्या साहित्याची बोळवण झाली. त्याच कोल्हापूर-सांगलीकडील ग्रामीण लेखक 'पावणं व्होत नव्होत', कोकणातील 'माका तुका' लिहितात ते साहित्य होऊ शकते. पण 'मले-तुले' हे साहित्य का होऊ शकत नाही ? लेखन ही एक अधुरी विद्या आहे. काय लिहावं काय लिहू नये ज्याला कळते तोच खरा लेखक असतो. याची पूर्ण जाणीव शेळक्यांच्या संवेदनशील आणि सर्जनशील साहित्यिक मनाला होतीच. परंतु पूर्वीचे शेळके राहिले नाहीत ! बाजारू लेखक ! लैंगिक, रंजनप्रधान कादंबरीचे लेखन करणारा लेखक असे म्हणून त्यांच्या साहित्याची दुर्दैवी स्वरूपाची बोळवण केली. त्यांच्या साहित्यकृतीला अयोग्य असणारे आरोप केले. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याबाबत जे झाले तेच शेळके यांचेही बाबतीत झाले. पण मराठी साहित्यात प्रारंभी गंभीर रूप धारण करणाऱ्या लेखकांची लेखणी वास्तवतेपासून शबलीत का होते ? मराठीत याची कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. त्यासाठी साहित्यिकांनी, समीक्षकांनी आपला पूर्वग्रह दूषितदृष्टिकोन दूर ठेवून, पूर्ववत भूमिका बदलून समीक्षकांची चिकित्सक वृत्ती धारण केली पाहिजे. तरच उद्धव शेळके, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याला योग्य न्याय मिळू शकेल.

★☆★☆

## चारोळी

चाफा नी मोगरा तुला
फार फार आवडायचा
तुझ्या विरहाने
तो देखील कोमेजून जायचा





# माणदेशी मोठा माणूस : व्यंकटेश माडगूळकर

कु. वर्षा सूर्यवंशी - बी. ए. भाग-२

विसाव्या शतकातील 'व्यंकटेश माडगूळकर' हा एक आधुनिक चमत्कार होता. मराठी साहित्यविश्वातील एक दिग्गज ग्रामीण साहित्यिक आणि अजोड प्रतिभेचे पंख लाभलेला, साहित्यातून माणदेशी खानदानी जपणारा एक प्रतिभावंत साहित्यिक होताच. शिवाय स्वत:लाच स्वत:च्या लेखणीतून घडविणारा एक साहित्यिक चमत्कारही होता. लेखकाचा प्रकृतिधर्म, जीवनानुभवाचा आशय आणि अभिव्यक्तींच्या पातळीवरील अपूर्व संयोग माडगूळकर सारख्या क्वचितच लेखकांच्या साहित्यातून पहावयास मिळतो. माडगूळकरांच्या ठायी उपजत अशी अभिजात साहित्यसमज होती. त्या आधारे मानवासह समग्र प्रकृतीच्या रूपाच्या विविधरंगी आविष्काराने मराठी साहित्याला समृद्ध केले. मराठी साहित्यामध्ये एक नवेच शाश्वत निर्माण केले. स्वत:ची एक चिरस्थायी मुद्रा उमटविली.

व्यंकटेश माडगूळकरांचा जन्म बोर-बाभळीच्या माणदेशातील 'माडगूळ' या गावी झाला. घरची परिस्थिती बेताचीच. मोठा भाऊ गजानन धूळधपाटीवर लिहिण्यास शिकलेला. मात्र धाकट्या व्यंकटेशला त्यांनी शाळेत जाऊन सरस्वती पूजन करण्यास शिकविले. अशा दुष्काळी माणदेशात कुटुंबाला जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या भटकंतीमुळे व्यंकटेश माडगूळकरांच्या शालेय शिक्षणाची आबाळ होत होती. शाळा बुडवायची आणि दिवसभर बालमित्रांसोबत रानोमाळ भटकायचे, झाडा झुडपांवरचा रानमेवा खायचा. खेकडी, सशाच्या छोट्या शिकारी करायच्या असा त्यांचा नित्यक्रम झाला होता. तथापि पुढे इंग्रजी सहावीपर्यंतच त्यांचा शाळेशी संबंध आला.

बालपणापासूनच शिकारीच्या नादाने माडगूळकरांचा माणदेशी झाडा-झुडपांशी अद्भूत कीटकसृष्टीशी, वन्य प्राण्यांशी, ऊन-पावसाशी परिचय झाला. कोरडवाहू माणदेशात जगण्यासाठी झगडणाऱ्या आणि त्या झगड्यात हरणाऱ्या माणसांचे दर्शन झाले. त्यातून माणसाची भूक आणि त्याची विजीगिषी व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीला कसा रंग, रूप, आकार देते याचीही त्यांना जाणीव झाली. तेव्हाच माणदेशी माणूस आणि निसर्ग यांच्यातील अतूट नात्याचे हे संबंध आपल्या साहित्य निर्मितीचे केंद्र आहे या आंतरिक ऊर्मीतूनच व्यंकटेश माडगूळकरांच्या मधील प्रतिभावंत साहित्यिक जागृत झाला.

माडगूळकरांचा साहित्यिक प्रवास हा कथा लेखनाने झाला. माणदेशी माणूस आणि निसर्ग यांच्यातील उत्कट नातेसंबंधाच्या जीवनानुभवातून त्यांची लेखणी सरसावली. ती माणदेशी रूक्ष व वैराण निसर्गाशी झुंज देत जगणारी, निरनिराळ्या जाती जमातीतील वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तींची माणसे माडगूळकरांच्या एकजीव रसायनातून 'माणदेशी माणसं' कथासंग्रहातून साकार झाली. त्यानंतर माणदेशी दुष्काळ, सुख-दु:खाने रंजलेला-गांजलेला माणदेशी माणूस, 'वारी', 'गावाकडच्या गोष्टी', 'हस्ताचा पाऊस', 'उंबरठा', 'काळी आई' इत्यादि कथासंग्रहातून अस्सल माणदेशी माणूस उभा केला. माणदेशी जीवनातील विविध रंग व विविध ढंग तिने कलात्मकतेने टिपून घेतले आहेत. सहज, सुंदर भाषाशैलीमुळे कथेला विलक्षण जिवंतपणा लाभला. कथानकाला कथेचा घाट प्राप्त करून दिला. समाजातील वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तींच्या वास्तव आणि उठावदार



व्यक्तिरेखा निर्माण केल्या. कथेच्या केवळ अंतरंगातच नव्हे, तर बाह्यरंगामध्येही परिवर्तन घडवून आणले. त्यामुळे ''अंतरीच्या उमाळ्यानी चिंब होऊन शब्दरूप झालेली माणसे मराठी कथाविश्वाला माडगूळकरांनी अमोल लेणं म्हणून बहाल केली आहेत'' असे माडगूळकरांच्या प्रतिभेचे सामर्थ्य उलगडून दाखविणारे उद्‌गार प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी काढले आहेत.

नवकथा घडविणाऱ्या बिनीच्या कथाकारांत स्थान मिळविल्यानंतर व्यापक अनुभवाच्या आविष्कारासाठी माडगूळकर कादंबरी लेखनाकडे वळले आणि १९५० मध्ये 'पुढचं पाऊल' ही पहिली कादंबरी 'किसना' या दलित कलावंताच्या कथावर्णनाने साकारली. तर १९५५ च्या बनगरवाडीने मराठी कादंबरीच्या इतिहासामध्ये प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. मराठी कादंबरीत सर्वप्रथम निसर्गाश्रित जीवन जगणाऱ्या मानवसमूहाचे चित्रण घडून आले. या कादंबरीच्या स्वयंपूर्णतेबाबत डॉ. रविंद्र ठाकूर म्हणतात, ''बनगरवाडीचे स्वयंभूपण एवढे अबाधित होते की, तिच्यावर कोणत्याही अनुकरणाचा ठपका ठेवणे अन्यायकारक होते.'' एवढं स्वतंत्रपण बनगरवाडीला लाभले होते. एकंदरीत मराठी कादंबरी इतिहासामध्ये बनगरवाडी अनेक दृष्टीने मैलाचा दगड ठरली. तिच्या अस्सल आणि ऐतिहासिक कलात्मकतेने पुढे 'पाचोळा', 'गोतावळा' सारख्या कादंबऱ्या निर्माण झाल्या. तर जीवनानुभवाचा आविष्कार 'वावटळ', 'करूणाष्टक', 'कोवळे दिवस' या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांद्वारे घडविला आहे. पण माणसाच्या सत्तांतराची कथा सांगणारी, आणि साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणारी 'सत्तांतर' ही कादंबरी भारतातील प्रमुख बावीस भाषेत भाषांतर होण्याचा बहुमानप्राप्त ठरली. तर बनगरवाडी डैनिश, फ्रेंच, जर्मन इ. भाषांबरोबर इंग्रजीत 'व्हिलेज हॅड नो वॉल्स' नावाने लोकप्रिय झाली.

निसर्गाच्या सान्निध्यात आणि ग्रामीण जीवनाच्या विद्यापीठात शिकलेल्या व्यंकटेश माडगूळकर यांनी पुणे, पणजी, मुंबई आकाशवाणीबरोबर वृत्तपत्रातील वाङ्‌मयीन लेखनाला गुणवत्ता प्राप्त करून दिली. शहरामध्ये राहूनही त्यांनी 'तू वेडा कुंभार, 'सती', 'पती गेले ग काठेवाडी', 'मुक्काम पोष्ट ढेपेवाडी' इत्यादि ग्रामीण नाट्यलेखन केले. 'संत नामदेव' चित्रपटाचे कथानक लिहिले.

पूर्वायुष्यात रस्त्यावरील मैलाचे दगड, हॉटेलच्या पाट्या रंगवीत माडगूळकर फिरले. ऐन तारूण्यात मेंढपाळीचा व्यवसाय केला. त्यावेळी माणूस आणि निसर्ग यांच्या आंतरिक नात्याचा जो एक संस्कार त्यांच्या संवेदनशील अबोध मनावर झाला त्या आंतरिक व्यासंगातून ग्रामीण साहित्याचा एक ओजस्वी आविष्कार त्यांच्या कलाकृतीतून साकार झाला. सहज सुंदर भाषाशैलीमुळे त्यांच्या समग्र साहित्याला कलात्मक आणि गुणात्मक उंची प्राप्त झाली. त्यामुळेच त्यांच्या कथेला केवळ गोष्ट किंवा हकीकत असे स्वरूप न राहता तिला माडगूळकरांनी कलात्मक घाट प्राप्त करून दिला.

साहित्यात व्यंकटेश माडगूळकर यांनी पशु, पक्षी, झाडे, माणसे या साऱ्यांचे सूक्ष्म चित्रण मोठ्या आत्मीयतेने केले आहे. तेवढे अन्य कोणत्याही लेखकाच्या साहित्यकृतीतून दिसून येत नाही. शिवाय दलित आणि ग्रामीण साहित्य चळवळींच्या मूळ प्रेरणांपैकी व्यंकटेश माडगूळकरांचे साहित्य ही एक मूलभूत प्रेरणा ठरली. कोणतीही दृश्य चळवळ उभी न करता त्यांच्या साहित्याने मूलगामी चळवळ निर्माण केली. त्यामुळे त्यांचे साहित्य अभ्यासकांना आजही आवाहनात्मक ठरत आहे. मानवी मनाला स्पर्श करत आहे. त्यामुळे व्यंकटेश माडगूळकरांनी 'अनेक क्षेत्रात पारंगतता प्राप्त करून दाखविली की, प्रज्ञावंतांनाही त्याचा हेवा वाटावा'' असे गौरवपूर्ण उद्‌गार म. द. हातकणंगलेकर यांनी काढले आहेत. असा हा प्रगल्भ प्रतिभाशक्ती लाभलेला, मराठी साहित्याला समृद्ध करणारा प्रतिभावंत माणदेशी साहित्यिक माणदेशी मातीतून उबवून मेघापर्यंत पोहोचलेला अलौकिक चमत्कारच होता.

★☆★☆



# अस्तित्व

कु. प्राजक्ता कणबर्गी - १२ वी आर्टस्

डिसेंबरची एक पहाट. अजूनही सर्वत्र विरळ अंधार पसरलेला होता. हवेत अंग गोठविणारी थंडी 'मी' म्हणत होती. पूर्वेला सूर्यनारायणाने हजेरी लावायला तसा अजून बराच अवधी होता. वाडकरांची चाळ अजूनही निद्रेच्या अधीन होती. नीरव शांतता दाटलेली. त्या नीरव शांततेत घुमत होते ते फक्त माईच्या अभंगाचे बोल. तुकारामांची पदे त्या मन लावून गात होत्या. आवाज एवढा चांगला नसूनही त्यात उत्कट भावांची झाक मात्र जाणवण्यासारखी होती. देवासमोर हात जोडून, अर्धमिटल्या डोळ्यांनी मन लावून त्या सावळ्या विठाईमाऊलीचे स्तवन करत होत्या. माईंचे ते देवापुढे नतमस्तक होऊन बसणे त्यांच्या मनातील उत्कट भक्तीचे अस्तित्व दर्शवित होते.

प्रभूस्तवन संपले. माईंनी मनोभावे विठ्ठलाला प्रणाम केला. बाहेरचा अंधार हळूहळू निवळू लागला होता. पूर्वेला दूर क्षितिजावर दिनकराचे लाल भडक बिंब हळूहळू वर येऊ लागले. सूर्याची किरणे जमिनीला स्पर्श करू लागली; तशी वाडकरांच्या त्या चाळीलाही जाग येऊ लागली. कुठे बारीक कुजबूज, तर कुठे पाणी तापविण्यासाठी पेटवलेल्या परंतु नीट न पेटणाऱ्या स्टोव्हचा फुरफुर आवाज ऐकू येऊ लागला. चाळीच्या गॅलरीत अडकविलेल्या डालड्याच्या डब्यातल्या तुळशीपत्रांवर दवबिंदूंनी हजेरी लावली होती. माई तुळशीमातेची मनोभावे पूजा करण्यात गढल्या होत्या. तोपर्यंत खाली सार्वजनिक नळावर चाळीतल्या आयाबायांची धावपळ चालू झाली. एकच नळ, त्याच्या पाण्याची छोटी धार; आणि त्यासाठी बायकांचे उडणारे खटके पाहून माई नकळतच हसल्या. 'हे असंच चालायचं' म्हणून खोलीत गेल्या.

अजूनही नलू आणि मुकुंदा झोपूनच होते. सकाळच्या कोवळ्या किरणांचा खिडकीतून येणारा नाजूक कवडसा दोघांच्या निद्रिस्त चेहऱ्यांवर सांडला होता. त्या किरणात न्हाऊन निघालेले नलू आणि मुकुंदा खूपच मोहक वाटत होते. माई काही वेळ स्तब्ध होऊन त्यांच्याकडे पहात होत्या. पण लगेच त्या भानावर आल्या. अंग दुमडून झोपलेल्या नलूच्या लांबसडक मोकळ्या सोडलेल्या केसातून हात फिरवत त्यांनी तिला हाक मारली, ''नलू, अगं ए नलू, ऊठ बाळ लवकर.'' तशी नलूला जाग आली. डोळे किलकिले करत तिने माईकडे पाहिले. आणि पुन्हा ती माईंच्या कुशीत शिरली. ''नलू, अगं असं काय करतेस ! ऊठ पाहू. खूप कामं बाकी आहेत, ऊठ लवकर''. तशी नलू उठली. आळोखे-पिळोखे देत म्हणाली, ''कायं गं माई, किती छान झोप लागली होती.'' एवढं बोलून ती उठली. तोंड धुवून पाणी भरायला गेली. इकडे माई सकाळच्या स्वयंपाकाला लागल्या. ''मुकुंदा उठला की पहिला चहा मागतो'' असं म्हणतच माईंनी चहाचं आधण स्टोव्हवर चढवलं. सकाळचा स्वयंपाक, नलूचा डबा हे सारं माई करायच्या. इतर कामं उरकून नलू ऑफिसला जायची. नलूच्या डब्यासाठी सकाळी जेवणाची गडबड करावी लागे. माई पदर खोचून कामाला लागल्या.

दुपारचा एक-दोनचा सुमार असावा. माई घरातली कामं आवरून निवांत वामकुक्षी घेत होत्या. माणसांची वर्दळ, गडबड अगदी कमी झाल्यामुळे एकदम शांत शांत वाटत होतं. इतक्यात चव्हाणांच्या दिलीपने हाक मारली, ''माई, माई''. हाकेसरशी माई जाग्या झाल्या.

''माई, मुकुंदा कुठं आहे ?''

''अरे, आज कुठल्याश्या ऑफिसमध्ये त्याची मुलाखत



आहे. तिथेच गेलाय तो. त्यानं त्या ऑफिसमध्ये नोकरीसाठी अर्ज दिला होता.''

''माई, मुकुंदा हुशार आहे. त्याला लवकर एखादी चांगली नोकरी मिळाली म्हणजे आपली मौजमजा.''

''तुझ्या तोंडात साखर पडो, देव करो आणि असंच घडो.''

''बरंय माई, तो आला की कट्ट्यावर पाठवून द्या.'' दिलीप निघून गेला. माई पुन्हा चटईवर आडव्या झाल्या. पण आता काही केल्या त्यांचा डोळा लागेना. राहून राहून त्यांना सारखे दिलीपचे शब्द आठवू लागले... खरंच, त्याला लवकर एखादी छानशी नोकरी मिळू दे. माईंनी मनातल्या मनात विठ्ठलाला नवस बोलला, 'पांडुरंगा, माझ्या मुकुंदाला चांगली नोकरी लागू दे. मी तुला एकवीस नारळ वाहीन.'

नोकरी मिळविण्यासाठी मुकुंदाची चाललेली धडपड पाहून माई कासावीस होऊन जात. आज मुकुंदाला ग्रॅज्युएट होऊन तीन वर्षे होत आली. बी. कॉम. फर्स्ट क्लासमध्ये पास होऊनही त्याला कुठेच थारा मिळत नव्हता. नोकरीसाठी तो रोज वणवण हिंडत होता. घामाच्या धारा वहावत होता. पण नियतीच्या मनात कायं होते कोणास ठाऊक. प्रत्येक संधी आशा दाखवून मुकुंदाला झुलवत ठेवायची आणि एकेदिवशी वाकुल्या दाखवत निसटून जायची. आता तर हे नेहमीचेच झाले होते. प्रत्येकवेळी मुकुंदा उत्साहाने, आत्मविश्वासाने इंटरव्ह्यूसाठी जायचा. पण पदरी निराशाच यायची. सर्टिफिकेटस्, डिग्री आता काही कामाचे राहिले नव्हते. कामाचा फक्त पैसा; बोलतो तो पैसा अन् चालतो तो पैसा. सगळीकडे पैशाचा वशिला. त्यामुळे मुकुंदा दरवेळी खचत जात होता. दरवेळी तो स्वत:च्या मनाला एकच प्रश्न विचारायचा, ''किती दिवस असंच बेकार रहायचं ? किती दिवस नलूताईच्या पैशावर चालायचं ? तिचं कधी ना कधी लग्न होणार, ती जाणार. मला काहीतरी केलं पाहिजे... काहीतरी केलं पाहिजे.'' ही तळमळ त्याच्या मनात सतत उफाळून यायची. माई त्याची होणारी कुचंबणा ओळखून होत्या. पण त्याला आशा दाखविण्यापलीकडे त्या काहीच करू शकत नव्हत्या.

चार वाजेपर्यंत मुकुंदा घरी परतला. त्याचे पाय थकले होते. चेहरा उदास दिसत होता. आल्या आल्या तो खुर्चीत बसला. माई त्याच्यासाठी पाणी घेऊन आल्या. पण त्यानं ते घेतलं नाही. माई तिथेच त्याच्याजवळ बसल्या. त्याच्या विस्कटलेल्या केसांवरून हात फिरवत त्यांनी विचारलं, ''मुकुंदा, काय झालं ?''

मुकुंदाने मानेनेच नकार दिला. ''जे नेहमी होतं, तेचं झालं.'' हे ऐकल्यावर काही वेळ माई शांत राहिल्या. पण मुकुंदाला शांतपणा खपला नाही. तो शरीरातील मरगळ झटकल्यासारखा उठला. ''माई, मला जेवायला वाढतेस ना ? भूक लागली आहे.''

माई काही न बोलता उठल्या. त्यांनी मुकुंदाचे ताट वाढून आणले. मुकुंद हळूहळू एकेक घास तोंडात घालत होता. मध्येच माई म्हणाल्या, ''मुकुंदा...''

मुकुंदाने माईंकडे फक्त पाहिले आणि पुन्हा मान खाली घालून तो जेवू लागला.

''मुकुंदा, आपल्या नलूनं स्वत:चं लग्न ठरवून ठेवलंय.''

मुकुंदाचा हात जागच्या जागी थांबला. त्याने पुन्हा एकवार माईंकडे पाहिले. पुन्हा मान खाली घालून तो ताटातल्या भाताशी चाळा करू लागला.

''नलूच्या ऑफिसमध्ये आहे म्हणे. विनायक कदम''

''हं...''

''विनायकच्या घरच्या लोकांनी त्यांच्या लग्नाला परवानगी दिली आहे म्हणे.''

''मग ?''

''मला वाटतं, आता नलूचं लग्न करून दिलं पाहिजे.''

''....''

''त्याच्यासाठी पैशाची व्यवस्था''

''प्रयत्न चालू आहेत.''



जेवण उरकून तो चाळीतल्या त्यांच्या फेमस कट्ट्यावर मित्रांकडे गेला. चव्हाणांचा दिलीप, कुलकर्ण्यांचा मधू, खानचाचांचा मुन्ना, देसाईंचा सुनील सगळी मित्रमंडळी तिथे जमली होती. मुकुंदाला पाहताच दिलीप म्हणाला, ''काय मुकुंदा, लागली काय वर्णी ?''

मुकुंदा, ''नाही''.

मधू, ''अरे, व्हॉट इज प्रॉब्लेम ? तुझा चेहरा एवढा का पडलायं ?''

मुकुंदा ''नलूताईचं लग्न ठरलंय. तिच्या लग्नासाठी पैशाची तजवीज करायला पाहिजे. पण मधू कुठून आणू रे पैसा ? अजून नोकरी नाही.''

मुन्ना, ''देख मुकुंदा, मैने तुझे बोला था ना, तू एक बार मेरे साथ आके तो देख. आज तेरा पैसे का प्रॉब्लेम युँ निपट जाएगा ! येतोस काय ?''

मुकुंदा मुन्नाचं बोलणं ऐकून सुन्न झाला. मुन्ना असाच बेकार फिरत होता. त्याला कोणत्यातरी दादाने आपल्या हाताशी धरलं आणि आज चाळीच्या समोरंच मुन्नाचं स्वत:चं एक छोटंस घर तयार झालं होतं. मुन्नासुद्धा बेकारीच्या आगीत जळाला होता. तो मुकुंदाला कित्येकदा म्हणायचा, ''देख मुकुंदा, जी माझी आधी कंडिशन होती, ती आज तुझी आहे. अरे, मला दादाचा आधार मिळाला. आणि बघ काय नाही आहे आज माझ्याकडे ? स्वत:चं घर, गाडी, पैसा सगळं मिळालं मला. माझं ऐक मुकुंदा, अरे कितना दिन तू ऐसाही सडता रहेगा इस दलदल में ? अरे पैसा है तो सब कुछ है. तू आम्हाला जॉईन हो. छोट्या छोट्या कामांसाठीही मोठी रक्कम मिळते.''

पण मुकुंदा आजपर्यंत मुन्नाच्या या विचारांशी सहमत नव्हता. कारण फक्त माईंचे संस्कार. त्यामुळेच तो आजपर्यंत याबाबत विचार करायला धजावत नव्हता.

पण आजची स्थिती वेगळी होती. मुकुंदाला पैशाची फार गरज होती. परिस्थितीपुढे तो हताश झाला. आज त्याला मुन्नाचे मत सतत विचार करायला लावत होते. ''पैसा हवाय मला. घराची जबाबदारी आहे माझ्यावर. भावाच्या नात्याने ताईचं लग्न लावून देणं माझं कर्तव्यच आहे. पण यासाठी हातात पैसा हवा. मग तो कसाही का मिळेना, पण माई, माईच्या शिकवणुकीमुळे मी हे सगळं करू शकेन ? जर माईला कळलं तर तिला काय वाटेल ? पण सध्याच्या परिस्थितीत माझ्याकडे दुसरा पर्यायच काय आहे ? मला पैसा हवाय... मला पैसा हवाय.''

तो एकदम अस्वस्थ झाला. मित्रांच्या घोळक्यातून उठून घरी गेला. रात्री बराच वेळ तो हाच विचार करत जागा होता. त्याच्या मनाची नुसती घालमेल होत होती. तो बराच वेळ तसाच जागा होता.

पूर्व क्षितिजावर सूर्य उगवला. सवयीचा दिनक्रम चालू झाला. मुकुंदा जरा लवकरच उठला. आंघोळ करून त्याने कपडे चढवले. ''माई, मी जरा बाहेर जाऊन येतो गं.'' असं म्हणत तो बाहेर पडला.

पाय मुन्नाच्या घराचा रस्ता कापू लागले. मनात विचार अजूनही घोळत होते. जावं का मागे वळावं या संभ्रमात तो अजूनही झुरत होता. पण तरीही पुन्हा निश्चय करून तो वाट कापू लागला.

''मुन्ना'' दारातच घुटमळत मुकुंदाने हाक मारली.

''अरे, मुकुंदा ये. मेरे इस गरीबखाने में कैसे आना हुआ मियाँ ?''

मुकुंदा हळूवार पावलाने आत गेला. संकोचतच खुर्चीत बसला. ''मुन्ना, माझं तुझ्याकडे जरा काम...नाही म्हणजे...''

''अरे मुकुंदा, एवढा डरतोस कशाला ? काय काम आहे ते अगदी बिनधास्तपणे सांग.''

मुकुंदाला आणखी जरा अवघडल्यासारखे वाटू लागले. ''नाही म्हणजे... मुन्ना मला तुझ्या दादाला भेटायचंय''.

''दादाला तुला भेटायचंय !'' मुन्नाने डावी भुवयी उंचावत विचारलं. या प्रश्नाने मुकुंदाला जास्तच अवघडल्यासारखं



वाटू लागलं. तो चाचरतच म्हणाला, ''मुन्ना, माझी सध्या काय अवस्था आहे, तुला चांगलं माहीत आहे. मला पैशाची गरज आहे. काहीही करून मला पैसा मिळवायचायं. ताईचं लग्न करायचंय. म्हणून म्हटलं, मला तुझ्या दादाकडे घेऊन चल.''

''मी तुला हीच गोष्ट केव्हापासून सांगत होतो. पण खैर कोई बात नही. आज शाम को चार बजे आजा. आपण दादाकडे जाऊया.''

मुकुंदाने मुन्नाचा निरोप घेतला व तो घराकडे वळला.

संध्याकाळी मुन्ना मुकुंदाला घेऊन आपल्या कर्त्याकरवित्या दादाकडे आला. दादाचा आलिशान बंगला पाहून मुकुंदाचे डोळे दिपले. क्षणभर त्याने आपल्या हक्काच्या बंगल्याचे स्वप्न रंगवले. पण लगेच तो भानावर आला.

मुन्नाने दादाची आणि मुकुंदाची ओळख करून दिली. दादाने मुकुंदाची कुवत बघण्यासाठी लगेच त्याच्याकडे एक काम सोपवले. मुन्ना ते काम कसं करायचं ते समजावत होता. मुकुंदा स्तब्ध राहून ऐकत होता. पण त्याच्या डोक्यात काहीच शिरत नव्हते. तो आपल्याच तंद्रीत होता, ''मला हे जमेल ?'' मुन्नाने पुढे केलेली पिस्तूल घेताना त्याचे पूर्ण अंग घामाने डबडबले. हात विलक्षण थरथरले. पण मनाचा निश्चय करून या दलदलीत त्याने पाय घातला... पुन्हा वर न येण्यासाठी.

दिवसामागून दिवस सरत होते. महिन्यामागून महिने पळत होते. नलू लग्न होऊन सासरी गेली होती. माईसुद्धा मुकुंदा नोकरी करतो आहे या गैरसमजात निश्चिंत झाल्या होत्या. आणि मुकुंदा दादाची कामे करतच होता. मुन्नाच्या हाताखाली तयार होत होता. त्याला पूर्णपणे जाणीव होती, 'आपण जे करतो आहोत ते योग्य नाही. आपल्याला यातून बाहेर पडायचंय. पुन्हा नवीन आयुष्य उभारायचंय. पण आता तर हे जीवन सवयीचं बनलंय. यातून बाहेर पडायचा जितका मी जास्त प्रयत्न करतो, तेवढा मी यात जास्त अडकत चाललोय. मला, माझी अशी दिशाच राहिली नाही. माझ्या आयुष्याच्या दोऱ्या आता दादाच्या हातात आहेत. मी या कचाट्यात पुरता सापडलोय. कोण काढेल मला यातून बाहेर... कोण काढेल ?''

मुकुंदा वरून शांत दिसायचा पण त्याच्या मनात आग पेटली होती. त्या दाहात त्याचे तारुण्य होरपळून निघत होता. तो अस्वस्थपणे, तळमळत प्रत्येक दिवस पुढे ढकलत होतो. त्याचे आयुष्य त्याचे राहिलेच नव्हते. अर्थहीन नीरस जीवन तो जगत होता. रोजचाच दगाधोका, मारामारी, गुंडागर्दी या जाळ्यात तो घुसमटत होता. त्याच्या मनाचा कोंडमारा होत होता. पण दादाच्या हातची कळसूत्री बाहुली बनलेल्या मुकुंदाला सर्वकाही पहात राहण्याशिवाय पययिच नव्हता.

दिवस सरतच होते. असाच एक दिवस, मुकुंदा घरी नव्हता; माई दुपारच्या वेळेला तांदूळ नीट करत बसल्या होत्या. एवढ्यात दारावर कोणीतरी थाप मारली. माईंनी मान वर केली. त्यांना एकदम आश्चर्य वाटले. 'पोलिस आणि इथे ?'

''मुकुंद काळे इथेच राहतो का ?''

''हो, पण आपण...''

''मी, इन्स्पेक्टर शिंदे. मुकुंदाच्या नावाचे अटक वॉरंट घेऊन आलोय.''

''काय ?'' माईंचा स्वतःच्या कानावर विश्वास बसेना.

''होय. डॉ. शिरीष जाधवांच्या खुनाच्या आरोपाखाली त्याला अटक करायला आलोय.''

''खून...''

''होय. त्याने असे आणखी दोन खून केलेत. गेले चार महिने आम्ही त्याला शोधत होतो.''

''पण... पण तुमच्याकडे या गोष्टीचा पुरावा काय ?''

''आमच्याकडे सारे पुरावे आहेत. बरेच साक्षीदार आहेत. पोलिस रेकॉर्डमध्ये त्याची नोंद आहे.''

''साहेब, आता तो घरी नाही. जर तो खरंच गुन्हेगार आहे, तर मी स्वतः त्याला तुमच्या ताब्यात देईन.'' माईंचे



डोळे पाण्याने डबडबले होते. मान खाली घालून त्या अश्रू आवरण्याचा प्रयत्न करू लागल्या.

''ठीक आहे. पण आमचे काही लोक इथे लक्ष देऊन राहतील.''

इन्स्पेक्टर गेल्यावर माई अवसान गळाल्याप्रमाणे पटकन खाली कोलमडल्या. डोळ्यापुढे अंधार थईथई नाचू लागला. माईंचे सारे मनोधैर्य खचले. त्यांना असे वाटू लागले जसे आपल्या मुकुंदाने आपल्या विश्वासाचा गळा आवळला आहे. त्यांना मेल्याहून मेल्यासारखे झाले. अन् कधी त्या मूर्च्छित झाल्या त्यांना कळलेच नाही.

जेव्हा त्या शुद्धीवर आल्या तेव्हा त्यांच्या शेजारी मुकुंदा हातात पाण्याचा ग्लास घेऊन बसला होता. डोळे किलकिले करून माईंनी इकडेतिकडे पाहिले, अन् मुकुंदा नजरेला पडला तशा त्या उठून बसल्या. त्याचा हात झिडकारून म्हणाल्या, ''मुकुंदा... मला हात लावायची पुन्हा हिम्मत करू नकोस.''

''माई, हे काय बोलतेस ? काय झालंय तुला ?''

''अरे माझी गोष्ट सोड... मुकुंदा, तुला काय झालंय ? माझे संस्कार कुठे कमी पडले ?''

''माई...''

''एक शब्द बोलू नकोस. तू कोण आहेत हे मला चांगलं कळलंय.'' माईंचा आवाज गहिंवरला. अंग थरथरू लागले. ''मुकुंदा... तू... तू माझ्या विश्वासाला तडा का दिलास रे ? का बोललास माझ्याशी खोटं ? मला सांगितलंस की मी एका मोठ्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी करतो आहे. यावर मी विश्वास ठेवला. नारळ फोडून नवस पूर्ण केला. का ? कारण तुला नोकरी मिळाल्याचं समाधान वाटत होतं मला. पण आज सत्यता कळली. दुसऱ्यांच्या रक्ताने आपले हात माखून कोणता आनंद मिळाला तुला ? हे पाप करायला तुझे हात धजावलेच कसे ? हे सगळं करण्यापूर्वी तू तुझ्या आईचा, जिने तुला नऊ महिने पोटात ठेवून, अनेक जीवघेण्या कळा सोसून जन्म दिला त्या आईचा, तिच्या संस्कारांचा का विचार केला नाहीस ? का मुकुंदा... का ?'' माई हमसून हमसून रडू लागल्या.

मुकुंदाला माईकडे पाहवेना. शरमेने खालू झुकलेली मान त्याला ताठ करणे अवघड वाटू लागले. थरथरत्या आवाजाने त्याने माईंना साद घातली, ''माई... हे खरं आहे की माझे हात अपवित्र आहेत. माझ्या चारित्र्यावर दुसऱ्याच्या रक्ताचे डाग पडलेत. त्या लोकांच्या शापाने माझं भविष्य अंधारून गेलंय. पण मी तरी काय करू ? या दलदलीतून बाहेर पडायचा मी जसजसा प्रयत्न केला, तसतसा या घाणीत मी अधिकच गुरफटू लागलो. तुला ऐकायय मी असं का केलं ! माई, मी विना नोकरीचा, बी. कॉम. झालेला. सळसळत्या रक्ताचा पण सुशिक्षित बेकार तरूण म्हणून इकडे तिकडे कामासाठी वणवण भटकत होतो. त्यावेळी माझ्या कुवतीची, माझ्या शिक्षणाची अन् माझ्या बुद्धिची कोणी दखल घेतली ?... नाही. या जगात दखल फक्त त्याचीच घेतली जाते ज्याच्याजवळ पैसा असतो. त्यांच्या तोंडून पैसाच बोलत असतो. इथे फक्त पैशाचाच वशिला चालतो. आणि माझ्याकडे त्याच पैशाची कमी होती. माझ्या जीवाची काय तडफड होत होती ते फक्त मलाच माहीत. जेव्हा तू ताईच्या लग्नाचा विषय काढलास तेव्हा मला कळलं की, मला पैशाची किती गरज आहे. पैसा मिळवण्यासाठी नाइलाजानं मला या वाटेनं जावं लागलं. माई, जेव्हा पहिल्यांदा पिस्तूल हातात धरण्याची वेळ माझ्यावर आली ना, खरं सांगतो गं, तेव्हा माझ्या मनात फक्त तुझे विचार होते. पण माई, पोट फक्त भावनांवर भरत नसतं गं. माई... माई मला वाटलं होतं, त्या लोकांचं फक्त एकच काम करून आपण यातून बाहेर पडायचं. मी तसा प्रयत्नही केला. पण ते लोक मला जीवे मारण्याच्या धमक्या देऊ लागले. कारण मी त्यांच्या फार कामाचा माणूस होतो. माई, जर मी ते काम सोडलं असतं, तर तुझं काय ? माझ्यानंतर तू एकटीच पडली असतीस. आणि ते माझ्यासाठी असह्य झालं असतं. मला माहीत आहे माई, मी तुझा मुकुंदा नाही. खून करणारा मुकुंदा तुझा मुलगा कसा होऊ शकेल ? तुझा तो सरळ, सालस मुकुंदा कधीच मेला, कधीच मरून गेला ! माई... आता तू देशील ती शिक्षा



भोगायला मी तयार आहे. माई... माई..."

मुकुंदाच्या डोळ्यातून अश्रू झरझर वाहू लागले. माईंनी मान वर केली. मनाशी पक्का निश्चय करून त्या म्हणाल्या, "मुकुंदा, तू स्वत:ला पोलिसांच्या स्वाधीन कर. मिळेल ती शिक्षा भोगायला तयार हो."

"माई, मी तुझ्यासाठी, तुझ्या प्रेमापोटी तुझे सारे निर्णय मान्य करतो."

अखेर मुकुंदाने स्वत:ला पोलिसांच्या हवाली केले. त्याच्यावर केस चालवली गेली. तीन खून करणाऱ्या मुकुंदाला कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली. कामकाज संपले. माई खाली मान घालून चालू लागल्या. आपोआप त्यांचे पाय समुद्र किनाऱ्याकडे वळले. मावळतीची वेळ जवळ येऊ लागली होती. आकाशात नाजूक अंधार दाटू लागला होता. सूर्याचे लालभडक प्रतिबिंब त्या पाण्यावर सांडले होते. सारा समुद्र माईंना रक्ताप्रमाणे लाल भासत होता. सूर्य पाण्यावर टेकला होता. हळूहळू त्याचे अस्तित्व पाण्यात विरघळू लागले. सूर्यात माईंना मुकुंदा दिसू लागला. मन सैरभैर झाले. 'मुकुंदाचे सुद्धा हेच वास्तव का ? एवढेच अस्तित्व का ? उगवणाऱ्या सूर्याला अस्त हा असतोच. पण माझ्या सूर्याचा अस्त इतक्यात का ?' माईंचे नयन अश्रूंनी भरले. चौपाटीवरच्या कुठल्यातरी रेडिओतून गाण्याचे आर्त शब्द उमटू लागले, 'डोळ्यात सांज वेळी आणू नकोस पाणी !' समोरच्या सूर्याचे अस्तित्व पाण्यात हळूहळू बुडू लागले. माईंच्या अश्रूत सूर्य विरघळू लागला... पुन्हा कधीही न उगवण्यासाठी !

★☆★☆

## चारोळी

जीवन किती सुंदर आहे
अनुभव तुला सांगत जाईल
प्रयत्न करायला विसरु नकोस
मार्ग तुला सापडत जाईल.

## बोधकथा

एका दरिद्री मजुराला रस्त्यावर खोदकाम करत असता एक सुंदर शिल्प सापडले. घडीव दगडात कोरलेली ती सुंदर मूती ! पण त्या मूर्तीचे त्या दरिद्री मजुराला काय विशेष वाटणार ! तो मजूर ती मूर्ती विकण्यासाठी गावातील एका मनुष्याकडे गेला. त्या मनुष्याचे नाव होते सहदेव. सहदेवाला प्राचीन वस्तू, मूर्ती जमविण्याचा खूप छंद होता. त्याची आर्थिक स्थितीही उत्तम होती. त्याच्याकडून काही रक्कम घेऊन त्याला ती मूर्ती देऊन टाकली. घरी परतताना तो मजूर विचार करत होता, बरीच वर्षे मूर्ती जमीनीत पडली होती. त्याचे एवढे पैसे सहदवाने मला दिले वेडाच दिसतो. तिकडे सहदेवाने मूर्ती स्वच्छ केली. रामदेवराय यादवांच्या काळातील ती मूर्ती होती. तिची किंमत लाखाच्या घरात होती. सहदेव मनाशी म्हणाला या वेड्याने काही लाखांची दुर्मिळ मूर्ती मला कवडीमोल किंमतीत दिली, मूर्ख लेकाचा !

**तात्पर्य** : पृथ्वीतलावरील प्रत्येक मनुष्याच्या दृष्टीने प्रत्येक वस्तुला भिन्न महत्त्व असते. जीवनमूल्याची किंमतही परिस्थितीनुसार व व्यक्तीच्या दृष्टीकोनानुसार बदलते.

## चिंतन

तुम्ही धीट बना, शक्तीसंपन्न बना. तुम्ही सगळी जबाबदारी स्वत:च्या शिरावर घ्या. आणि लक्षात ठेवा की, तुम्हीच तुमच्या भाग्याचे निमर्ति आहात. तुम्हाला हवे असलेले सर्व सहाय्य व सर्व बल तुमच्यामध्ये आहे. म्हणून तुमचे भविष्य तुम्हीच घडवायचे आहे. भवितव्य घडविण्यासाठी जर कोणाकडून मदतीची अपेक्षा करीत असाल तर ती न करता स्वकर्तृत्वाने स्वत:चे भविष्य घडवा.





# वपु आणि वपुच

कु. भक्ती कुलकर्णी – बी. ए. भाग १

काही लेखक अद्याक्षरांवरून ओळखले जातात. वपुंनीही आपल्या नावाची अद्याक्षरे घेऊन 'झपुर्झा'च्या तालावर 'वपुर्झा' किंवा 'अपूर्वाई' सारखं 'वपुर्झाई' अशा वेगवेगळ्या वाटणाऱ्या शब्दांनी वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केला. वपु हे मुख्यत: कथाकार होते. त्यांचं लेखनही कथाकथनच्या अंगाने जाणारे होते. त्याआधी मराठी साहित्यात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील किंवा द. मा. मिरासदारांच्या कथाकथनाचा रसिकांना परिचय झालेला होता. हे तीनही कलाकार मूळातच विनोदी कथाकार होते आणि ग्रामीण भागातील वास्तव्य असल्याने तिथली वातावरण निर्मिती करून लोकांना खिळवून ठेवण्याचं तंत्र त्यांना आत्मसात होतं, या पार्श्वभूमीवर वपुंचं कथाकथन वेगळं होतं. त्यांचं लेखन हे त्यांच्या नोकरीच्या निमित्ताने संपर्कात आलेल्या विविध व्यक्तींच्या व्यक्तिचित्रणावरून प्रामुख्याने तयार झालं होतं. वपु माणसातील विविध गुण अचूक हेरत. ते वास्तुस्थापत्य शास्त्राचे पदवीधर होते. पण स्वतंत्र व्यवसाय न करता त्यांनी मुंबई महानगरपालिकेत कारकुनाची नोकरी धरली. त्याठिकाणी त्यांना पट्टेवाल्यापासून राजकारणापर्यंत अनेक स्वभाववैशिष्ट्यांची माणसं जवळून पहायला मिळाली. त्याचंच चित्र लिखाणात उतरलं.

रोजच्या जीवनात सतत रूजणारी, जोमानं वाढणारी वपुंची कथा माणसांवर प्रेम करते आणि वाचकही त्या अलौकिक कथावर प्रेम करतात कारण कथा लिहिणारे वपु, उसळत्या उत्साहाने बहरलेले वपु, सौंदर्यसृष्टीचे असीम वरदान लाभलेले वपु आणि प्रत्यक्षातले माणूस म्हणून जगणारे वपु यांच्यात विलक्षण साम्य आहे.

वपुंनी नोकरदाराचं आयुष्य स्वीकारलं आणि त्याचं सहर्ष स्वागतही केलं. थोडथोडकी नाही, तर २७ वर्षे त्यांनी नोकरीत घालवली. पुढे त्यांनी स्वेच्छा निवृत्ती पत्करून कथाकथानकार आणि लेखक म्हणूनच आयुष्य व्यतीत करणं पसंत केले. वपुमधला लेखक आणि कथाकार घडला तो त्यांच्या नोकरीच्या काळातच. तऱ्हेतऱ्हेच्या माणसांचं जग वपुंनी आपल्यासमोर उभं केलं. माणसांचे असंख्य नमुने वपुंनी अनुभवले आणि त्याचं प्रत्ययकारी चित्रण केलं. एकच कारण सांगता येईल ते म्हणजे, वपुंची अजोड निरीक्षण क्षमता. माणूस आणि त्याचं जगणं या गोष्टीवर वपुंनी मनापासून प्रेम केलं आणि सामान्यातील सामान्य माणसाला नायकपद बहाल केलं. सामान्य माणूस अशा वर्गाचा प्रतिनिधी होता की, ज्यांच्याकडं सांगण्यासारखं काही नाही. कोणतीही उपाधी नाही आणि संसाराच्या रहाटगाड्यात तो अखंड बुडाला आहे. पण जगण्याचा प्रश्न त्याला भेडसावतो आहे. अनंत अडचणी सहन करूनही जगणारा वपुंच्या कथेतला हा नायक हा नायकमनाला भिडतो.

वपु कथाकथनाकडे वळले ते मात्र हौसेपोटीच. सुरवातीला घरगुती कार्यक्रमातून ते कथा रंगवू लागले. नंतर मात्र ही कला त्यांनी जाणीवपूर्वक आत्मसात केली. त्यांना ग्रामीण जीवनाचा अनुभव नव्हता. त्यामुळे त्यावर आधारित कथा रंगवणं शक्य नव्हतं. त्यांचं लहानपण पुण्यात, तर नोकरीनंतरचं आयुष्य मुंबईत गेलेलं. कथाकथनाच्या निमित्ताने ते जे काही हिंडले त्यातूनही त्यांच्या व्यक्ति-संग्रहात भर पडत गेली.

वपु शेवटपर्यंत मध्यमवर्गीय राहिले. सामान्यपण कधीच त्यांनी अमान्य केलं नाही. सामान्य माणसांची दु:खंही सामान्यच असतात. पण खरी असतात हे वपुंनी हेरलं होतं.



माणसामधली किंवा जीवनातली विसंगती शोधायची सवय त्यांना लागली होती. आपण जे आहोत त्यापेक्षा वेगळे दाखवण्याचा या सामान्य माणसाचा प्रयत्न असतो. नसलेली श्रीमंती, विद्वत्ता किंवा अनुभव आहेत असं ते थाटानं सांगतात, पण त्यातली विसंगती आणि अपेक्षाभंग यावरही वपुंनी बोट ठेवलं आहे. हा त्यांचा प्रयोग यशस्वी झाला. म्हणूनच वपुंच्या कथा सामान्य माणसाला भावल्या. सामान्य माणसाचं चित्र रेखाटताना फँटसीचाही वापर केला, जे 'नाही' ते 'आहे' असं कल्पून कथा रंगवायची, वाचकांना एकदा वेगळ्याच विश्वात घेऊन जायचं पण पुन्हा त्यांचे पाय जमिनीवर टेकवायचे - याची विलक्षण हातोटी वपुंना साधली होती. वास्तव आणि अद्भूतरम्यता यांची वपुंनी केलेली सांधेजोड अवर्णनीय आहे. 'तूच माझी वहिदा' ही कथा हे त्यांचं अतिशय चांगलं उदाहरण म्हणावं लागेल. वपुंचा विनोद मात्र खळाळता होता. अनपेक्षितपणाने येणारा तरीही जीवनातल्या भेदक सत्यावर आधारलेला होता. म्हणूनच तो शेवटपर्यंत प्रसन्न राहिला.

वपुंनी कादंबऱ्या लिहिल्या. विविध प्रकारचं लेखनही केलं. स्तंभलेखनही चालवले. त्यांनी मुंबई आकाशवाणीवर 'पुन्हा प्रपंच' सदरातून केलेलं लेखनही लोकप्रिय ठरलं. गप्पागोष्टीतून परामर्श काढणाऱ्या या सदरात वपुंच्या लेखनाची संवादशैली प्रभावी ठरली. वपुंची कथा ही ९० % संवादमयीच असते. त्यांचे व्यक्तीचित्र बोलण्यातून व्यक्त होते. वर्णनात्मक भाग कमी असतो त्यामुळे प्रसंगातल्या नाट्याला थेट हात घातला जातो. प्रस्तावना असतच नाही. पण अनपेक्षित येणारे धक्के वाचकाला शेवटपर्यंत गुंतवून ठेवतात. २५ मार्च २००१ रोजी वपुंनी वयाची सत्तरी पार केली. त्याआधी 'माझं माझ्यापाशी' लिहिताना त्यांना मृत्युबद्दल वाटत होते....

'Time is a Fourth Dimension' हे आईनस्टाईनचं गाजलेले भाष्य अगदी अलिकडच्या काळात समजलं. उपयोग नाही. खरं तर हेच विधान योग्य वयात समजायचे राहून गेलं. आता मी 'Past is a fifth Dimension असं म्हणतो. ज्या डायमेन्शनला शून्य किंमत आहे. ह्या शून्यामागं तुम्ही चकवा देऊन गेलेल्या आठवणींचे आकडे वाढवत न्याल, तेवढी या शून्याची किंमत वाढत जाणार. सुरेश भट यांच्या चार ओळी तेवढ्यासाठी पुरेशा आहेत.

**"करू नका एवढ्यात चर्चा पराभवाची,**
**रणात आहेत अजून काही झुंजणारे**
**विझून माझी चिता युगे लोटली तरीही,**
**विझायचे राहिले निखारे अजून काही"**

प्रत्येक पिढीत असे लेखक होत असतात. त्यांना प्रसिद्धीही मिळत असते. पण ती वर्षानुवर्षे टिकविण्यासाठी एक तपश्चर्या केली आणि जगाचा शांतपणे निरोप घेतला.

★☆★☆

# चिंतन

* मानवी जीवनात सुख दुःखाचे रहाटगाडे अव्याहतपणे चालूच असते. केवळ सुख अथवा दुःख आपल्या वाट्यास येत नाही. दिवस येतो तशी रात्रही येते. सुखाबरोबर थोडेफार दुःख हे येणारच. सुखाची चव वाढविण्यासाठी तर थोडेसे दुःख हवेच असते. त्याने सुखाची चव तर वाढतेच, पण सुखाचे खरे मूल्यपण समजते.
* विनोद हा आजच्या युगातील माणसाच्या थकलेल्या मनाचा विरंगुळा आहे. विनोदही मानवाच्या दुःखाला बरे करणारी एक संजीवनी आहे. विनोदाने आपल्याला हसू येते व हसण्यामुळे मन प्रसन्न राहते. म्हणून विनोद ही धकाधकीच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण गरज आहे.





# फुले - कर्मवीरांच्या वारसदार-
# कै. सौ. कल्पनादेवी पाटील

कु. दर्शना आडे - बी. ए. भाग - ३

कै. सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील ह्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मानसकन्या. यशस्वी शिक्षिका, आदर्श माता आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणून त्यांनी जो आदर्श घालून दिलेला आहे. तो महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागातील महिलांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरावे असेच आहे.

एका सामान्य परिस्थितीमधील कुटुंबात बागणी ता. वाळवा येथे १५-७-१९२७ रोजी त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण बागणी गावातच पूर्ण केले. मनातून आपण शिक्षिका व्हायचे हे ठरवून टाकले. पण कसे जमावे ? शिक्षिका व्हायचे तर शिक्षिकेचे ट्रेनिंग घेतले पाहिजे आणि ते सातान्याशिवाय जवळपास कोठे नाही. तिथे जाऊन स्वखर्चाने हे ट्रेनिंग पूर्ण करण्याची कुटुंबाची आर्थिक कुवत नाही. अशा स्थितीत त्यांनी सातारा गाठले. कर्मवीर आण्णांना आपली ती इच्छा त्यांनी बोलून दाखविली. त्यांनी या बागणीच्या सामान्य मराठा कुटुंबातील मुलगी दत्तक घेतली आणि शिक्षणाची चिंता मिटवली. कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील महामानव. हा पुरूषश्रेष्ठ महाराष्ट्रात झाला नसता तर हे लिहिण्यास ही लेखणी उचलली गेली नसती, तर सौ. पाटीलबाई शिक्षिका बनल्या नसत्या. कर्मवीरांनी ज्ञानाची गंगा सामान्यांच्या घरापर्यंत नेली. केवळ शिक्षण देऊन इतिकर्तव्यता मानली नाही. कर्मवीरांनी तर या शिक्षित कन्यांचे संसार मांडून देण्याची पित्याची भूमिकाही पार पाडली. सौ. पाटीलबाईंच्याबाबत खऱ्या अर्थाने ते वडील बनले. विवाह तर ठरविलाच पण विवाहातील कन्यादानही केले, ते कर्मवीर आण्णांनी.

सौ. पाटीलबाईंचा विवाह त्याकाळी गाजला. सौ. पाटीलबाई १९४६ साली सातारा येथे ट्रेनिंगला गेल्या. १९४६ ते १९४९ त्यांनी ट्रेनिंग पूर्ण केले. हा काळ देशाच्या स्वातंत्र्याच्या धामधुमीचा होता. ब्रिटीशांविरोधी प्रत्यक्ष लढ्याचे पर्व संपले होते. स्वातंत्र्य टप्प्यात आले होते. या चळवळीतील अनेक शिलेदार आण्णांच्या सहवासात आलेले. या चळवळ्या सेनापतींनी विरोध पत्करला. लग्नाला उभे राहिलेले हे क्रांतिकारक फक्त क्रांतीच करत नव्हते तर क्रांती जगत होते. आपल्या या चळवळ्या सेनापतींचे प्रपंच उभे करण्याचे काम कर्मवीर आण्णांनी केले. क्रांतिवीर वाय. सी. पाटील, क्रांतिवीर नागनाथ आण्णा, बॅ. पी. जी. पाटील आणि क्रांतिवीर भाई रंगरावदादा पाटील ही त्यांची काही उदाहरणे. सौ. पाटीलबाई (पूर्वाश्रमीच्या कुमारी वत्सला शिंदे) या रूपागुणाने चांगल्या मुलीचा विवाह कर्मवीर आण्णांनी क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्या संमतीने ठरविला आणि खरोखरच त्या मुलीचे कर्मवीर वडील बनले. एका खानदानी मराठा कुटुंबातील, ज्या कुटुंबाचा ऐतिहासिक आणि लौकिक वारसा असलेल्या, गडगंज संपत्ती व एकुलता एक मुलगा. एका पारड्यात मुलाला बसवून दुसऱ्या पारड्यात त्याच्या भारोभार पैसा मोजण्यासाठी चढाओढ कृष्णाकाठच्या वधुपित्यांनी लावलेली. त्यामुळे घरातून वडिलांचा विरोध. भाईंच्या लग्नात वडिलांच्या जागी उभे राहिलेले स्वामी रामानंद महाराज, कर्मवीर आण्णा आणि स्वामीजी यांनी पुढाकार घेऊन हा विवाह सोहळा १९४७ साली मार्च महिन्यात रंगपंचमीचे मुहूर्तावर पार पाडला.

सौ. पाटीलबाईंनी वैवाहिक जीवनात क्रांती करूनच पाऊल टाकले. माहेर धनसंपन्न नाही, तर सर्वार्थाने सासर संपन्न असून त्याचे दरवाजे आपणासाठी बंद. अशा स्थितीत संसाररथाची वाटचाल अत्यंत यशस्वी करणाऱ्या



सौ. पाटीलबाईंनी आपल्या जगण्याने आदर्श निर्माण केले. ट्रेनिंग चालू असतानाच १९४८ मध्ये कन्यारत्नाला जन्म दिला आणि तिचे संगोपन ट्रेनिंगच्या काळात कर्मवीर आण्णांनी हौसेने केले. तर या काळातील आर्थिक अडचणी डाव्या चळवळीतील अग्रणी सुप्रसिद्ध वकील श्री. व्ही. एन. पाटीलसाहेबांनी सोडविल्या. कारण क्रांतिवीर रंगरावदादा आजपर्यंत काँग्रेसमध्ये होते. सातारा जिल्हा काँग्रेसचे ते ऑफिस चिटणीस होते व पार्टी मानधन देत होती. मात्र याच दरम्यान त्यांनी काँग्रेस सोडले व शे. का. पक्षाची स्थापना केली. त्यामुळे आर्थिक तरतूद बंद झाली. पक्ष प्रचारासाठी भाईंच्या पायाला चक्रेजोडलेली. महाराष्ट्रभर आपल्या मुलुखमैदान वक्तृत्वाने शे. का. पक्षाच्या प्रचार करण्यात गुंतलेले. त्यामुळे मुलीचे संगोपन व प्रपंचाचा भार या मंडळींनी उचलला.

पुढे स्थिरस्थावर झाल्यावर ट्रेनिंग पूर्ण करून सौ. पाटीलबाईंची आष्टा ता. वाळवा येथे मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून नेमणूक १९४९ साली झाली. त्यावेळी भाई जिल्हा स्कूल बोर्डाचे सदस्यही होते. तुटपुंज्या वेतनावर अत्यंत जिद्दीने संसाररथ ओढला. १९५३ मध्ये सौ. पाटील या शिगाव येथील मुलींच्या शाळेत बदलून आल्या. त्या आल्या तेव्हा इ. ३री पर्यंत असणाऱ्या या मुलींच्या शाळेत एकूण २५ मुली हजर होत्या. वर्गखोल्यांची गैरव्यवस्था, विशेषत: वरिष्ठ मराठा कुटुंबात मुलींच्या शिक्षणासंबंधी अनास्था, तर गरीब कुटुंबात मुलींना शिकण्यास पाठविणे अशक्य. मराठा कुटुंबातील स्त्री आणि ती शिक्षिका ही कल्पनाच या मराठा समाजाला त्याकाळी मानवणारी नव्हती. अशा प्रतिकूल परिस्थितीत मुलींना शिक्षणाची गोडी लावून पालकांची समजूत काढून मुलींना शाळेत दाखल करण्यास प्रवृत्त केले. मुलींची संख्या वाढू लागली आणि मुलींना वर्गखोल्यांची अडचण भासू लागली. या परिस्थितीवर मोठ्या धैर्याने, चिकाटीने वर्गखोल्या उपलब्ध करून त्यांची डागडुजी करणे, नवीन वर्गखोल्या बांधणे हे काम अत्यंत कौशल्याने सौ. पाटीलबाईंनी पार पाडले. प्रारंभी नाक मुरडणाऱ्यांच्यावर आपल्या कामाने त्यांनी प्रभाव पाडला आणि त्यांचे उत्तम सहकार्य मिळविले. आर्थिक मदतीचा प्रश्न सोडविताना गावकऱ्यांनी तर सहकार्य केलेच, पण त्यापेक्षा महत्त्वपूर्ण बाब अशी भाईजींनी दारूबंदी आंदोलन वारणा खोऱ्यात सुरू केले होते. या आंदोलनात एक धडाडीचे शे. का. पक्षनेते प्रा. एन. डी. पाटील यांचे बंधू कै. गणपतराव पाटील सैनिक म्हणून दाखल झाले होते. गावोगावच्या दारू अड्ड्यावर धाडी घालून बंद पाडायचे. हे अड्डे चालविणाऱ्यांना दहशत बसावी म्हणून दंड आकारणी करायची. या दंडाची रक्कम विधायक कामासाठी वापरायची. त्या दंडातील रक्कम सौ. पाटीलबाईंच्या वर्गाची समस्या सोडविण्यासही उपयुक्त ठरली. गावात चांगले शैक्षणिक केंद्र उभे राहिले. जिल्ह्यातील एक नामांकित प्राथमिक शाळा म्हणून गौरवास पात्र झाली. जिल्हा परिषद सांगलीने या कामाचा यथोचित गौरवही पुरस्कार देऊन केला.

भाई रंगरावदादांचे घराणे सर्वार्थाने संपन्न. चुलते रावसाहेब व्ही. टी. पाटीलसाहेब - मौनी विद्यापीठ व ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक, कोल्हापूर जिल्ह्यातील एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व, वडगांवच्या इतिहासप्रसिद्ध लढाईतील शिगावचे हे चव्हाण घराणे. त्यांच्या कुटुंबातील बळवंतराव पाटील हे सत्यशोधक चळवळीचे पुढारी, १९२० च्या आसपास सत्यशोधकांची मोठी परिषद शिगाव येथे भरल्याचा उल्लेख सापडतो. हा समाजसेवेचा वारसा घेऊन सौ. पाटीलबाई या पेशात उतरल्या. फुले-कर्मवीरांची शिकवण घेऊन शिक्षकी पेशात राबल्या. 'आधी प्रपंच करावा नेटका' या उक्तीप्रमाणे या पती-पत्नींनी आपल्या मुला-मुलींना उच्च विद्याविभूषित केले. शिक्षकी पेशाचा हा वसा त्यांचे चिरंजीव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील व दोन कन्या यांनी पुढे चालविला आहे.

सौ. कल्पनादेवी पाटीलबाईंनी जीवनातील कटुतेचे दाहक विषही तितक्याच समर्थपणे पचविले. १९७२ च्या दुष्काळामध्ये इस्लामपूर येथील मोर्चामध्ये त्यांचे चिरंजीव हुतात्मा झाले. चि. राजेंद्रच्या वियोगाचा धक्का त्यांनी पचवला आणि मनाचा तोल ढळू दिला नाही. मनाचा खंबीरपणा आणि फुले, कर्मवीरांचा वारसा घेऊन कार्यरत राहिलेल्या सौ. कल्पनादेवी आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांच्या विचारातून बहुजन समाजाचे शिक्षण घडविले जाणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

★☆★☆



# मराठीतील रोमँटिक काव्यप्रतिभा आविष्कार

कु. रूपाली टोमके - बी. ए. भाग - २

अर्वाचीन मराठी साहित्यात केशवसुत ते कुसुमाग्रज (विशाखा) हा कालखंड मराठी कवितेतील 'रोमँटिक युग' म्हणून ओळखला जातो. एकोणिसाव्या शतकात इंग्रजी साहित्य आणि संस्कृतीच्या प्रभावाने, नव्या विद्या आणि भौतिक शास्त्रांच्या परिचयाने ऐहिक जीवनाविषयी निर्माण झालेली ओढ, स्वातंत्र्य-समता-विश्वबंधुत्व या तत्त्वत्रयीवर आधारलेला ध्येयवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिवादी मानवतावाद, समाज, राष्ट्र यासंबंधीच्या नव्या कल्पना-विचारातून प्रबोधनाचे, परिवर्तनाचे वारे सर्वत्र पसरले होते. या प्रबोधन युगाच्या पर्यावरणामध्ये इंग्रजी रोमँटिक काव्याच्या प्रेरणा आणि प्रभावातून अर्वाचीन मराठी कवितेत 'रोमँटिक युग' अवतरले.

केशवसुत यांनी मराठी कवितेत सर्वप्रथम रोमँटिक युगाची 'तुतारी' फुंकली. रोमँटिक प्रतिभेचा आविष्कार ही एक निर्मिती, सर्जनता होती. कविच्या ठिकाणी उपजत असलेल्या कल्पनाशक्तीच्या बळावर ती साधता येणे शक्य असते. असे सर्जनशील आणि संवेदनक्षम व्यक्तिमत्त्व केशवसुतांकडे होते. त्यामुळेच पाश्चात्य रोमँटिक काव्यातील आत्माविष्कार, निसर्ग, उत्स्फूर्तता, सहजता, प्रतिभा, स्फूर्ती, कल्पकता, तरल संवेदनशीलता, नाविन्य, ताजेपणा, बंडखोरवृत्ती इत्यादि अनेक रोमँटिक वैशिष्ट्यांनी प्रभावित झालेल्या केशवसुतांनी मराठी कवितेत त्या विशेषांचा विविधरंगी आविष्कार घडवून मराठी कवितेला आधुनिकतेचे नवे वळण देणारे 'रोमँटिक युग' निर्माण केले.

अर्वाचीन मराठी रोमँटिक कवितेतील केशवसुत, गोविंदाग्रज, आणि बालकवी हे तीन प्रमुख कवी. विषय, आशय, रचनातंत्र, शैली व जीवनाविषयक वृत्तीतून मराठी कवितेत बहुविध परिवर्तन घडवून रोमँटिसिझम अधिक विकसित करणारे ते प्रमुख रोमँटिक कवी होत. प्रत्येक कवीच्या रोमँटिसिझमचे स्वरूप वेगळे. त्यांच्या रोमँटिक कवितेची घडणही वेगळी. त्याची प्रचिती त्यांच्या 'झपूर्झा', 'हरपले श्रेय', 'तारकांचे गाणे', 'फुलणारी', 'तडाग असतो तर', 'गोफ', 'पहिले चुंबन' इत्यादि अनेक कवितांच्या शीर्षकातूनच येते. बालकवींची कोमल सौंदर्यवादी कविता म्हणजे निसर्गातील विविधरंगानी फुललेले एक मधुर स्वरगीत, गोविंदाग्रजांनी आपल्या शब्दकलेसह, रंग-ढंगाने रोमँटिक आविष्काराची नवलाई मराठी कवितेला प्राप्त करून दिली. तसेच समकालीन कवी बी, टिळक, दत्त विनायक इत्यादिंच्या कवितेवर प्रभाव पाडणाऱ्या केशवसुतांनी पाश्चात्य रोमँटिक काव्याच्या अनुकरणातून मराठी कवितेच्या रूढ रचनातंत्रात बंडखोरी करून मराठी कवितेला नव्या वाटा, नवी वळणे प्राप्त करून दिली. हा क्रांतीकारी बदल घडविताना केशवसुतांनी कवी आणि काव्यविषयक जे चिंतन केले, विचार मांडले तेच विचार मराठी कवितेत रोमँटिक युग निर्मितीला विकसित होण्यास अधिक प्रेरक ठरले.

केशवसुतांनी कवितेला 'आकाशाची वीज' मानली आणि तिच्या संसाराला ऐहिक आणि परोक्ष अनुभूतीची सर्व क्षेत्रे अमर्याद आणि मुक्त असतात याची जाणीव करून दिली.

**आम्हाला वगळा गत:प्रभ झणी होतील तारांगणे**
**आम्हाला वगळा विकेल कवडी मोलावरी हे जिणे !**



अशा दिमाखात, आत्मविश्वासाने त्यांनी कवीची प्रौढी, महात्म्य वर्णिले आणि स्वत:चा, कवीत्वाचा व्यक्तिवादी दृष्टिकोन मांडला.

**कांचेमधूनीहि दिसते जनाला,**
**धोंड्यामधूनीही दिसे कवीला !**

हे सांगून काव्यदृष्टी ही अलौकिक असते याचीही जाणीव करून दिली. शिवाय प्रेम भावनेप्रमाणेच कवी आणि कविता यांचे नाते अंत:प्रेरित असते. ते पूर्वनियोजित नसते. कारण

**युवा जसा तो युवतीस मोहे**
**तसा कवी हा कवितेस पाहे**

इत्यादि अनेक सौंदर्यवादाच्या रोमँटिक कल्पना केशवसुतांनी आपल्या काव्यातून मांडल्या. त्यामधून एका बाजूला ते कवी आणि काव्य यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देत होते, तर दुसऱ्या बाजूने पाश्चात्य रोमँटिक काव्याच्या आधारे मराठी कवितेच्या अंतर आणि बाह्यरंगामध्ये परिवर्तन घडवून आणत होते. 'फुलपाखरू', 'पुष्पाप्रत', 'दवाचे थेंब', 'सतारीचे बोल', 'हरपले श्रेय' झपूर्झा इत्यादि अनेक गूढवादी आणि रोमँटिक कवितांतून निसर्ग, स्वप्नमयता, संवेदनशीलता, स्वच्छंदीपणा, गूढगुंजनात्मकता अशा रोमँटिक प्रवृत्तींचा प्रभाव आणि सोबत कवी स्वातंत्र्याचा मांडलेला जाहीरनामा रोमँटिक कवींना अधिक प्रेरणादायी ठरला.

बालकवींच्या काव्यातील कोमलता आणि वेदनेतून आढळणारी रोमँटिक सौंदर्यवादी वृत्ती केशवसुतांच्या रोमँटिक कवितेपेक्षा भिन्न स्वरूपाची आहे. मात्र त्यांच्या काव्यातील रोमँटिक वृत्तीची उत्कटता समान आहे. रोमँटिक तरल कल्पनाविलासात गुंगणारी, अवखळ स्वच्छंदात बागडणारी सौंदर्यवृत्ती जशी केशवसुतांची होती तशीच बालकवींची होती.

**सुंदरतेच्या सुमनावरचे दवं हे चुंबून घ्यावे**
**चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे**
**प्रीतिसारिका गीत तयांचे ऐकावे कानी**
**बनवावे मन धुंद रंगूनी काव्यसुद्धा पानी**

अशा मोहक कल्पनाविलासात बागडणाऱ्या, निसर्गातील मांगल्य, दिव्यत्व, सौंदर्याच्या अद्‌भूत वातावरणातील वैयक्तिक अनुभूतीचे आविष्करण करणाऱ्या, स्वच्छंदी, कोमल सौंदर्यवृत्तीचे दर्शन घडते. वस्तुजातीचे वर्णन करीत असताना वास्तववादाचा अवलंब न करता कल्पनावादाचा (idealism) अवलंब करणे हे रोमँटिक काव्याचे मूलभूत वैशिष्ट्य बालकवींनी अंगीकारले होते. त्यामुळेच पुढील काळातील बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, मर्ढेकर, मंगेश पाडगांवकर, इंदिरा संत इत्यादी कवींवर बालकवींच्या निसर्गकवितेचे संस्कार झाले होते. अशा बालकवींच्या बालसुलभ भावनेच्या कवितेने केशवसुत समकालीन कालखंडात मराठी कवितेला एक नवे 'बालपण' प्राप्त करून दिले होते. त्यामुळे मराठी रोमँटिक कवितेच्या अस्सल कालखंडात सौंदर्यवादी मनोवृत्तीचा मार्ग चोखळणारा आणि रोमँटिसिझमचे एक अस्सल प्रतिनिधी म्हणून बालकवींचा उल्लेख करता येईल.

मराठी रोमँटिक कवितेच्या विकसन्मुख काळात गोविंदाग्रजांची रोमँटिक कविता म्हणजे अनेक अकल्पित पदरांचा गुंफला गेलेला गोफ होता. उत्साह, जोष आणि आत्मविश्वास या प्रत्येक अनुभूतीतील भावात्म, नात्यात्म आणि विसंगतीपर धाग्यातून उत्कट होणारी त्यांच्या कवितेतील उत्कट वृत्ती समकालीन कवीपेक्षा नाविन्यपूर्वतेने नटलेली होती.

गोविंदाग्रजांच्या कवितेतील रोमँटिसिझम हा 'प्रेम आणि मरण', 'पहिले चुंबन', 'क्षण एक पुरे प्रेमाचा' यासारख्या भावतरल व उत्कट वृत्तीशी निगडित आहे. 'एक राजहंस माझा निजला' सारख्या काव्यवृत्तीशी, 'एक महाराष्ट्र देशा' सारख्या राष्ट्रवृत्तीशी, श्रद्धांशी निगडित आहे. एक रुद्रभीषण, लोकविलक्षण प्रमाथी वृत्तीशीही निगडित आहे. असे त्यांच्या रोमँटिकवृत्तीचे अनेक पदर आहेत. त्यातून त्यांच्या काव्यसृष्टीची भावसंकुलता आणि भावसंपन्नता अनेक परीने प्रकट झाली आहे. शिवाय पाश्चात्य साहित्य आणि



संस्कृतीच्या प्रभावाने प्रेमाकडे पाहण्याचा जो आधुनिक दृष्टिकोन निर्माण झाला होता. त्याचा पराकोटीचा तीव्र आविष्कार गोविंदाग्रजांच्या प्रेमकाव्यातून व्यक्त झाला. आधुनिक तरुणांच्या स्वप्नाळू, प्रीतिभावनेचे मधुर, संमोहन, तरल, हुरहुर लावणाऱ्या कल्पनाजालात गुंफून काव्यरसिकांना चटका लावणारा असा हा आविष्कार गोविंदाग्रजांनी प्रेमकाव्यातून घडविला.

गोविंदाग्रजांच्या आत्माविष्कारात 'व्यक्तिगत' हा विशेष रेंदाळकरांच्या कवितेप्रमाणे लक्ष वेधून घेणारा आहे.

**विद्यादनि तसे विशेष गति त्या बाल्यांत आम्हां तशी**
**प्रेमाचा पहिला धडा गिरविला निर्दोषशा मानसी**

अशा तपशिलातून एकाचवेळी खाजगी वाटावा आणि पुन्हा काव्यात्मक रोमँटिक वाटावा असा भाव त्यांच्या कवितेत जो व्यक्त होत होता तो मराठी कवितेला नवीनच होता. शिवाय गोविंदाग्रजांनी संत, पंडिती, शाहिरी परंपरेतून घडत गेलेल्या मराठी कवितेच्या शैलीवर नाविन्य, चमत्कृती, कल्पनाविलासात्मकतेचे नव्या रोमँटिसिझमचे संस्कार केले. एक नवा नाकझोक रोमँटिक शैलीला प्राप्त करून दिला. अशी आविष्काराची वळणे घेणारी गोविंदाग्रजांची कविता 'रोमँटिक युग' निर्माण करण्यास अधिक महत्त्वाची ठरली.

केशवसुतांनी मराठी कवितेत रोमँटिक युगाची जी 'तुतारी' फुंकली होती. तिचे सूर मर्ढेकरांची कविता येईपर्यंत समग्र मराठी काव्यविश्वात निनादत राहिले. केशवसुत, दत्त, टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, बी, केशवकुमार, माधव ज्युलियन, यशवंत, अनिल, कांत, तांबे बोरकर, कुसुमाग्रज (विशाखा) अशी मराठी रोमँटिक कवितेची वेगवेगळ्या प्रकृतीनुसार जडण-घडण होत राहिली. तिच्या कक्षा अधिक रुंदावत गेल्या. लोकप्रियतेबरोबर ती अधिक समृद्ध झाली.

रोमँटिक कवींनी आधुनिक काव्यदृष्टी स्वीकारून आपल्या प्रकृतीनुसार काव्याचे भावविश्व निवडले. आविष्कारात उत्स्फूर्ततेचे, सहजतेचे आणि स्वच्छंदीपणाचे तत्त्व अंगिकारले होते. हेच स्वातंत्र्य नवा हुरुप, नवा उत्साह फुलवित होते. 'बी' कवींनी या रोमँटिक कवितेच्या क्रांतिकारी उत्साहाच्या थाटाचे वर्णन केले आहे.

**"नव्या उमेदी, नवे जिव्हाळे, नव्या मराठ्यांचे**
**नवे भरोसे, नवे कवन हे, नव्या उमाळ्याचे"**

मराठी रोमँटिक कवितेचा कालखंड मावळला असला तरी कवितेतील रोमँटिसिझम हा नाहीसा होणार नाही. ती एक मूलभूत प्रवृत्ती आहे. सर्जनता आहे. त्यामुळे अर्वाचीन मराठी कवितेच्या इतिहासातील रोमँटिसिझम ही एक...

**रम्य धुक्याची...**
**अद्भूत पहाट होती.**

★☆★☆

# चिंतन

* प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही गुणदोष असतातच. काही माणसे धीट असतात, तर काही भित्री असतात. जे शूर असतात ते साहसी असतात. धाडसाने सर्व संकटाना सामोरी जातात त्यांना ईश्वर मदत करतो. जे लोक भेकड असतात, त्यांना कोणीही मदत करीत नाही म्हणूनच 'हिंमत मर्दा तो मदत खुदा' असे म्हटले आहे.

* पुन्हा पुन्हा वाचणे, वाचलेले स्मरणात ठेवणे व स्मरणात ठेवलेले पुन्हा कागदावर लिहिता येणे याला खरा अभ्यास म्हणतात. पुस्तके नुसती वाचून काम भागत नाही. ती पुन्हा पुन्हा वाचून स्मरणात ठेवून त्यातील उपयुक्त भाग कागदावर लिहिता येणे महत्त्वाचे व आवश्यक आहे.



# न्हाय मी शाळंत जानारंच हाय !

कु. वसुंधरा इंचनाळे - बी. ए. भाग-३

**बाप** - आंजे, अगं ए आंजे, कुठं उलतलीया कारटी कुनाल ठाव !

**अंजू** - काय रं बाबा, कशाला मगाधरनं कोकुलतोयास, काय ते नीट दमानं सांग की.

**बाप** - आगं भांगलायला जायचं हाय न्हव आपल्याला पाटलाच्या मळ्यात. तितला घे इळा अन चल बिगी बिगी माज्या संगं. नाईतर पाटील गावात न्हाऊ द्यायचा न्हाय आपल्याला. मागनं तुजी आय आनंल मळ्यात भाकर.

**अंजू**- पर बाबा तुला कळत नसल्यावानी का वागतुयास ? माज्या शाळंची टाइम झालीया. मला घरातलं सारं काम आटपून शाळंत जायचं हाय.

**बाप** - आत्ता गां ह्या पोरिच्या, लयी श्यानी झालीस व्हय अं.... म्या तुझा बा हाय, तवा म्या सांगंल तसंच वागलं पायजंस.. सांगून ठिवतुया.

**अंजू** - न्हाई पर, बाबा माजी शाळा !

**बाप** - चुलीत घाल तुजी शाळा, शाळंत काय सोनं बिनं पुरलया व्हय ! मला तस सांग म्हंजी म्या बी यितु तुज्या त्या शाळंत.

**अंजू**- बाबा मला काय बी बोल पर माज्या शाळंला काय बोलू नगूस. म्या शाळंत जानार म्हंजी जानार. म्या काय तुजं ऐकायची न्हाय.

**बाप** - आरं हेच्या भनं लय त्वांड सोडाय लागलीया.

(माझा न्हानगा भाऊ धोंड्यानं चुली म्होरची फुकनी आनली अन् माझ्या 'बा'ला दिली. बाबानं माज्या पाटीत फुकनीचं दोन रप्पाटं दिलं.)

**अंजू** - आगं आई गं.. मेलो की गं धावा... धावा....

**आई**- आवं काय करतासा. पुरगीचा जीव घेतयस काय ? खुळ बीळ लागलंय व्हयं. एकलीच तर हाय आपल्यास्नी.

**बाप** - बरं बरं. तु आलीयास म्हणून आतापतुर सोडतो हिला. सांचाला दावतो माझा इंगा. पर ध्यानात ठेव मागनं पाटलाच्या मळ्यात यायला सांग हिला.

(आईनं मला मायेनं जवळ घेतलं आणि बाबाला समजावलं. तसा बाबा डोक्यात राग घालून मला शिव्याशाप देऊन मळ्यात गेला.)

**अंजू** - आय पोरिनी काय शाळंत जायाचं न्हाय व्हंय. धोंड्या अनं शिरप्याला फकस्त शाळंत पाठवितायशी. म्या काय केलंय तुमचं.

**आई**- आंजे, अगं तसं न्हाय. तुजा बाबा म्हनतुया झालीया त्येवढी चवती पातुर शाळा बस झालीया. बायकांनी फकुस्त राबायचं. आपल्या बायकांचं नशीबच असं फुटकं असतया बगं..... चुली म्होरं बसून पोरास्नी सांबाळायचं.

**अंजू**- अगं आई, आता तसा जमाना न्हाईला न्हाई. आमच्या शाळंत येक नवीन गुरूजी आल्यात. ते लयी चांगलं हाईत. अनं इंग्लीश बी शिकिवत्यात आमास्नी. लयी मज्जा येतीया.

**आई**- इंग्लीश म्हंजी गोरा सायब बोलायचा ती न्हवं. आन तु इंग्लीश शिकून काय फारिनला जायची हाईस व्हयं. आता तुजं लगीन करायच हाय.

**अंजू** - 'लगीन' आन माजं. ते काय न्हाय. आगं आय इंग्लीश शिकलं म्हंजी फारिनला जात्यात असं न्हाय. (आठ दिस मी शाळत गेलीच न्हायं)



**गुरूजी** - अंजू, अगं ए अंजू, इथेच राहते ना ती.

**अंजू** - कोण गुरूजी ! या की आतमंदी... बसा.

**गुरूजी** - आठ दिवस तू शाळेत आली नाहीस ना म्हणून मी तुला विचारायला आलोय.

(माझा बा घरातल्या एका कोपऱ्यात तंबाखू चोळीत बसला व्हता.)

**अंजू** - गुरूजी, म्या गावाला गिली व्हती न्हवं. माज्या मावशीकड (असं म्हटल्याबरोबर बाबानं माज्याकडं मारक्या म्हशीवानी बगितलं.)

**बाप**- कशाला खोटं बुलतीयास. तुज्या मास्तरासमोर. काय झालं ते खरं खरं सांग की, 'म्या तुला शाळंत धाडलं न्हाय म्हणून.'

**गुरूजी**- अंजु मला तू किती पण खोटं सांगितलंस तरी याचे खरे कारण मला माहीत आहे. तुझे वडील आणि आई तुला शाळेत पाठवत नाहीत ना. त्यांनाच मी समजावून सांगायला आलो आहे.

**अंजू** - गुरूजी नगं, माज्या बाबाला हे आवडायचं न्हाय.

**गुरूजी**- अंजू, तेच तुझे वडील ना. हे बघा, आता आपले जग २१ व्या शतकाकडे चालले आहे. तेव्हा शाळेत जाऊन ज्ञान घेण्याशिवाय आता पर्याय राहिलेला नाही. या ज्ञानाच्या जोरावर आपण खूप पुढे जाऊ शकतो. पण आपण शाळेत गेलो म्हणून आपल्याला नोकरी मिळालीच पाहिजे असे नाही. सध्याच्या युगात असं पोटाला मारून राहायचं नाही. नोकरी मिळाली नसली तरी आपल्याला अवगत असलेली कोणतीही कला आपण वाया घालवायची नाही. त्या कलेच्या जोरावरच आपण आपला विकास करून घेतला पाहिजे. तरंच आपल्या मानवी जीवनाचे सार्थक होईल.

मी काय सांगतोय ते तुम्हाला कितपत समजलं आहे हे मला माहीत नाही. पण मुलांबरोबर मुलींनाही शिकण्याचा अधिकार आहे. स्त्रिया जशा घरातील कामे उरकून नोकरी करायला बाहेर पडतात तसंच पुरूषांनी सुद्धा घरकामात मदत केली पाहिजे. मुलगा व मुलगी असा भेदभाव करून चालणार नाही.

(हे सगळं गुरूजींचं भाषण ऐकून माझा बा गप्पच उभा हुता. त्यानं आसलं कवा बी ऐकलं न्हवतं.)

**बाप**- आंजे, म्या जिता हाय की मेलोय ते बग गं. आक्षी सरगात (स्वर्गात) आल्यावानी वाटतया बगं. शाळंत तुम्हास्नी आसलंच शिकिवत्यात व्हयं.

**अंजू** - व्हय बा. मग मी जाऊ उद्यापासनं शाळंला ?

**बाप**- जा गं जा पोरी. तुज्या आयुष्याचं सोनं होऊ दे. म्या एकलाच करीन मळ्यातली सारी कामं. धोंड्या अन् शिरप्याला सुदिक काम सांगनार न्हाई बग.

गुरूजी, तुमचं बोलनं ऐकून मला लयी बरं वाटलं बगा. (खरंच त्या दिवशी बाबा लयी खुशीत व्हता.)

★☆★☆

एकवेळ शरीराचा महारोग बरा होतो. पण भ्रष्टाचार रुपी महारोग घालवण्यासाठी बंड पुकारायची गरज आहे. पुर्वीप्रमाणे पुन्हा एकदा आपणास लढाई घ्यायला हवी. हे भ्रष्टाचाररुपी राज्य नष्ट करण्यासाइी पुन्हा एकत्र यायला हवे.

एकटे लढा असे कुठे म्हणतेय एकत्र या ! जसे १९४२ साली आला ज्याप्रमाणे चलेजाव चळवळ झाली होती. तशी पुन्हा एकदा आता झाली पाहिजे. फक्त नारा वेगळा असणार तेंव्हा नारा होता "चले जाव इंग्रज" आता नारा हवा आहे तो म्हणजे "चले जाव भ्रष्टाचार".

या दोन्ही चळवळीत फरक एकच आहे पूर्वीच्या चळवळीत माणसासमोर माणूसच शत्रू म्हणून उभा होता. मात्र या चळवळीत माणसासमोर त्याचे स्वतःचेचे मन शत्रू म्हणून उभे राहणार आहे. शेवटी मी एकच गोष्ट सांगीन.

**"उषःकाल होता होता भ्रष्टाचाराची काळारात्र आली**
**पेटवा हे आता ईमानदारीच्या मशाली॥**

**- अश्विनी शि. जाखले**, १२ वी आर्टस्



# दहशतवाद

कु. दिपाली पाटील - बी. ए. भाग - १

नित्यनव्या संशोधनाने चकित होणारं हे जग चित्रविचित्र संकटांनी धास्तावतही असतं. सध्या तर वाढती लोकसंख्या, पर्यावरणाच्या समस्या, भ्रष्टाचार अशा अनेक संकटांना जगाला तोंड द्यावे लागत आहे आणि त्यातच एक महाभयानक संकट जगासमोर उभे आहे ते म्हणजे दहशतवाद ! दहशतवाद हा प्रत्यक्षात दिसणारा परंतु अप्रत्यक्षरित्या काम करणारा जगातील संपूर्ण मानवजातीला लागलेला कलंकच आहे. हा दहशतवाद संपूर्ण मानवजातीलाच नष्ट करेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. दहशतवाद हा नुसता शब्द जरी उच्चारला तरी महाभयानक अशा विध्वंसाची, विनाशाचीच जाणीव होते.

दहशतवाद ही जगासमोर निर्माण झालेली नवीन समस्या नाही, तर त्याचा इतिहास फार पूर्वीचा आहे. पूर्वी धार्मिक, कट्टर असणाऱ्या ख्रिश्चन आणि मुसलमानांमध्ये जमिनीच्या वादावरून तंटे निर्माण झाले होते. यात ख्रिश्चनांनी मुसलमानांना पराभूत केले आणि यातूनच असंतुष्ट मुसलमानांमध्ये दहशतवादाचा उदय झाला. दहशतवाद हा प्रथम माणसाच्या मनामध्ये निर्माण होतो. आपल्यावर कोणीतरी अन्याय करते आहे, वर्चस्व गाजवते आहे या न्यूनगंडातूनच दहशतवादाचा उद्रेक होतो. दहशतवादाचा जन्म हा पाकिस्तान, अफगाणिस्तान यासारख्या राष्ट्रांमध्ये झाला आहे. कारण पाकिस्तानची निर्मिती हीच मुळात अनैसर्गिक माध्यमातून झाली आहे. त्यामुळे पाकद्वारे पसरवला जाणारा दहशतवाद संपूर्ण जगाला आव्हान ठरला आहे.

आपल्या धर्माबद्दल, देशाबद्दल आणि समाजाबद्दल असणारा वृथा अभिमान आणि इतरांबद्दल असणारा द्वेष दहशतवादाची भावना बळकट करतो. धर्माच्या नावाखाली दहशतवादाने संपूर्ण जगाला ग्रासले आहे. ११ सप्टेंबर २००१ ला याचा अतिरेक झाला आणि संपूर्ण जग दहशतवादापुढे हतबल झाले. धर्माच्या नावाखाली अफगाणिस्तानस्थित सौदी वंशीय ओस्मा बिन लादेन या अमेरिकेच्या कट्टर शत्रूने वर्ल्ड ट्रेड सेंटरची गगनचुंबी इमारत आणि जगातील सर्वात शक्तीशाली केंद्र म्हणून ओळखला जाणारा पेंटॅगॉनचा पंचकोनी किल्ला विमान हल्ले घडवून काही क्षणात उद्ध्वस्त केला आणि येथेच संघर्षाची ठिणगी पेटली. अत्याधुनिक आणि महाविनाशकारी शस्त्रास्त्रे निर्माण केली गेली. परंतु त्याहूनही महाभयंकर अशा जैविक अस्त्रांचा वापर सुरू झाला. 'ॲन्थ्रॅक्स' या एकाच शब्दाने संपूर्ण जगभरात भीतीचे आणि दहशतीचे वातावरण तयार झाले. ॲन्थ्रॅक्सद्वारे दहशतवाद मोठ्या प्रमाणात पसरवला गेला. या दहशतवादाचाच एक भाग म्हणून मुस्लिम राष्ट्रात मुस्लिम स्त्रियांना बुरखा वापरण्याची सक्ती करण्यात आली. धर्माचा बुरखा अधर्मासाठी वापरला गेला. बुरख्यात स्त्री आहे की पुरूष आहे, सज्जन आहे की दहशतवादी आहे हे ओळखणेही कठीण झाले. (त्यामुळे दहशतवाद्यांना अतिरेकी कारवाया करणे जास्त सोपे झाले असावे असे मला वाटते.)

सोमनाथ मंदिर, बामिया बुद्धमूर्ती आणि विशेषकरून वर्ल्ड ट्रेड सेंटर उद्ध्वस्त करणाऱ्या दहशतवादी संघटनांचा अमेरिकेला राग आला. कारण वर्ल्ड ट्रेड सेंटर उद्ध्वस्त करून अतिरेक्यांनी जगातील सर्वात मोठ्या महसत्तेला धडक मारली होती. अमेरिकेची कळ काढणाऱ्या या अतिरेकी संघटनांविरूद्ध अमेरिकेने युद्ध पुकारले. जॉर्ज बुशनी पुकारलेल्या 'आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधी लढाईत'



सर्वच राष्ट्रे सहभागी झाली. अमेरिकेला पाठिंबा देण्याची सर्वच राष्ट्रांनी तयारी दर्शविली.

भारतात तर गेली दोन दशके दहशतवाद गाजत आहे. त्यातून १९८० मध्ये पंजाब प्रांतात खलिस्तान चळवळ उदयाला आली. फुटीरतावादाची बीजे असलेल्या या चळवळीने भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेलाच धक्का दिला. भारताचे नंदनवन असणारे काश्मिर तर दहशतवादाच्या पिंजऱ्यात पूर्णपणे अडकले आहे. तेथे रोज निष्पाप लोकांचे बळी जात आहेत आणि अजून किती दिवस जात राहणार आहेत याची कोणालाच कल्पना नाही. १ ऑक्टोबर २००१ ला तर त्यांनी काश्मिरच्या विधानसभेवरच हल्ला केला.

दहशतवादी संघटना जगातील अनेक राष्ट्रात उदयास आल्या. त्यातील काही काळाबरोबर लोप पावल्या परंतु तालिबान राजवट, हिजबुल मुजाहिदिन सारख्या दहशतवादी संघटना आजही अस्तित्वात आहेत. म्हणजेच जगातील प्रत्येक राष्ट्रात कमी-अधिक प्रमाणात दहशतवाद हा आहेच. दहशतवादाचा मुख्य उद्देश भीती निर्माण करणे, गोंधळ माजवणे आणि अराजकता निर्माण करणे हा असतो. हे अतिरेकी 'शांती हवी असेल तर शस्त्र हातात धरा' हे तंत्र वापरतात. ते शस्त्रांबरोबर जगतात आणि शस्त्रांबरोबरच मरतात. या अतिरेक्यांचा मुख्य उद्देश, एकमेकांना नेस्तनाबूत करणे हाच असतो. परंतु त्यामुळे निरपराध जनता मारली जात आहेत. हजारो निष्पाप नागरिकांचे बळी घेतले जात आहे. दहशतवादाच्या आगीत सामान्य जनता होरपळून निघत आहे. हे अतिरेकी जिहाद पुकारतात. या जिहादचे स्वरूप वेगळेच असते. तो शांततेसाठी नसून हिंसाचारासाठी असतो. हे सर्व पाहिल्यावर हिंदू-मुस्लिम, शिख-इसाई हम सब भाई-भाई हे एकतेचे वाक्य निरर्थकच वाटते.

याच्याही पुढे जाऊन दहशतवाद्यांनी आणखी एक धाडसी पाऊल उचलले, ते १३ डिसेंबर २००१ रोजी. या दिवशी भारताच्या संसद भवनात झालेल्या दहशतवादी हल्ल्याने भारताच्या सार्वभौमत्वावर, भारताच्या अस्मितेवरच प्रहार केला. या हल्ल्यामुळे संपूर्ण भारत हादरून गेला. अतिरेकी कारवायांपासून जगातील कोणतेच स्थान सुरक्षित नाही याची जगाला खात्री पटली.

वर्ल्ड ट्रेड सेंटरची घटना घडण्याच्या सहा-सात महिन्यांपूर्वी वाजपेयी अमेरिकेला गेले होते. तेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश आणि वाजपेयी यांच्यात दहशतवादाबद्दल चर्चा झाली. तेव्हा वाजपेयी म्हणाले, दहशतवादी संघटनांचे साम्राज्य जगभर पसरले आहे. राष्ट्रांच्या सीमा त्यांच्या कार्यात अडथळा आणू शकत नाहीत. कदाचित अमेरिकेलाही या दहशतवादाला तोंड द्यावे लागेल. परंतु बुश वाजपेयींना अभिमानाने म्हणाले, अमेरिका ही जगातील महासत्ता आहे. आम्ही केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर लष्करीदृष्ट्यादेखील परिपूर्ण आहोत. त्यामुळे जगातील कोणतीही अतिरेकी संघटना अमेरिकेच्या नादाला लागणार नाही. दहशतवाद्यांची वाकडी नजरही आमच्यावर पडणार नाही. त्यांच्या पायाची धूळही अमेरिकेत शिरणार नाही. पण ११ सप्टेंबरला जॉर्ज बुशना या अतिरेकी संघटनांच्या काळ्या कृत्याचा अंदाज आला. त्यांचा अभिमान खोटा ठरला आणि वाजपेयींचे म्हणणे भविष्यवाणी ठरली म्हणायला हरकत नाही.

दहशतवादाला आळा घालण्यासाठी, या संघटनांना जो वित्तपुरवठा होतो तो प्रथम पूर्णपणे बंद करायला पाहिजे. अतिरेकी विविध प्रकारच्या गैर व्यवहारातून आणि गैर कृत्यातून पैसा उभा करतात आणि त्याद्वारे दहशतवाद घडवून आणतात, दहशत पसरवतात. येथे काश्मिरचंच उदाहरण घ्या ना. येथे दहशतवादी कारवाया करण्यासाठी महिन्याला ३० ते ४० कोटी रू. खर्च येतो. हिजबुल मुजाहिदिनसारख्या मोठ्या संघटनांना महिन्याला ३ कोटींची गरज असते. ओसमा बिन लादेनने ११ सप्टेंबरच्या उत्पातासाठी ५ लाख डॉलर्स वापरले होते. अशा प्रकारे वर्ल्ड ट्रेड सेंटर ते भारतीय संसद असा दहशतवादाचा प्रवास पाहिला तर वाटते, दहशतवाद ही जागतिक पातळीवरील गंभीर समस्या बनली आहे. दहशतवादाविरोधी लढाई जरी सुरू केली तरी पृथ्वीतलावावरील संपूर्ण दहशतवाद नष्ट



होईलच असे नाही. कारण दहशतवादाचे अस्तित्व काल होते, आज आहे आणि उद्याही राहील यात शंका नाही. कदाचित त्याचे स्वरूप वेगळे असेल. आज दहशतवाद्यांच्या हातात शस्त्रे आहेत, उद्या अणुबॉम्ब; रासायनिक व जैविक अस्त्रेही असतील. म्हणून हा दहशतवाद पसरवणाऱ्या राष्ट्रांबरोबर कोणत्याही प्रकारचे आंतरराष्ट्रीय संबंध ठेवता कामा नयेत. या संघटनांची बँक खाती गोठवली पाहिजेत. दहशतवादासाठी लागणारा अर्थपुरवठाच जर बंद केला तर दहशतवाद आटोक्यात आणण्याचा एक यशस्वी प्रयत्न ठरेल.

परंतु हे सर्व प्रयत्न केले तरीही माणूस जोपर्यंत आपला अहंकार, स्वार्थ सोडत नाही. जात-पात, धर्म-भाषा विसरून एकत्र येत नाही तोपर्यंत दहशतवाद नष्ट करण्याची स्वप्ने पाहणे, दहशतवादाचा नायनाट करून त्याची पाळेमुळे खणून काढणे अशक्यच नव्हे, तर असंभव आहे. म्हणूनच मला म्हणावेसे वाटते

**दहशतवाद- दहशतवाद**
**जिकडे-तिकडे दहशतवाद**
**सामाजिक दहशतवाद**
**राजकीय दहशतवाद**
**आर्थिक दहशतवाद**
**धार्मिक दहशतवाद**
**गाडा-गाडा या दहशतवादाला,**
**जोडा-जोडा मानवतेला !**

★☆★☆

## चारोळी

ओठावरील तीळ तुझा
मला फार आवडायचा
रुसवा तुझा घालवण्याची
कला मला जमायची

- **अश्विनी शि. जाखले,** १२ वी आर्टस्

## बोधकथा

एका कंजुष गृहस्थाने एक मनगटी घड्याळ विकत आणले. ते घड्याळ तो सदैव स्वतःच्या खिशात ठेवीत असे. एकेदिवशी त्या घड्याळातील सेल संपल्याने ते घड्याळ बंद पडले. घड्याळ बंद पडल्यावर तो गृहस्थ एका घड्याळजीकडे गेला. घड्याळजीने घड्याळ तपासले व सेल बदलण्यास ३५ रु. खर्च येईल असे सांगितले. पैशाची गोष्ट निघाल्यावर तो कंजुष गृहस्थ घड्याळ घेऊन परत आला. घरातील छोट्या स्क्रू ड्रायव्हरने त्याने घड्याळ खोलले व कॅलक्युलेटरमधील जुना सेल घड्याळात घालण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. या प्रयत्नात आजूबाजूचे काही छोटे भाग निसटले व घड्याळ घेऊन पुन्हा घड्याळजीकडे गेल्यावर घड्याळजीने ते घड्याळ दुरुस्त होत नाही असे सांगितल्यावर त्या गृहस्थाला स्वतःच्या कृतीचा प्रश्चाताप झाला.

**तात्पर्य :** अविचारीपणाने डोके चालवून जो घाईघाईने कृती करतो त्याचे अधिकात अधिक नुकसान होते.

## चिंतन

पुस्तकातले डोक्यात भरणे म्हणजे शिक्षण नव्हे. तर शिक्षण म्हणजे विराट जीवनातल्या गतिमानतेचे दर्शन घडावे यासाठी जाणिवेने दार उघडणे. शिक्षण म्हणजे खऱ्या सुखी जीवनाची कला. मुक्तपणे द्वेषरहित मनाने व गोंधळून न जाता शांत जीवन जगणे म्हणजे शिक्षण. सम्यक शिक्षण म्हणजे जीवनाची सर्वस्वी नवी वाट चोखाळणे.



# वेरूळची जगप्रसिद्ध लेणी

कु. पूजा अ. जोशी - १२ वी आर्टस्

वेरूळ म्हटले की, डोळ्यांसमोर उभी राहते "कैलास लेणी". एकाच पाषाणात कोरलेले हे मंदिर भारतीय शिल्पकलेचा अद्वितीय नमुना आहे. भारतीय कलेचा हा ठेवा नजरेत भरून ठेवण्यासाठी देशातीलच नव्हे, तर परदेशातील पर्यटकही गर्दी करतात.

औरंगाबाद शहरापासून सुमारे २८ किलोमीटर अंतरावर वसलेले वेरूळ हे गाव लेण्यांसह बारावे ज्योतिर्लिंग श्रीघृष्णेश्वर व लक्षविनायक या मंदिरांमुळेही प्रसिद्ध आहे. वेरूळच्या डोंगरात ३४ लेण्या आहेत. त्यातील १२ लेण्या बौद्ध धर्माच्या, ५ लेण्या जैन धर्माच्या, व उर्वरित १७ लेण्या ब्राह्मणी पद्धतीच्या आहेत. बौद्ध लेणी इ. स. ५५० ते ८०० या कालखंडात खोदण्यात आल्या. इ. स. ६५० नंतर ब्राह्मणी लेण्यांची निर्मिती करण्यात आली. जैन लेण्या नवव्या व दहाव्या शतकातील आहेत. राष्ट्रकूट वंशातील पहिला अमोघवर्ष व दुसरा कृष्णराज यांनी या लेण्यांची निर्मिती केली.

कैलास लेणी :- कैलास ही १६ व्या क्रमांकाची लेणी. आठव्या शतकात ही लेणी खोदली. एकाच खडकातून कोरलेले हे मंदिर डोंगरापासून वेगळे आहे. "आधी कळस, मग पाया" या पद्धतीने या लेण्यांची निर्मिती करण्यात आली. अर्थात, मंदिराच्या कामाला कळसापासून सुरवात झाली. मंदिराभोवती पाषाणाची नैसर्गिक भिंत आहे. भिंतीत अर्धस्तंभांनी विभागलेली देवकोष्टे आहेत. त्यात शिव, विष्णू, इंद्र- इंद्राणी, महिषासूरमर्दिनी, नृसिंह, वराह, त्रिविक्रम, ब्रह्मा आदि देवतांची शिल्पे आहेत.

कैलास लेण्यांचे चार भाग आहेत. १) गर्भगृह, २) सभागृह (नृत्यमंडप), ३) रंगमंडप, ४) द्वारमंडप. या सर्वांचे अधिष्ठान (पाया) दगडी आहे. त्याच्या एका बाजूने (शिल्पात) रामायणाची व दुसऱ्या बाजूला महाभारताची कथा कोरलेली आहे. हे चार भाग चार वेदांचे प्रतीक मानले जातात. कैलास लेण्यातील गर्भगृहाभोवतीच्या प्रदक्षिणा मार्गावर सात छोटी मंदिरे आहेत. गर्भगृहात अंधार असून, प्रत्यक्ष गर्भगृहात शिवलिंगाव्यतिरिक्त कुठलेही कोरीव काम नाही. त्या शिवलिंगाची उंची सुमारे पाच फूट व व्यास सुमारे तीन फूट आहे.

सभामंडप अतिविशाल व भव्य उंचीचा आहे. त्याच्या छतावर तेरा थर असलेला (भाजलेली माती) गिलावा आहे. त्यावर अजिंठ्यातील भित्तिचित्रांसारखी रंगीत चित्रे आहेत. या चित्रात विविध धार्मिक कथाप्रसंग आहेत. मात्र, ही चित्रे अजिंठ्याच्या कालावधीच्या फार पुढील असल्याने त्यांची शैली वेगळी आहे. जैन व गुजराती चित्रशैलीशी ही चित्रे मिळतीजुळती आहेत. सभागृहात व गर्भगृहात प्रकाशव्यवस्थेसाठी मोठ्या आरशाचा किंवा चमकणाऱ्या धातूचा वापर केला जात असे. सभागृहाबाहेर मोठा नंदी कोरलेला आहे.

मंदिराच्या दोन्ही बाजूस मानस्तंभ आहेत. हे स्तंभ शत्रूवरील विजयाचे प्रतीक समजले जातात. राष्ट्रकूट राजे हे बदामीच्या (विजापूर) चालुक्याचे मांडलिक होते. त्यांनी चालुक्यावर विजय मिळविला व स्वतंत्र झाले. या विजयाप्रीत्यर्थ त्यांनी कैलास लेण्याचे हे काम केले. हे काम सुमारे १५० वर्षे सुरू होते. कलावंतांच्या सहा पिढ्यांनी तेथे काम केले. मानस्तंभाच्या बाजूस दोन भव्य हत्ती कोरले आहेत. हे हत्ती समृद्धीचे व शक्तीचे प्रतीक मानले जातात. हत्ती हे पाच राजचिन्हांपैकी एक आहेत.

गर्भगृहात प्रवेश करताना द्वाराच्या दोन्ही बाजूस गंगा-यमुना शिल्प आहे. मंदिरात प्रवेश करताना गंगेच्या व यमुनेच्या पाण्याने न्हाऊन पवित्र झालो आहोत; अशी धारणा करूनच प्रवेश करावा, अशी यामागे कल्पना आहे. कैलास

लेणी समूहातील अनेक शिल्पे प्रसिद्ध आहेत. डोंगरावरून लेण्यांचे विलोभनीय दृश्य दिसते. मंदिराचा मुख्य कळस हा द्रविड शिल्पशैलीत असून, त्याच्या टप्प्याटप्प्यांवरील नक्षीत कळसाचीच प्रतिकृती आहे. सभागृहाच्या छतावर मध्यभागी सूर्यासारखी गोल नक्षी आहे. त्याच्या चारी बाजूस दगडात कोरलेले सिंह आहेत. मंदिराच्या तिन्ही बाजूंना लेणी आहेत. या लेण्यांतील शिल्पसमूहात शिव-पार्वती विवाह हे शिल्प प्रसिद्ध आहे. या शिल्पात पार्वतीचे अधोवदन दर्शविले आहे. त्याचप्रमाणे, इतर शिल्पात रावण कैलास पर्वत हलविताना विष्णूचे दशावतार यांसह पुराणातील प्रसिद्ध कथाप्रसंग कोरलेले आहेत.

वेरूळ येथे बौद्ध धर्मातील 'हिनयान' व 'महायान' या पंथांच्याही लेणी आहेत. या लेणीसमूहात ''चैत्य'' आणि ''विहार'' आहेत. (''चैत्य'' म्हणजे चिंतनगृह व ''विहार'' म्हणजे निवासस्थान) त्याकाळी बौद्ध भिक्षूंसाठी विहार खोदणे, हे पुण्यकर्म समजले जात असे. त्यामुळे, वेरूळमध्ये दोन मजली भव्य विहार आहेत. चैत्यगृहात स्तूप असून, काही स्तूपांवर बुद्धाची प्रतिमा कोरली आहे.

जैन धर्मातील दिगंबर व श्वेतांबर पंथियांची लेणी वेरूळला आहेत. या लेण्यात सर्व तीर्थंकारांची शिल्पे आहेत. त्यांचे तपशील जाणकार सांगू शकतात. त्यातील ३० क्रमांकाचे लेणे ''छोटा कैलास'' म्हणून प्रसिद्ध आहे. मात्र, त्याचा आकार कैलास लेण्याएवढा नाही.

वेरूळ हे त्या काळी व्यापारी व राजमार्गावरील ठिकाण असल्याने, तेथे प्रत्येक धर्मियांना आपल्या धर्माच्या प्रसाराचे केंद्र असावे असे वाटले. त्यामुळे येथे सर्व पंथियांनी लेणी खोदली, असे इतिहासकार सांगतात. बारावे ज्योतिर्लिंग असलेले श्री घृष्णेश्वराचे मंदिर लेण्यापासून जवळच आहे. सध्याच्या मंदिराचा जीर्णोद्धार अहिल्याबाई होळकर यांनी केला. त्यापूर्वीच्या मंदिराचे मूळ बांधकाम यादवांनी केले. परकीय आक्रमणात मंदिराचे नुकसान झाले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराव भोसले यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्यानंतर पुन्हा परकीय आक्रमणात मंदिराचे नुकसान झाले. या मंदिरापासून काही अंतरावर ''अहिल्या कुंड'' आहे. या कुंडाचे बांधकाम लालसर रंगाच्या दगडात केलेले आहे. या कुंडात घृष्णेश्वराचे धार्मिक विधी केले जातात. श्रावणात व महाशिवरात्रीला येथे यात्रा भरते. या कुंडापासून काही अंतरावरच लक्षविनायकाचे मंदिर आहे. श्री गणेशाच्या २१ पीठांपैकी हे एक मंदिर आहे. चतुर्थीच्या दिवशी येथे भाविकांची गर्दी असते. या मंदिराशेजारी आजही मालोजीराजे भोसले यांच्या गढीचे अवशेष आहेत.

★☆★☆







# संगीत रंगभूमीवरील ज्योत्स्ना निमाली

कु. तेजस्विनी चिमणे - बी. ए. भाग - ३



संगीत रंगभूमीवरील एक ज्येष्ठ गायिका ज्योत्स्ना भोळे यांच्या निधनामुळे संगीत रंगभूमी प्रकाशमान करण्यात मोलाचा हातभार लावणारी एक ज्योतच निमाली आहे असेच म्हणावे लागेल. जवळजवळ सहा दशके आपल्या अलौकिक आवाजाने चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या ज्योत्स्ना भोळे म्हणजे संगीतातील एक चमत्कार होता आणि आता त्यांच्या निधनामुळे हा चमत्कारही संपला आहे. वयाची ऐंशी वर्षे उलटून गेली तरी उत्साहाने भारलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या ज्योत्स्नाबाईंचे नुसते असणेच एक आधार होता. मात्र आता त्यांच्या नसण्याने हा आधारच संपला आहे.

श्रीमती ज्योत्स्ना भोळे या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शास्त्रीय संगीताच्या गायिका आणि रंगमंच कलाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म ११ मे १९१४ रोजी गोवा येथे झाला असला तरी त्यांचे मुंबईत सुरवातीस काही काळ वास्तव्य होते. त्यांनी सुरवातीचे शास्त्रीय गायनाचे शिक्षण कै. विलायत हुसेन खाँ यांच्याकडे घेतले. नंतर आग्रा घराण्याचे उस्ताद खादीम हुसेन खाँ आणि इनायत हुसेन खाँ यांच्याकडेही त्यांनी शिक्षण घेतले. वयाच्या १८ व्या वर्षी संगीत रंगभूमीवर पदार्पण करणाऱ्या ज्योत्स्नाबाईंनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत रंगभूमीची विविध रूपे पाहिली. संगीत रंगभूमीचा ऱ्हास होतानाही पाहिला. एक गायिका म्हणून त्यांना मिळालेल्या लोकप्रियतेत अजिबात फरक झाला नाही.

संगीत रंगभूमीच्या इतिहासाचा आढावा घ्यायचा झाल्यास त्यात बालगंधर्वांच्या आणि केशवराव भोसलेंच्या गाजलेल्या नाटकांच्या जोडीनेच ज्योत्स्नाबाईंचा 'कुलवधू' 'आंधळ्याची शाळा', 'भूमीकन्या सीता' या नाटकांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ज्या काळात बालगंधर्व आणि इतर दिग्गजांचे राज्य होते, त्याच काळात ज्योत्स्नाबाईंनी आपले स्वत:चे एक संस्थान निर्माण केले होते. गोड गळा, सुलभ गायकी आणि स्पष्ट शब्दोच्चार यांच्या जोरावरच ज्योत्स्नाबाईंच्या या संस्थानाचे रूपांतर एका साम्राज्यात झाले आणि हे साम्राज्य त्यांच्या निधनापर्यंत कायम होते.

१९३३ साली वयाच्या १८ व्या वर्षी ज्योत्स्नाबाईंनी 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाद्वारे रंगभूमीवर पदार्पण केले. केशवराव दाते यांच्यासारख्या कडक दिग्दर्शकांच्या नाटकातील ज्योत्स्नाबाईंचे हे पदार्पण चांगलेच यशस्वी ठरले. या नाटकातील तू माझा अन् मी तुझाही, मी खुशीत समींदर या गाण्यांनी प्रचंड लोकप्रियता मिळविली. त्यानंतर मो. ग. रांगणेकर यांच्या नाट्यनिकेतन संस्थेच्या माध्यमातून त्यांनी 'कुलवधू' या नाटकात काम केले. हे नाटक म्हणजे ज्योत्स्नाबाईंच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरला. या नाटकातील 'बोला अमृत बोला' आणि 'मनारमणा मधुसूदना' या गाण्यांनी अक्षरश: आकाशाएवढी लोकप्रियता मिळवली. रांगणेकरांच्याच नाट्यनिकेतन संस्थेच्या 'एक होता म्हातारा' 'भूमीकन्या सीता' व कोण्या एका काळी' या नाटकांमधीलही ज्योत्स्नाबाईंच्या भूमिका गाजल्या. पूर्वाश्रमीच्या दुर्गा केळेकर असलेल्या ज्योत्स्ना भोळे यांचे पती केशवराव भोळे म्हणजे कडक शिस्तीचे संगीतकार होते. ज्योत्स्नाबाईंच्या संगीत कारकिर्दीला केशवरावांचा फार मोठा हातभार लागला.

खरे तर बालगंधर्वांसारखे अभिनेते, गायक, नट लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाच्या काळातच



ज्योत्स्नाबाईंची लोकप्रियता आश्चर्यकारक मानायला हवी. त्याला कारणीभूत ज्योत्स्नाबाईंची गायकीच होती. एक तर त्यांचे गाणे सुलभ होते. त्या प्रत्येक शब्दांचा अर्थही कळायचा. समकालीन गायक या वैशिष्ट्याकडे दुर्लक्ष करायचे, ज्योत्स्नाबाईंनी आपल्या गाण्यातून हेच कटाक्षाने पाळले. साहजिकच त्यांची गाणी लोकांच्या मनामनात, गळ्यागळ्यात आणि घराघरात पोहोचली. त्याशिवाय ज्योत्स्नाबाईंनी ज्या नाटकात कामे केली ती नाटकेही वेगवेगळ्या विषयांवरील होती. 'कुलवधू'सारख्या नाटकाचे तब्बल २०० प्रयोग झाले होते. 'भूमीकन्या सीता' या नाटकानेही लोकप्रियतेचा उच्चांक गाठला होता.

गोव्यातच जन्म झालेल्या ज्योत्स्नाबाईंच्या हृदयातच गाणे असले तरी, एक शिस्तप्रिय जीवन जगून त्यांनी आपल्या या गाण्याला कलेची रूपं दिली. केशवराव भोळे यांच्यासारखा गुणी आणि शिस्तप्रिय संगीतकारच पती म्हणून लाभल्याने ज्योत्स्नाबाईंच्या लोकप्रियतेला एक वेगळीच उंची लाभू शकली. रांगणेकर, केशवराव दाते यांच्यासारखे दिग्गज त्यांना कारकिर्दीच्या आरंभी लाभल्याने त्यांच्या कारकिर्दीला आकार आला. अर्थात त्यात ज्योत्स्नाबाईंचे उपजत गुण आणि कष्ट यांचाही मोठा वाटा होता. गेली काही वर्षे ज्योत्स्नाबाई रंगभूमीपासून दूर होत्या. पण त्यांची लोकप्रियता कायम होती आणि त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या लोकप्रियतेत तसूभरही फरक पडणार नाही हे निश्चित. संगीत रंगभूमीवरील ही ज्योत विझली असली तरी या ज्योतीचा अदृश्य प्रकाश मात्र सर्वांनाच जाणवणार आहे.

★☆★☆

## चारोळी

*रुसणं तुझ्यासारखं*
*कुणाचं नसावं*
*म्हणून वाटतं*
*तुला नेहमी रुसवावं.*

## बोधकथा

एकदा एक साधू फिरता फिरता एका गावात आला. त्या गावात त्याच्या पूर्वीच्या मित्राची झोपडी होती. तो सुद्धा साधूच होता. साधूने विचार केला, या गावात आल्यासारखे आपण आपल्या मित्राला भेटून जावे. मित्राच्या झोपडीचे दार बंद होते. साधूने दाराची कडी वाजवली. आतून प्रश्न विचारला गेला, 'कोण आहे ?' साधू म्हणाला, "मी आहे !" दार उघडले गेले नाही. पुन्हा या साधूने मित्राला हाक मारून दार उघडण्यास सांगितले. पण तो काही दार उघडेना. अखेर वैतागून साधू म्हणाला, "अरे मित्रा, माझ्यासाठी दार का उघडत नाहीस ?" तेव्हा आतून उत्तर आले, "बाहेर कोण आहे. जो स्वत:ला मी म्हणतो ? कारण मी म्हणण्याचा अधिकार सर्वस्वी त्या परमेश्वराला आहे. अन्य कोणालाही नाही. त्यामुळे जो बाहेर आहे, त्याने स्वत:चे नांव सांगावे. मग दार उघडले जाईल !"

**तात्पर्य** : स्वतः कोणीतरी आहोत असा अहंभाव माणसाच्या मनात केव्हाही असू नये.

## बँक म्हणजे काय ?

मुलींनो, ही पहा बँक. बँक म्हणजे पैसे ठेवण्याची जागा. सभ्य नागरिक कष्ट करून पैसा मिळवतात. ते पैसे त्या बँकेत ठेवतात. चलाख बँक अधिकारी लबाड दलालांच्या बरोबर संगनमत करून पैशाचा चट्टामट्टा करतात. बँक अधिकारी पैसे खातात त्याला भ्रष्टाचार म्हणतात. दलाल पैसे खातात त्याला कमिशन म्हणतात. जे प्रामाणिक नागरिक बँकेत पैसे ठेवतात त्यांना मूर्ख म्हणतात.

मग सांगा बरे मुलींनो, तुम्ही मोठेपणी कोण होणार ? बँक अधिकारी, दलाल की मूर्ख ठेवीदार ?





# 'तणकटकार' राजन गवस

कु. नीता कांबळे – बी. ए. भाग एक

''या पुरस्काराची बातमी ऐकल्यानंतर ज्या गावाला मध्यवर्ती ठेवून ही कादंबरी लिहिली; उद्या परवा त्या परिसरात जाऊन ते गाव; ती माणसं पुन्हा एकदा पाहून येतो. त्यांची भेटे घेतो. कारण 'तणकट'चं यश हे खऱ्या अर्थानं त्या परिसराचं यश आहे.''

हे उद्‌गार आहेत 'साहित्य अकादमी पुरस्कार विजेते' 'तणकटकार' राजन गवस यांचे. त्यांच्या एका लेखक मित्राने दूरध्वनीवरुन केलेल्या अभिनंदनाला उत्तर देतांना त्यांनी काढलेले हे उद्‌गार लेखकाचं आपल्या अनुभवाशी, लेखनाशी प्रामाणिक असण्याचं द्योतकच आहे असं म्हटले तर ते निराळं ठरु नये.

तणकटकार राजन गवस यांची जडणघडण गडहिंग्लज सारख्या ग्रामीण भागात झालेली आहे व साहित्यिक म्हणून जडणघडणही साहित्यामार्फत समाजाकडे वास्तववादी भूमिकेतून पाहणाऱ्यासाठीच्या दशकातील कादंबरीकारांच्या विचारसरणीवर. याचाच सुखद परिणाम म्हणून चौंडकं (१९८५), भंडारभोग (१९८९), धिंगाणा (१९९२), कळप (१९९७) आणि तणकट (१९९८) या कादंबऱ्या त्यांच्या सशक्त लेखणीतून निर्माण झाल्या.

राजन गवस यांच्या लेखणीचा मुख्य केंद्रबिंदू हा 'माणसू' आहे. या माणसाचे व तो ज्या समाजात राहतो त्या समाजजीवनाचे अनेक पदर ते आपल्या कांदबऱ्यांच्यामधून रेखाटतांना दिसतात. हे पदर कोणते, तर गावपातळीवरील अमानुष अंधश्रद्धा, जातपात व बेरकी राजकारणामुळे उद्ध्वस्त होणारी तरुणाई इ.

कर्नाटक महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागामध्ये देवदासीची प्रथा आहे. देवीच्या नावाने कुमारिका सोडणं, त्यांचा उपभोग नंतर संपूर्ण गावानं घेणं. या अत्यंत क्रूर समाजव्यवस्थेचा वेध त्यांनी 'चौंडकं'चा कादंबरीमध्ये घेतलेला आहे. यातल्या 'सुली'ची वेदना तिची एकटीची रहात नाही, तर भारतातील ग्रामीण भागातील स्त्रीच्या गुलामगिरीचे प्रातिनिधिक चित्रच वाटू लागते. राजन गवस ज्या परिसरात राहतात त्या परिसराचा व या कादंबरीमधील कथानकाचा विचार करता, त्यांनी हा विषय निर्भीडपणे मांडतांना जी जोखीम पत्करली ती निश्चितच गौरवाची ठरते.

''चौंडकं'मधून त्यांनी 'देवदासींची' समस्या मांडली तशी 'भंडारभोग'मधून 'जोगत्यांची' समस्या मांडली. पुरुषासारखी पुरुष असणारी मंडळी क्रूर प्रथांच्यामुळे लुगड्यांत जन्म घालवितात. जिवंत असतांना व मृत्यूनंतर देखील त्यांची होणारी क्रूर थट्टा ते इथं मांडतात. त्यामधील एकेक अनुभवविश्व समाजमनाला डागण्या दिल्याशिवाय रहात नाही.

'धिंगाणा' सारखी कादंबरी असाच समाजमनाला पोखरणारा प्रश्न घेऊन येते. अपूरे शिक्षण घेऊन बेकार असणारी व पूर्ण शिक्षण घेऊनही नोकरी/उद्योगधंदा न मिळालेली म्हणून बेकारीचं जीणं जगणारी तरुण पिढी शेवटी राजकारणाच्या भूलभूलैयाला भुलून संपूर्ण ग्रामीण भाग कसा दूषित करतात याचं विदारक चित्रण ते इथं करतात, की जे वाचकाला अस्वस्थ करुन सोडते.

ग्रामीण भागातील सैरभैर वृत्तीच्या तरुण पिढीची शोकांतिका ते पुढे 'कळप' या कादंबरीत मांडतात. समाजसुधारणा करण्याच्या उदात्त हेतूनं निर्माण झालेल्या चळवळीचा स्वार्थी हेतूने राजकीय पक्ष व इतर लोक कसा

उपयोग करुन घेतात. याचं चित्रण इथं कादंबरीकार करतात. या 'कळप' संस्कृतीमध्ये संवेदनशील मनोवृत्तीची कशी कोंडी होते, ते या कादंबरीचा नायक 'रघू चिलमी' याच्या व्यक्तिरेखाद्वारे दाखवून दिलेले आहे.

'तणकट' ही त्यांची 'साहित्य अकादमी' पुरस्कार प्राप्त कादंबरी ताकदवान अशी कलाकृती आहे. भारतीय समाजाच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारी ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरते. इथे चित्रित केलेले खेडे हे जाती व्यवस्थेमध्ये विभागलेले आहे. उच्चनीचतेच्या उतरंडी इथे आहेत, आपापसात धार्मिक व जातीय भांडणे आहेत. थोडक्यात भारतीय खेड्यांचं प्रतिनिधित्व करणारे हे चित्र आहे.

कालप्रवाहात दलित वर्ग जागृत होत जातो. शिक्षण घेऊन स्वयंपूर्णतेच्या मार्गाकडे जाऊ लागतो. पण राजकारणाचे गारुड यांच्या मार्गात अडथळा निर्माण करुन त्यांचा बळी घेतं. या समाजातील तरुणमंडळींचा धूर्त राजकारणी मंडळी स्वार्थासाठी वापर करुन घेतात. पण याच दलित वर्गातील 'कबीर' या कादंबरीचा नायक मात्र या आपल्या समाजबांधवांच्या होणाऱ्या वाताहतीमुळे गंभीर होतो, व्यथित होतो. त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न करतो, पण शेवटी एकाकी पडतो. त्याचं हे एकाकी पडणं म्हणजेच आंबेडकरी चळवळीचा व तत्त्वज्ञाचा या मंडळींनी अर्धवट केलेला स्वीकार, ही खंत इथे प्रकट होते. वाईट प्रवृत्तीचं तणकट समाजात वाढत जात असून, त्यामुळे कसदार जमिनीची नासाडी कशी होत आहे हे दुःख राजन गवस यांनी या 'तणकट' कादंबरीमधून व्यक्त केलेले आहे.

अशाप्रकारे 'तणकटकार' राजन गवस यांची कादंबरी समाजमनाशी आपली असलेली नाळ घट्ट ठेऊन समाज जीवनातील विविध पदर कलात्मक पातळीवर प्रकाशमान करणारी ठरते.

★☆★☆

## जीवन

एकदा स्वामी रामतीर्थ जहाजातून युरोपला चालले होते. जहाजात त्यांच्याबरोबर ९० वर्षांचा एक वृद्धही प्रवास करत होता. रामतीर्थांनी हे पाहिले की, त्याचे हात, पाय नीट साथ देत नाहीत, त्याचे डोळे अशक्त झाले आहेत. पण तरीही तो हातात कागद पेन होऊन चिनी भाषेसारखी कठीण भाषा शिकण्याचा प्रयत्न करत आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तल्लीन होऊन भाषा शिकण्याचा किती दिवस प्रयत्न करत आहे. शेवटी न राहवून रामतीर्थ त्याला म्हणाले, 'क्षमा करा ! पण आपण या वयात ही कठिण भाषा केव्हा शिकूण पूर्ण करणार ? आणि जरी ती शिकून घेतली, तरी आता या वयानंतर त्याचा काय उपयोग करणार ?' त्या वृद्धांने रामतीर्थांकडे पाहिले व त्यांचे वय विचारले. ते म्हणाले, '३० वर्षे'. त्यावर हसून तो वृद्ध म्हणाला, 'आता माझ्या लक्षात आले की, हिंदुस्थान इतका मागे का आहे ? तेथील लोक जीवन जगण्याच्या आधीच मृत्युबद्दल विचार करतात. माझी इच्छा अशी आहे की, मरतानासुद्धा काहीतरी शिकत शिकतच मरावे. मरण तर येणारच आहे; पण रोज नव्या ज्ञानाचा अनुभव हेच खरे जीवन आहे.'

त्यावेळेपासून रामतीर्थांना जीवनाकडे बघण्याची अनमोल दृष्टी मिळाली.

## चारोळी

**एकदा गणित मांडल्यावर**
**पुन्हा - पुन्हा सोडवावे लागते**
**तरीही नेमके उत्तर नसते**
**अखेर ते एक कोडेच असते.**



# जीवनाचा खरा अर्थ....!

कु. अजिता घाटगे - बी. ए. भाग -२

'जीवन हे असे असावे की, पावलोपावली मरणाशी मुलाखत व्हावी' नाही तर तेच ते अन् तेच ते-सकाळपासून रात्रीपर्यंत तेच ते असं कंटाळवाणं जीवन जगणे भाग पडते. यावर मात करावयाची असेल, उत्साह मनात बाळगायचा असेल तर नव्या युगाची आव्हाने समजून घ्यायला पाहिजेत, त्यावर मात केली पाहिजे, २१ व्या शतकाची आव्हाने पेलली पाहिजेत.

२१ वे शतक हे तंत्राचे, तंत्रज्ञानाचे आहे आणि विज्ञानाच्या अफाट विकासाचे आहे. हे चंद्रयुग आहे, इलेक्ट्रॉनिक्सचे युग आहे, यंत्रमानवाचे युग आहे, संगणकाचे युग आहे. मात्र अशी अपार सुखसोयींची साधने हस्तगत करताना माणसातील माणूसपण हरवून उपयोगी नाही. त्यांची संवेदनशीलता, भावनाशीलता, सृजनशीलता, माणुसकी, टिकली पाहिजे.

काही वर्षांपूर्वी 'स्त्री जीवन' हे सर्व प्रकारच्या दडपणातून, बंधनातून मुक्त झालेले नव्हते. 'स्त्री' ही केवळ 'चूल आणि मूल' या चार भिंतीच्या 'बंद दरवाजा'मध्ये गुंतून पडलेली होती. पण सध्याच्या काळात स्त्री-मुक्ती चळवळीचा जोर वाढल्याने आणि कायद्याने स्त्रीला समान हक्क व न्याय दिल्याने स्त्री व पुरुष दोन्ही समानच आहेत. स्त्री ही एक सहनशीलतेची प्रतिमा आहे, अशी पुरुषांनी दिलेली पदवी म्हणजे मोठा मान समजून शतकानुशतके अत्याचार आणि अन्याय सहन करीत असलेली स्त्री आता या एकविसाव्या शतकात जागी झाली आहे. तिच्या सहनशिलतेच्या धरणाचा बांध अन्यायाच्या महापुराने फुटू पाहतो आहे. ती आता निर्भीडपणे अन्यायाचा प्रतिकार करते आहे. न्यायदेवतेकडे न्याय मागण्याइतकी ती धीट झाली आहे. कारण आजच्या स्त्रीला कळून चुकले आहे की, असे न वागल्यास नीतीची चाड नसणाऱ्यांना, अनैतिक कृत्ये करण्यासाठी रान मोकळे मिळेल. न्याय मिळेपर्यंत अन्यायाविरुद्ध लढणे हे एकमेव ध्येय आजच्या जागृत स्त्रीचे आहे.

आजची दोन अक्राळविक्राळ संकटे म्हणजे महागाई आणि भ्रष्टाचार. महागाई डोईजड झाली आहे, तर भ्रष्टाचार शिष्टाचार बनू लागला आहे. या दोन्ही संकटांनी सामान्य माणूस हतबल झाला. आहे. अगतिक झाला आहे. महागाई हे संकट आर्थिक संकट आहे. आपणास दिसते आहे की, महागाईने खरोखरच कळस गाठला आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती खूप भडकल्या आहेत आणि सामान्य माणसांचे खिसे रिकामे आहेत. एकीकडे आपण पाहतो की, नोकरदार लोकांचे पगार वाढत आहेत, महागाई भत्त्याचे प्रमाण वाढत आहे. पण असे हे भत्ते वाढण्यापेक्षा महागाई उतरली पाहिजे. ते खरे गरजेचे आहे.

महागाईसारखेच आजचे दुसरे मोठे संकट म्हणजे भ्रष्टाचार. भ्रष्टाचाराचे हे महाभयंकर संकट समाजजीवनातून हद्दपार होणार कसे ? भ्रष्टाचार जन्मास येतो तो भ्रष्ट विचारातून. "आधी भ्रष्ट विचार आणि नंतर भ्रष्ट आचार - भ्रष्टाचार." त्यामुळे सर्वांनी जर प्रामाणिकपणे ठरविले की, मी भ्रष्टाचाराला बळी पडणार नाही, मी भ्रष्टाचार होऊ देणार नाही, तरच केवळ भ्रष्टाचाराचे संकट हद्दपार होऊ शकेल. चांगल्या गोष्टीची सुरुवात स्वतःपासून करावी हे सुभाषित खरेच आहे. जेव्हा आपण भ्रष्टाचाराला साथ देतो तेव्हाच भ्रष्टाचार वाढतो. साधी-साधी उदाहरणेही हळूहळू मोठ्या भ्रष्टाचाराला जन्म



देतात. घरी नसलेल्या माणसांची रेशन कार्डावर नावे लिहिणे, रजा मिळविण्यासाठी डॉक्टरांकडून खोटेच सर्टिफिकेट घेणे वगैरे. भ्रष्टाचार हे सामाजिक संकट असून, ते तेंव्हाच नष्ट होईल जेंव्हा आपण सगळेच सुसंस्कारित, राष्ट्रभक्त नागरिक बनू.

'विज्ञान नसेल तर आत्मज्ञान पांगळे आहे. पण आत्मज्ञान नसेल तर विज्ञान आंधळे आहे.' व्यक्तिविकासाबरोबरच सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि नवीन विकसित तंत्रज्ञानाचा समावेश करणारे, सर्वसमावेशक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मूर्त स्वरुपात येणे आवश्यक आहे. शैक्षणिक अभ्यासकेंद्रात कृतिनिष्ठ कार्यक्रमांवर, तसेच शारीरिक शिक्षण, क्रीडा यावर भर दिला गेला पाहिजे. नैतिक मूल्ये आणि चारित्र्यसंवर्धन यांचीही जोपासना व्हावयास हवी. नाहीतर भौतिक विकास आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे माणूस अधिकाधिक स्वयंकेंद्रित होण्याची शक्यता आहे. तसेच शास्त्रज्ञ आणि विद्वान यांचा परदेशी जाणारा लोंढा थांबवावयास हवा. 'थांबला तो संपला' हे विसाव्या शतकाने आपणास सांगितले आहे म्हणून वेगवान प्रगतीच्या दिशेने वाटचाल करायला हवी. उपकरणवादाच्या प्रगतीबरोबर माणसाच्या सर्व मानसिक शक्तींचा विकास व्हायला हवा व त्यासाठी मानवधर्माची उपासना व निष्ठायुक्त प्रयत्नांची जोपासना करायला हवी.

'या जीवनात काही घडत नाही.  
क्षण-क्षण घडवावा लागतो.  
वेळ हा कधीच मिळत नाही.  
थोडा-थोडा काढावा लागतो.  
यश सहजासहजी मिळत नाही.  
कष्टाने त्यावर कळस चढवावा लागतो.  
रात्रीचा दिवस करुन तो  
कणा-कणाने वाढवावा लागतो.''

आपल्या देशामध्ये जे थोर नेते होऊन गेले उदा. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक इत्यादिंनी तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा, जुन्या रुढी, सामाजिक विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आणि असे हे मोलाचे कार्य करत असताना अनेक संकटांना त्यांना सामोरे जावे लागले. अन्याय, अत्याचार सहन करावा लागला. तरीसुद्धा या व्यक्ती खचल्या नाहीत त्यांनी धीर सोडला नाही. आपण हाती घेतलेले कार्य पूर्णपणे नेटाने केले पाहिजे अशी त्यांची वृत्ती होती व त्यामध्ये ते पूर्णत: यशस्वी देखील झाले. जर या व्यक्ती आपल्या नशिबावरच अवलंबून राहिल्या असत्या तर एवढी प्रगती त्यांनी कधी केलीच नसती.

या अभ्यास केंद्राचे प्रमुख म्हणून मा. प्राचार्य डॉ. के. आर. पाटीलसाहेब जबाबदारी पार पाडीत असून, त्यांच्याच प्रयत्नामुळे आणि प्रोत्साहनामुळे शिवाय वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनामुळे या केंद्राची वाटचाल यशस्वीरित्या सुरु आहे. त्याकरिता अभ्यास केंद्राचा समन्वयक म्हणून मी सर्वप्रथम मा. प्राचार्य डॉ. के. आर. पाटीलसाहेब यांचा आणि सहकार्य दिल्याबद्दल सहभागी विद्यार्थिनी, तसेच निदेशिका सौ. एस. पी. वायचळ यांचा आभारी आहे.

**प्रा. श्री. नेताजी विश्वास पोवार**

केंद्र समन्वयक, य. च. म. मु. विद्यापीठ, कोल्हापूर अभ्यास केंद्र,

कमला कॉलेज, कोल्हापूर.



# प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग



मुलींचा सर्वांगीण विकास साधणे व त्यांना स्वयंनिर्भर करणे हे आमच्या महाविद्यालयाचे उद्दिष्ट आणि वैशिष्ट्य. महाविद्यालयीन मुलींव्यतिरिक्त इतर मुलींनाही अशाप्रकारचे शिक्षण देण्याकरिता महाविद्यालयात 'प्रौढ व निरंतर शिक्षण' विभागातर्गत जिमखाना विभागाच्या सहकार्याने डिसेंबर २००१ ते जानेवारी २००२ या कालावधीत ज्युदो-कराटे कोर्स यशस्वीरित्या राबविण्यात आला. सदर कोर्सला श्रीमती सुनिता काळे, फिजिकल डायरेक्टर यांचे मार्गदर्शन लाभले.

विभागाचे काम उत्तम रितीने पार पाडण्यास मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे बहुमूल्य प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

**प्रा. श्रीमती रेखा पंडित** - विभागप्रमुख

# स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्त्व विकास विभाग

***Create your self identity by improving personality.***

आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात कोणतेही क्षेत्र असे उरलेले नाही, की जिथे महिलांनी आघाडी मारलेली नाही. आमच्या महाविद्यालयाच्या असंख्य 'कमला'ही त्याला अपवाद ठरु नयेत, त्यांची स्पर्धात्मक शक्ती वाढावी या हेतूने आमच्या महाविद्यालयात मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास विभाग' कार्यरत आहे. या विभागामार्फत अहवाल सालात पुढील कार्यक्रम राबवण्यात आले.

**व्याख्याने :**

विविध क्षेत्रात आपल्या असामान्य कर्तृत्वाने ठसा उमटवणाऱ्या नामवंत व्यक्तींची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या विविध शंकांचेही या वक्त्यांनी निरसन केले आणि मुलींना भावी आयुष्याची पहाट सोनेरी बनविण्याच्या दृष्टीने प्रेरणा दिली.




## 'फुलशेती - कमी खर्चात अधिक उत्पन्न'

जिजामाता कृषीभूषण पुरस्कार प्राप्त

**श्रीमती शकुंतला शिरगांवकर**

शेतीक्षेत्रात आपल्या अथक परिश्रमाने एक आगळा-वेगळा आदर्श घालून देणाऱ्या श्रीमती शकुंतला शिरगांवकर यांनी आधुनिक पद्धतीने फुलशेती करून कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याचे तंत्र मुलींसमोर मांडले. कमलाच्या विद्यार्थिनी 'भावी जिजामाता' होतील असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

## 'अवकाश जितके मोठे, तितकी आव्हाने मोठी'

अवकाश संशोधन क्षेत्रातील अभ्यासक

**डॉ. आर. व्ही. भोसले**

अवकाश हा सर्वांच्याच आकर्षणाचा आणि तितक्याच कुतूहलाचा विषय आहे. या क्षेत्रातील मुलींसाठी असणाऱ्या विविध संधीविषयी डॉ. आर. व्ही. भोसले यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. अवकाशाबाबतची माहिती सांगून डॉ. आर. व्ही. भोसले यांनी पर्यावरणाबाबत युवकांची जबाबदारी काय आहे हे सांगितले.

## काचफलकांत माहिती कात्रणे

विविध क्षेत्रातील रोजगारविषयक संधी, व्यक्तिमत्त्व विकासाबाबतचे लेख, नोकरीविषयक जाहिराती, उद्योजकीय प्रकल्प, स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शनपर लेख महाविद्यालयाच्या काचफलकात वेळोवेळी लावून विद्यार्थिनींच्या निदर्शनास आणून दिले. महाविद्यालयाच्या ग्रंथालयातही विविध स्पर्धा परीक्षांसाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त अशी पुस्तके व मासिके विद्यार्थिनींसाठी उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थिनींनीही या उपक्रमास चांगला प्रतिसाद दिला.

## वैयक्तिक मार्गदर्शन

वैयक्तिक पातळीवरही समितीच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विविध परीक्षांचे फॉर्मस् कसे भरावेत ? करिअर कोणते निवडावे ? स्पर्धा परीक्षांना सामोरे कसे जावे ? याबाबत माहिती देऊन विविध सामान्यज्ञान परीक्षांना बसण्यासाठी उद्युक्त केले.

वरील सर्व उपक्रम राबवण्यामध्ये मा. प्राचार्यांचे बहुमोल मार्गदर्शन व समितीमधील सदस्य प्रा. श्रीमती पाठक ए. व्ही., प्रा. श्रीमती पाटील टी. पी., प्रा. श्रीमती धुमाळ एन. एस्., प्रा. श्रीमती इंदूलकर यू. डी., प्रा. श्रीमती पवार एम. एस्., प्रा. लोहार एम. ए. व प्रा. पोवार एन. व्ही. यांचे उत्स्फूर्त सहकार्य मोलाचे ठरले.

International Institute of Information Technology यांचेमार्फत दि. १९ फेब्रुवारी २००२ यादिवशी हॉटेल व्हिक्टर पॅलेस, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'International Institute of Information Technology Awards in Yong Innovators' या विषयावरील परिसंवादात आमच्या महाविद्यालयातील २ मुली सहभागी झाल्या.

**प्रा. सौ. मैंदर्गी व्ही. व्ही.**
प्रमुख, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व
व्यक्तिमत्त्व विकास विभाग

# सहल विभाग



गोवा सहल वाघातोर (रॉक बीच)

विद्यार्थिनींच्या वर्षभरातील अभ्यासाबरोबर मनाला प्रसन्नता वाटावी, वेगवेगळ्या भौगोलिक स्थळांची माहिती व्हावी, तेथील समाजाची व संस्कृतीची, राहणीमानाची माहिती व्हावी, निसर्गसौंदर्य पाहता यावे म्हणून द्वितीय सत्रात शुक्रवार, दिनांक ४ जानेवारी ते सोमवार, दिनांक ७ जानेवारी २००२ या कालावधीमध्ये गोवा शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. तसेच शुक्रवार, दिनांक २५ जानेवारी २००२ यादिवशी मार्लेश्वर, गणपतीपुळे ही एक दिवसाची शैक्षणिक सहल आयोजित केली होती. तसेच दिनांक २ ते ३ फेब्रुवारी २००२ या कालावधीमध्ये गगनगिरी, विजयदुर्ग, कुणकेश्वर, ओझर, मालवण, सिंधुदुर्ग, तारकर्ली ही २ दिवसांची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली.

वरील सहलीसाठी मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. ए. एम्. साळोखे** - सहल विभाग समिती

---

## ध्येयपूर्तीसाठी - आत्मविश्वास

# वक्तृत्व स्पर्धा व निबंध लेखन समिती

सध्याच्या स्पर्धेच्या युगात व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. विद्यार्थिनींचा आत्मविश्वास वाढावा, त्यांच्या सुप्त कलागुणांना संधी मिळावी म्हणून आम्ही सतत प्रयत्न करतो.

सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षात आमच्या विद्यार्थिनींनी वक्तृत्व व निबंध लेखन स्पर्धेत विविध ठिकाणी भाग घेऊन यश मिळविले. त्याचबरोबर महाविद्यालयांतर्गत स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनींना 'प्रमाणपत्र' देऊन त्यांचे कौतुक केले.

स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत खालील विद्यार्थिनी यशस्वी झाल्या.

(१) कु. सुजाता रामराव गुडाजी .................................. प्रथम क्रमांक
(२) कु. दिपाली प्रताप पाटील .................................. द्वितीय क्रमांक
(३) कु. तस्लीम शशुद्दिन हुदली .................................. तृतीय क्रमांक
(४) कु. तेजस्विनी कांबळे .................................. उत्तेजनार्थ
(५) कु. शीतल भोरे .................................. उत्तेजनार्थ

विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना संधी देणे हे आमच्या या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमासाठी मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटीलसाहेब यांचे मार्गदर्शन व समितीतील सदस्य प्रा. एच. व्ही. पुजारी, प्रा. एस्. बी. पाटील यांचे सहकार्य लाभले.





कु. भक्ती रामचंद्र कुलकर्णी
प्रथम क्रमांक विजेती

**राजा अंबरिष प्रतिष्ठान, बार्शी, जि. सोलापूर आयोजित आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थिनींनी उज्ज्वल यश संपादन केले.**

(१) कु. भक्ती रामचंद्र कुलकर्णी ............................ प्रथम क्रमांक विजेती
(२) कु. वैशाली दशरथ पाटील ............................ उत्तेजनार्थ प्रथम
(३) कु. भाग्यश्री सुधाकर टोपगे ............................ उत्तेजनार्थ सातवा
(४) कु. आरती रामचंद्र चिले ............................ पुरस्कार प्राप्त

वरील यशस्वी विद्यार्थिनींना मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटीलसाहेब यांचे मार्गदर्शन व समितीतील सदस्य प्रा. एच. व्ही. पुजारी, प्रा. एस. बी. पाटील यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. सौ. सुमन लालासाहेब देसाई**
प्रमुख - वक्तृत्व स्पर्धा व निबंध लेखन समिती

# लोकसंख्या शिक्षण मंडळ

प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत आमच्या महाविद्यालयात लोकसंख्या शिक्षण मंडळ कार्यरत आहे. या मंडळामार्फत लोकसंख्या आणि लोकसंख्येची गुणवत्ता याबाबत विद्यार्थिनींमध्ये जाणीव-जागृतीचे उपक्रम पार पाडले जातात. सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षात लोकसंख्या शिक्षण मंडळाद्वारे संपन्न झालेल्या उपक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

**❊ लोकसंख्या दिन :** वर्षाच्या उपक्रमांची सुरुवात ११ जुलै २००१ हा 'लोकसंख्या दिन' म्हणून साजरा करून झाली. व्याख्यान, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा अशा पारंपारिक उपक्रमांऐवजी यावर्षी प्रत्येक विद्यार्थिनीला विचार प्रेरित करण्यासाठी, जास्तीत जास्त विद्यार्थिनींना सहभागी करून घेण्यासाठी आणि व्यापक अशा विषयांना स्पर्श व्हावा या उद्देशाने 'भित्तीपत्रके' तयार केली. विविध अशा लोकसंख्याविषयक समस्या नजरेसमोर ठेवून भित्तीपत्रकासाठी लिखाण केले. या उपक्रमात मा. प्राचार्यांनी मंडळाचे अध्यक्ष म्हणून स्वत: एक पत्रक तयार करून सहभाग दिला. मंडळाचे प्रकल्पाधिकारी श्री. एन. व्ही. पोवार, मंडळाच्या कार्यकारिणी सदस्या सौ. टी. बी. मुडेकर, सौ. ए. व्ही. पाठक यांनी सुद्धा स्वत:चे पत्रक तयार करून सहभाग दिला. या भित्तीपत्रकांचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. के. आर. पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

**❊ वक्तृत्व स्पर्धातील सहभाग :** कोल्हापूर जिल्हा सहकार मंडळ, कोल्हापूर यांच्या द्वारा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ता. १३-९-२००१ रोजी तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्र, मार्केट यार्ड, कोल्हापूर येथे आयोजित केलेल्या स्पर्धेसाठी आमच्या मंडळातील विद्यार्थिनी स्पर्धक म्हणून सहभागी झाल्या. त्यामध्ये कु. सुरेखा दत्तात्रय पाटील, बी. ए. भाग-३ या विद्यार्थिनीने ''सहकार चळवळीतील युवकांचा सहभाग'' या विषयावर वक्तृत्व करून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. या विद्यार्थिनीची पुणे येथील स्पर्धाफेरीसाठी निवड झाली होती.

**❊ लोकसंख्या आणि विकास प्रशिक्षण :** लोकसंख्या शिक्षण साधन केंद्र, पुणे विद्यापीठ आणि प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी ता. २७ व २८ डिसेंबर २००१ रोजी आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी मंडळाचे प्रकल्पाधिकारी श्री. एन. व्ही. पोवार हे उपस्थित राहिले व 'लोकसंख्या आणि विकास' हे मंडळाच्या वाटचालीसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पाडले.



**✲ वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन :** फोरम ऑफ फ्री एन्टरप्राईजेस, मुंबई यांच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जाहीर केलेल्या ३६ व्या सेठ वालचंद हिराचंद स्मृती वक्तृत्व स्पर्धा (२००१-२००२) आमच्या महाविद्यालयात, लोकसंख्या शिक्षण मंडळाच्यावतीने ता. २ जानेवारी २००२ रोजी संपन्न झाल्या. त्यातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे :-

प्रथम पारितोषिक .................. (रु. ३००/-) ............... कु. दिपाली प्रताप पाटील .................... बी. ए. भाग १

द्वितीय पारितोषिक ................ (रु. २५०/-) ............... कु. शीतल नानासो भोरे ...................... बी. ए. भाग २

तृतीय पारितोषिक .................. (रु. २००/-) ............... कु. भक्ती सुर्यकांत कुलकर्णी .............. बी. ए. भाग १

उत्तेजनार्थ ........................................................ कु. सुरेखा दत्तात्रय पाटील .................... बी. ए. भाग ३

उत्तेजनार्थ ........................................................ कु. सुरेखा रघुनाथ तोडकर ..................... बी. ए. भाग २

उत्तेजनार्थ ........................................................ कु. अनमोली चंद्रकांत उपाध्ये ............... बी. कॉम. भाग २

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद श्री. जे. बी. पाटील यांनी भूषविले होते. सूत्रसंचालन श्री. एस. बी. पाटील यांनी केले, तर परीक्षक म्हणून अर्थशास्त्र विभागाच्या शिक्षकांनी काम पाहिले.

सन २००१-२००२ या वर्षाच्या लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या यशस्वी वाटचालीमध्ये मा. प्राचार्यांनी मंडळाचे अध्यक्ष म्हणून वेळोवेळी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले. शिवाय मंडळाच्या कार्यकारिणीतील सदस्यांचे, तसेच विद्यार्थिनींचे सहकार्य मिळाले त्यामुळेच वरील सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणे शक्य झाले. मी प्रकल्पाधिकारी या भूमिकेतून वरील सर्वांचे आणि विशेषतः मा. प्राचार्य डॉ. के. आर. पाटीलसाहेब यांचे आभार मानतो.

**प्रा. श्री. एन. व्ही. पोवार**

प्रकल्पाधिकारी, लोकसंख्या शिक्षण मंडळ

## विद्यार्थिनींच्या साहित्यिक, भावनिक विचारांचे हस्तलिखित

# 'गुंजारव' भित्तीपत्रक

विद्यार्थ्यांचे साहित्यिक विश्व शाळा-महाविद्यालयातच घडत असते. मात्र यासाठी आवश्यकता असते संधीची. या दृष्टीने आमच्या महाविद्यालयात 'गुंजारव' भित्तीपत्रक प्रतिवर्षी प्रकाशित होत असते. सन २००१-२००२ या वर्षी 'गुंजारव' भित्तीपत्रक वेगवेगळ्या प्रासंगिक विशेषांकांनी सजले. ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक कै. व्ही. टी. पाटील तथा ती. काकाजींच्या जयंतीदिनी 'गुंजारव'चा पहिला अंक प्रकाशित झाला. महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थिनींना काकांजीचे स्मरण रहावे व त्यांचे जीवन चरित्र मार्गदर्शक ठरावे हाच यामागचा उदात्त हेतू.

प्रयत्नांच्या पराकाष्ठेतून भारताला मिळालेले स्वातंत्र्य अबाधित रहावे, शहीद लोकांचे स्मरण व्हावे म्हणून आपण सर्वजण १५ ऑगस्ट साजरा करतो. या निमित्ताने विद्यार्थिनींनी आपले विचार 'गुंजारव' मध्ये व्यक्त केले.

राष्ट्रभाषा हे राष्ट्राचे वैभव. या राष्ट्रभाषेचा प्रचार-प्रसार होणे आवश्यक. या दृष्टीने '१४ सितंबर-हिंदी दिन' हा हिंदी भाषेत लेख, कविता लिहून 'गुंजारव' द्वारे साजरा झाला.

२ ऑक्टोबर - म. गांधी व लालबहाद्दूर शास्त्री या महान विभूतींच्या जयंतीचा दिवस. यांचे जीवनकार्य विद्यार्थिनींनी आपल्या साहित्यातून प्रसिद्ध केले.



आधुनिक युग हे विज्ञानाचे युग. विज्ञानयुगात वावरताना, वैज्ञानिक दृष्टी असणे आवश्यकच. त्यादृष्टीने 'विज्ञान विशेषांकात विद्यार्थिनींनी विज्ञानावरील लेख लिहून अनमोल कार्य केले आहे. या भित्तीपत्रकास मा. प्राचार्य क्रांतिकुमार पाटील सरांचे प्रेरणास्वरूप मार्गदर्शन मिळाले. सहकारी सदस्यांचे सहकार्य लाभले. साहित्यिक विद्यार्थिनींचा सहभाग महत्त्वाचा ठरला.

**प्रा. सौ. कमल पाटील**

प्रमुख, भित्तीपत्रक विभाग

# विविध कला-गुण विकास मंडळ

## वार्षिक अहवाल सन २००१-२००२



महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच या मंडळाचे कार्य चालू आहे. विद्यार्थिनींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना संधी देणे, व्यक्तिमत्त्व विकास साध्य करणे, स्पर्धेच्या युगात त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या सर्वांगीण गुणांचा विकास साधणे हे या मंडळाचे उद्दिष्ट आहे.

ताराराणी विद्यापीठाच्या प्रेरणाशक्ती आणि माजी उपाध्यक्षा, पुण्यशील माऊली कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा पूज्य काकीजी यांची ३२ वी पुण्यतिथी, बुधवार, दि. १८ जुलै २००१ या दिवशी महाविद्यालयात मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर शारदा मंदिरामध्ये प्रमुख पाहुणे आणि प्रसिद्ध वक्ते डॉ. व्ही. के. मोरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

करवीर नगरीचे भूषण, स्त्री शिक्षणाचे महान पुरस्कर्ते शिवस्नुषा, ताराराणीचे एकनिष्ठ भक्त, मौनी विद्यापीठाचे व ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा पूज्य काकाजींना त्यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त बुधवार, दि. २५ जुलै २००१ या दिवशी महाविद्यालयात मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

गुरुवार, दिनांक २६ जुलै २००१ या दिवशी महाविद्यालयामध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त रोटरॅक्ट क्लब ऑफ महावीर कॉलेज, कोल्हापूर (रोटरी क्लब ऑफ, कोल्हापूर मिड टाऊनशी संलग्न) महावीर विद्यालय, बी. ए. बी. एड. (सांस्कृतिक विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या महाविद्यालयीन रांगोळी व देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आपल्या महाविद्यालयाच्या वतीने रांगोळी स्पर्धेत पुढील विद्यार्थिनींनी भाग घेतला. (१) कु. प्रमिला सुभाष चौगुले-१२ वी सायन्स (२) कु. सारिका दिलीप साठे-अकरावी कला (३) कु. ज्योत्स्ना विश्वास मुद्राळे-बी. ए. भाग ३ (४) कु. शीतल मोहनराव कांबळे-११ वी कला या विद्यार्थिनींनी भाग घेऊन महाविद्यालयाचे नेतृत्व केले. यामध्ये रांगोळी स्पर्धेत कु. प्रमिला सुभाष चौगुले-अकरावी सायन्स हिने तृतीय क्रमांकासाठी रु. १००/- व प्रमाणपत्र प्राप्त केले. आणि कु. सारिका दिलीप साठे-११ वी कला हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

बुधवार, दिनांक ५ सप्टेंबर २००१ या दिवशी वर्ग प्रतिनिधींच्या वतीने महाविद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.






गायन समाज देवल क्लबतर्फे ''अंधारात मठ्ठ काळा बैल'' या विचारनाट्याचा प्रयोग दिनांक ८-९-२००१ यादिवशी महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी शारदा मंदिरामध्ये आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अध्यक्षस्थानी उपप्राचार्य, एस. एन. कोळेकर व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे स्वागत प्रा. सौ. तेजस्विनी पाटील (मुडेकर) यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. सौ. व्ही. व्ही. मैंदर्गी यांनी केले.

बुधवार, दिनांक १७-१०-२००१ यादिवशी ''भवानी महोत्सव'' निमित्त ''घटस्थापना'' समारंभ कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. राजगोपाल देवरा आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. आर. एम. माधवी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी संस्थेचे सर्व विश्वस्त, सर्व शाखाप्रमुख व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

गुरुवार, दिनांक ३ जानेवारी २००२ यादिवशी आधुनिक महाराष्ट्राचे ज्ञानसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रेरणेने स्त्रीशिक्षणाच्या घनांधकारात तेजस्वी शुक्रताऱ्यासारखी जगाला दीपवून टाकणाऱ्या आद्य स्त्री-शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सोमवार, दिनांक १४ जानेवारी २००२ यादिवशी ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष क्रांतीवीर रंगरावदादा पाटील यांच्या सुविद्य पत्नी व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या मातोश्री सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. या दुःखद निधन समयी-मंगळवार, दिनांक १५ जानेवारी २००२ यादिवशी महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थिनी, वर्गप्रतिनिधी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून दुखवटा ठराव करण्यात आला.

गुरुवार, दिनांक १७ जानेवारी २००२ यादिवशी ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या ७ व्या स्मृतीदिनानिमित्त महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. एन. कोळेकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर शारदा मंदिरात संस्थेचे अध्यक्ष श्री. रामराव बेनाडीकर यांच्या हस्ते कै. काकाजींच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष श्री. रा. कृ. कणबरकर (माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांनी स्मृतीदिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. या समारंभाप्रसंगी संस्थेचे सर्व शाखाप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी, विविध हितचिंतक, मान्यवर व पत्रकार उपस्थित होते.




प्रजासत्ताक दिनानिमित्त वंदेमातरम् नृत्यविष्कार सादर करताना विद्यार्थिनी

शनिवार, दि. २६-१-२००२ रोजी संस्थेच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष मा. रामराव बेनाडीकर यांचे हस्ते ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला. यावेळी विविध शाखांच्या वतीने कवायती व राष्ट्रीय समूहगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष मा. रा. कृ. कणबरकर, सचिव मा. डॉ. क्रांतिकुमार पाटील, मा. उत्तमराव काळे, सर्व शाखाप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते. वरील सर्व कार्यक्रमांना वेळोवेळी मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. ए. एम. साळोखे व विविध कला-गुण विकास समिती**



# वार्षिक दिन अहवाल

जीवन हे संघर्षमय आहे. आनंदाचे क्षण जोपासायचे असतात आणि हा आनंद छोट्या छोट्या गोष्टीतून मिळवायचा असतो. आणि ज्या व्यक्तीस हे कळले तो आपल्या काटेरी जीवनाचा प्रवास सहजपणे करु शकेल. महाविद्यालयीन युग सुखद स्वच्छंदपणे आयुष्य घालविण्याचा सुवर्णकाळ आहे. ह्या आठवणी घेवून विद्यार्थिनी उघड्या जगाच्या समोर जाण्यास स्वत:ला तयार करतात. अशा आमच्या निरागस विद्यार्थिनींकरिता आमच्या महाविद्यालयात 'वार्षिक दिन' साजरा करण्यात येतो. या वार्षिक दिनाचा शुभारंभ दि. १२ जानेवारी २००२ रोजी विविध गुणदर्शनाच्या बहारदार कार्यक्रमाने झाला. विविध प्रकारची आधुनिक व पारंपारिक नृत्ये व नकला यांचा यात समावेश होता. दि. १३ जानेवारीला मा. प्राचार्यांच्या उपस्थितीत फूड फेस्टीवल व फनी गेम्स्चे उद्घाटन झाले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी विविध प्रकारच्या पदार्थांचे व फुलांचे स्टॉल उघडले होते. याच दिवशी विद्यार्थिनींना अंतर्मुख करणारा खास विद्यार्थिनींच्या आग्रहास्तव 'अंधारात मठ्ठ काळा बैल' या विचारनाट्याचा प्रयोग आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी राजारामपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस इन्स्पेक्टर श्री. मांडरेसाहेब होते.

स्नेह संमेलनानिमित्त मराठी वक्तृत्व स्पर्धा, हिंदी निबंध स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, कुकरी व रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कॉलेजच्या विद्यार्थिनींनी वरील सर्व स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने भाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दि. ६-२-२००२ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु मा. डॉ. व्ही. एम. चव्हाण यांच्या हस्ते संस्थेच्या शारदा मंदिरामध्ये संपन्न झाला. याप्रसंगी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष मा. रा. कृ. कणबरकर, संस्थेचे अध्यक्ष मा. रामराव बेनाडीकर, संस्थेचे सेक्रेटरी तथा कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, संस्थेचे पदाधिकारी व विविध शाखा प्रमुख, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**प्रा. सौ. सुनिता एम्. काळे**

वार्षिक दिन कार्याध्यक्ष

# ग्रंथालय अहवाल

ग्रंथालय हे महाविद्यालयाचे महत्त्वाचे ज्ञान भांडार आहे. प्राध्यापक व विद्यार्थिनींसाठी पुस्तके, मासिके व दैनिके पुरविण्यात आली आहेत.

श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे अद्ययावत अभ्यासिका सकाळी ७.३० पासून ५ वाजेपर्यंत सुरु असते. अभ्यासिकेच्या शेजारी संगणक विभाग असून इंटरनेटची सोय माफक दरात उपलब्ध आहे.

आजअखेर महाविद्यालयाची ग्रंथसंख्या ३०,५३८ इतकी झाली असून, किंमत रु. १३ लाख ३७ हजार इतकी आहे.

यु. जी. सी. बुक बँक, ज्युनियर व सिनियर कॉलेजसाठी एकूण ५२० पुस्तके खरेदी केली असून, त्यासाठी चालूवर्षी ८० हजार रुपये खर्च केले आहेत. ग्रंथालयात सर्व विषयाची ४२ मासिके ९ दैनिके येतात.

चालूवर्षी बुक बँकेतून ५६२२ पुस्तके दिली असून त्याचा लाभ ८४२ विद्यार्थिनींनी घेतला आहे. खेळाडू व हुशार अशा एकूण ५२ विद्यार्थिनींना मोफत पुस्तके दिली आहेत. ग्रंथालय समृद्ध करण्याकरिता प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील प्रयत्नशील आहेत.

**श्री. जे. पी. जाधव**

ग्रंथपाल



# राष्ट्रीय सेवा योजना (कनिष्ठ विभाग)



विद्यार्थी दशेमध्ये औपचारिक शिक्षणाबरोबरच समाज शिक्षणाची जाणीव व्हावी व सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून विद्यार्थिनींनी समाजापर्यंत जाऊन वास्तव जीवनाची अनुभूती घ्यावी या हेतूने महाराष्ट्र शासन पुरस्कृत ''राष्ट्रीय सेवा योजना'' हा उपक्रम आमच्या ज्युनिअर महाविद्यालयात कार्यरत आहे. या उपक्रमात प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या १०० विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत.

या वर्षीच्या उपक्रमांची सुरुवात मा. उपप्राचार्य एस. एन. कोळेकर यांच्या ''अंधश्रद्धा'' या विषयावरील व्याख्यानाने झाली. तसेच महाविद्यालयाच्या परिसरातील तणांचे निर्मूलन केले. या योजनेच्या नियमित उपक्रमांसाठी मौजे हणमंतवाडी, ता. करवीर हे दत्तक खेडे घेतले आहे. या योजनेतर्फे आम्ही पुढील कार्यक्रम राबवले.



पल्स पोलिओ मोहिमेंतर्गत आम्ही दत्तक खेडे मौजे हणमंतवाडी येथील ० ते ५ वर्षाच्या मुलांचे सर्वेक्षण करून त्यांना पोलिओ डोस देण्यापर्यंत मदत केली, तसेच येथील स्वच्छता व प्रबोधनात्मक कार्यक्रम केले.

मौजे हणमंतवाडी येथे संक्रांतीच्या दिवशी हळदी कुकूंचा कार्यक्रम आयोजित केला. श्रमदान, एड्सविरोधी अभियान, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य व पर्यावरण या विषयांवरील व्याख्याने, पल्स पोलिओ प्रचार मोहीम कार्यक्रम राबवले. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्रा. सौ. आर. पी. प्रधान व श्री. एच. व्ही. पुजारी, हणमंतवाडीचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. श्री. ए. एल. नरके** - प्रकल्पाधिकारी

# प्रसिद्धी विभाग

प्रसिद्धि विभाग म्हणजे महाविद्यालयाने वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये केलेल्या गौरवपूर्ण कामगिरीचा इतिहास होय. माहे जूनमध्ये मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध विभागाची बैठक झाली. त्यावेळी मा. प्राचार्यांनी या विभागाने वर्षभरामध्ये कोणकोणत्या कार्यक्रमांना प्रसिद्धी द्यावयाची याबाबतचे मार्गदर्शन केले. यानुसार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची जयंती, कमला कॉलेजच्या स्फूर्तीदेवता कै. सरोजिनीदेवी तथा काकीजी विश्वनाथ पाटील यांची जयंती, महापुरुषांच्या जयंत्या, क्रीडा व कला या क्षेत्रात गौरवपूर्ण कामगिरी करणाऱ्या घटनांना वर्षभरात प्रसिद्धी देण्याचे काम करण्यात आले.

कोल्हापुरातील दै. पुढारी, दै. तरुण भारत, दै. सकाळ, दै. सामना या वृत्तपत्रांनी आम्ही ज्या बातम्या दिल्या त्यांना प्रसिद्धी देवून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली त्याबद्दल वरील वृत्तपत्रांचे संपादक व त्यांचे वृत्तसंकलक यांचे महाविद्यालयातर्फे आभार. या विभागामध्ये प्रा. डी. ए. पाटील व प्रा. एम. ए. लोहार यांचे सहकार्य नेहमीच असते.

**प्रा. श्री. अनिल घस्ते** - प्रसिद्धी विभागप्रमुख



# प्राध्यापक प्रबोधिनी समिती

विविध विषयातील पारंगत प्राध्यापकांना वर्तमान परिस्थिती व विविध विषयांची वर्तमान परिस्थितीतील अद्ययावत माहिती, तंत्रज्ञानातील बदल यांचा वेध घेऊन, विचारांची देवाण-घेवाण करून मनन, चिंतन, लेखन, संशोधन करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उच्च ध्येयाने आमच्या महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनी समिती कार्यरत असते.

चालू दशकात नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे अणुउर्जेचा उपयोग शांतीसाठी करावा असा सर्वत्र गाजावाजा होत असतानाच अणू चाचणीने देश-रक्षणाची हमी दिली, तर दुसऱ्या बाजूला ११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेतील विध्वंसाने पुन्हा एकदा अणुउर्जेच्या प्रखरतेची जाणीव करून दिली. या साऱ्या प्रक्रियेत अणू आणि अणूउर्जेची नेमकी आणि सविस्तर माहिती मिळण्याच्या उद्देशाने ''अणु ते अणऊर्जा'' या विषयावर श्रीमती अनुराधा रागणेकर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानात अणुच्या रचनेपासून अणु उर्जा त्याचे उपयोग, मर्यादा, परिणाम या सर्व बाबींवर अभ्यासपूर्ण माहिती साध्या, सोप्या, ओघवत्या भाषेत सर्वांसमोर आपल्या व्याख्यानातून मांडली.

व्याख्यानानंतर सदर विषयावर उत्स्फूर्त चर्चा झाली. चर्चेत सर्व प्राध्यापकांनी भाग घेतला. मा. प्राचार्यांच्या प्रोत्साहनाने व मार्गदर्शनाने विभागाचे कामकाज यशस्वीपणे पार पडले.

**प्रा. श्रीमती रेखा पंडित** विभागप्रमुख

# कमला हेल्थ क्लब

ताराराणी विद्यापीठ एक सुसंस्कार केंद्र आहे. महिलांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी व शारीरिक क्षमतेचा विकास होण्याच्या उद्देशाने १९९३ साली 'कमला हेल्थ क्लबची' स्थापना झाली.

'हेल्थ क्लब' मध्ये आतापर्यंत २५० महिलांनी लाभ घेतला असून बी. ए. भाग १ व बी. कॉम. भाग १ च्या सर्व विद्यार्थिनीं लाभ घेत आहेत. तसेच महाविद्यालयातील इच्छूक विद्यार्थिनींही याचा लाभ घेत आहेत. दि. २६ फेब्रुवारी २००२ पासून 'अेरोबीक्सचा सर्टिफिकेट कोर्स' सुरु झाला असून या कोर्सचा अवधी एक महिन्याचा आहे. यामध्ये बॉक्स अेरोबीक्स, मसल्स अेरोबीक्स वार्मिंग अप, स्ट्रेचिंग एक्झरसाईजेस, बेंडिंग एक्झरसाईजेस जम्पिंग व बॅलन्सिंग एक्झरसाईजेसचा उपयोग करुन तसेच फिजीकल फिटनेसच्या सर्व घटकांना विचारात घेवून शरीराला आवश्यक व लाभदायक होणाऱ्या व्यायाम प्रकारांचा अंतर्भाव केलेला आहे.

तसेच हेल्थ क्लबमध्ये मल्टी जिमस्टेशन, इम्पोर्टेड ट्रेडमिल जॉगर, अेरोसाईकल व स्टेपर वुईथ ट्विस्टर, रनर-वॉकर, बेल्ट व्हायब्रेटर, रोलर मसाजर, बॉडी जॅक, लेग प्रेस, लेग अ‍ॅण्ड थॉय एक्स्टेन्शन पेक्ट्रॉरल डेक, बॅक एक्स्टेन्शन, हायपर एक्स्टेन्शन, सिटींग अ‍ॅण्ड स्टँडींग ट्विस्टर, साईकल वुईथ सायक्लान अ‍ॅटॅचमेंट, रोईंग मशीग वुईथ आर्म अ‍ॅक्शन, वॉल बार, आर्म चर्निंग अ‍ॅक्शन, रिस्ट कर्ल मशीन, इनक्लाईन डिक्लाईन बेंच, मल्टीपरपज बेंच, रोईंग पुली, टॉप बॉटम पुली, शोल्डर प्रेस अशा विविध अत्याधुनिक साहित्यासह योगासन, सूर्य नमस्कार, स्कॉट थ्रस्ट व एरोबीक्स ची सुविधा उपलब्ध आहे.

मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या प्रोत्साहनाने व कुशल मार्गदर्शनाखाली हा विभाग दिवसेंदिवस विकासाकडे वाटचाल करीत आहे.

**प्रा. श्रीमती सुनिता एम. काळे**
व्यवस्थापक व प्रशिक्षक, कमला हेल्थ क्लब



## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

# वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प

वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प (सत्यशोध प्रज्ञा प्रकल्प) हा महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम आहे. याद्वारे संस्कारक्षम वयात अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन व समाजसुधारकांचे कार्य यांचा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोचविला जातो. श्रद्धा, अंधश्रद्धा, मन-मनाचे आजार, भूताचे झपाटणे, देवीचे अंगात येणे, फलज्योतिष हे शास्त्र का नाही ? शास्त्रीय विचारपद्धती म्हणजे काय ? स्त्री आणि अंधश्रद्धा निर्मूलन, बुवाबाजी विरुद्ध लढ्याची वैचारिक भूमिका, चमत्कारांमागील विज्ञान, देव, धर्म आणि नीती या विषयांचा अभ्यासक्रम असून आमच्या महाविद्यालयात ''सत्यशोधन प्रज्ञा परीक्षा'' द्वारे वरील विषय विद्यार्थिनींपर्यंत पोहोचविला जातो. स्वयंसेवी पद्धतीने चालणाऱ्या या उपक्रमात गेल्या पाच वर्षात हजारो विद्यार्थिनी प्रशिक्षित झाल्या आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन, व्यसनमुक्ती व एडस्, सर्पविज्ञान, मानसिक आजार, भूतबाधा, चमत्कार आणि विज्ञान आणि वयात येताना (फक्त विद्यार्थिनींसाठी), इत्यादि विषय या अभ्यासक्रमात असतात. असा अभ्यासक्रम आमच्या महाविद्यालयात सुरु आहे. या आधारेच त्यांच्या परीक्षा घेतल्या जातात. हा सर्व प्रकल्प 'ना नफा ना तोटा' या धर्तीवर सामाजिक जाणिवेने चालविण्यात येतो.

विद्यार्थिनींना व मार्गदर्शकांना पंतप्रधानांचे (माजी) मुख्य वैज्ञानिक सल्लागार व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर यांच्या सहीचे प्रमाणपत्र देण्यात येते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई या मान्यवर संस्थेचे सहकार्य आमच्या महाविद्यालयाच्या समितीस लाभले आहे.

**वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प परीक्षा-२००२ :** यावर्षी उद्‌बोधन वर्गामध्ये एकूण १४० विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला. या विद्यार्थिनींना दर शनिवारी व रविवारी महाविद्यालयाच्या वेळापत्रकाव्यतिरिक्त जादा तास घेऊन विनामूल्य मार्गदर्शन केले.

**वैज्ञानिक दृष्टीकोन परीक्षा-२००२ : निकालपत्रक**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ◀ प्रथम क्रमांक | : | कु. अनुराधा अशोक जंगम | | |
| ◀ द्वितीय क्रमांक | : | कु. अश्विनी प्रकाश पाटील | कु. विद्या माने | |
| ◀ तृतीय क्रमांक | : | कु. स्वाती बाबासो कोले | | |
| ◀ उत्तेजनार्थ | : | कु. मेघा शामराव जाधव | कु. रुपाली विश्वनाथ पावसकर | कु. सुचिता जयवंत पाटील |

**उद्‌बोधन वर्ग वेळापत्रक**

तसेच रविवार, दि. २४ फेब्रुवारी यादिवशी वैज्ञानिक दृष्टिकोन परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी १३० विद्यार्थिनी बसलेल्या होत्या.

■ मार्गदर्शन व प्रोत्साहन : **मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील**

■ मार्गदर्शक प्राध्यापक : **प्रा. ए. एम्. साळोखे** - समाजशास्त्र विभाग

**प्रा. एन्. एस्. शिरोळकर** - इतिहास विभाग

**प्रा. ए. एस्. घस्ते** - मानसशास्त्र विभाग

**प्रा. पी. एस्. जाधव** - सायन्स विभाग

**प्रा. एम्. ए. लोहार** - वाणिज्य विभाग

**प्रा. ए. एम्. साळोखे** - विभागप्रमुख

# स्टिअरिंग कमिटीची स्थापना



उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन आणि मूल्यांकन हे गुणवत्ता मापनाचे प्रभावी व खात्रीशीर माध्यम आहे. गेल्या ५० वर्षामध्ये भारत देश जगातील उच्च शिक्षण देणाऱ्या देशांपैकी दुसऱ्या क्रमांकाचा उच्च शिक्षण व्यवस्था असणारा देश आहे. शिक्षणदानाचे कार्य करत असताना त्याची गुणवत्ता टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे म्हणूनच यू. जी. सी. ने नविन शैक्षणिक धोरणाची (१९८६) प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी NAAC (National Assessment and Accreditation Council) ची स्थापना १९९४ साली कर्नाटक राज्यातील बेंगलोर येथे केली. या धोरणानुसार यू. जी. सी. ने सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांनी डिसेंबर २००३ पर्यंत आपल्या संस्थांचे मूल्यमापन व मूल्यांकन करून घेणेबाबत सूचित केले आहे. यू. जी. सी. च्या मार्गदर्शनपत्रानुसार व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार आमच्या महाविद्यालयाने ३० जानेवारी २००२ रोजी NAAC ला गुणवत्ता मूल्यमापन व मूल्यांकनासाठी इच्छुक असलेबाबतचे पत्र (Letter of Intention) पाठविले आहे.

हा उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयात स्टिअरिंग कमिटीची स्थापना करण्यात आली. या कमिटीमध्ये सदस्य म्हणून प्रा. श्री. जे. बी. पाटील, प्रा. श्रीमती रेखा पंडित, प्रा. श्रीमती नीता धुमाळ व प्रा. श्रीमती अनघा पाठक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच या उपक्रमांतर्गत विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून सर्व सदस्य विविध उपक्रमांमध्ये कार्यरत आहेत.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून महाविद्यालयामध्ये 'माजी विद्यार्थिनी संघ' स्थापन करण्यात आला व त्यांचा मेळावा रविवार, दि. १७-३-२००२ रोजी मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. मा. प्राचार्यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन या कमिटीस सातत्याने लाभत आहे.

**प्रा. श्री. जे. बी. पाटील**-विभाग प्रमुख

# विद्यार्थिनी कल्याण निधी

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या बऱ्याच विद्यार्थिनी अत्यंत गरीब कुटुंबातील असतात, तर कांही विद्यार्थिनींचे पालक निराधार, बेरोजगार असतात, तर कांही विद्यार्थिनींना पालकच नसतात. अशा होतकरू, प्रामाणिक, गरीब, हुशार विद्यार्थिनींचा शोध घेऊन त्यांना आर्थिक सहकार्य करणे हा महाविद्यालयाचा हेतू आहे. या अनुषंगाने या कामी एक समिती स्थापन केली असून ती समिती अशा विद्यार्थिनींचे अर्ज मागवून घेते व त्यांची मुलाखत घेऊन योग्य विद्यार्थिनींची ''विद्यार्थिनी कल्याण निधी''साठी निवड केली जाते. केलेला आर्थिक पुरवठा याचा विनियोग विद्यार्थिनी बस पासेस, पुस्तके, परीक्षा फी यासाठीच करतात याचे परीक्षण केले जाते. २००१-२००२ सालासाठी २६ विद्यार्थिनींना आर्थिक सहाय्य देण्यात आले. या उपक्रमासाठी मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सल्ला घेण्यात येतो.

**प्रा. ए. एम्. साळोखे** - विभागप्रमुख



ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

● प्राचार्य : **डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील** एम. ए., पीएच्. डी. ●

## ● कला शाखा ●

### मराठी विभाग

| | |
|---|---|
| ◀ श्री. एस. बी. पाटील | एम. ए. बी. एड्. सेट |
| ◀ श्रीमती एस्. एल. देसाई | एम. ए. एम. फिल. बी. एड. |
| ◀ श्री. एच. व्ही. पुजारी | एम. ए. बी. एड. |

### हिंदी विभाग

| | |
|---|---|
| ◀ श्रीमती डॉ. सुमित्रा पोवार | एम. ए. बी. एड्. पीएच. डी. |
| ◀ श्रीमती डॉ. बी. व्ही. शेळके | एम. ए. एम्. फिल. डी. एच. ई., पीएच. डी. |
| ◀ श्रीमती के. एस. पाटील | एम. ए. बी. एड. |

### इंग्रजी विभाग

| | |
|---|---|
| ◀ श्री. जे. बी. पाटील | एम. ए. एम्. फिल. |
| ◀ श्रीमती एस्. आर. साळुंखे | एम. ए. एम्. फिल. |
| ◀ श्रीमती एन. एस्. धुमाळ | एम. ए. एम. फिल |
| ◀ श्री. एस. एन. कोळेकर (उपप्राचार्य) | एम. ए. बी. एड. |
| ◀ श्रीमती एम. एस्. पवार | एम. ए. एम. फिल. बी. एड्. |
| ◀ श्रीमती जे. एल. देशपांडे | एम. ए. बी. एड्. |

### समाजशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◀ श्री. टी. एस्. थोरात | एम. ए. एम. फिल. |
| ◀ श्री. ए. एम. साळोखे | एम. ए. |
| ◀ श्रीमती एम. व्ही. घोटणे | एम. ए. डी. एच. ई. |



### अर्थशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◂ श्रीमती टी. बी. मुडेकर | एम. ए. |
| ◂ श्रीमती ए. व्ही. पाठक | एम. ए. एम. फिल. |
| ◂ श्री. एन. व्ही. पोवार | एम. ए. एम. फिल., बी. एड. |
| ◂ श्रीमती आर. व्ही. आंबवडे | एम. ए. एम. फिल., बी. एड. |
| ◂ श्रीमती आर. पी. प्रधान | एम. ए. बी. एड. |

### गृहशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◂ श्रीमती आर. डी. पंडित | एम. एस्सी. एम. फिल. |
| ◂ श्रीमती व्ही. पी. साठे | एम. एस्सी., एम. फिल. |
| ◂ श्रीमती के. के. बागवे | एम. ए. बी. एड. |

### मानसशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◂ श्री. ए. एस. घस्ते | एम. ए. बी. एड. |
| ◂ श्रीमती एल. टी. मगदूम | एम. ए. बी. एड. |

### इतिहास विभाग

| | |
|---|---|
| ◂ श्री. एन. एस. शिरोळकर | एम. ए. एम. फिल. |
| ◂ श्रीमती एस. एस. पाटील | एम. ए. एम. पी. एड्. |

### राज्यशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◂ श्री. डी. ए. पाटील | एम. ए. बी. एड. |

### शारीरिक शिक्षण संचालिका

| | |
|---|---|
| ◂ श्रीमती एस. एम. काळे | एम. ए. एम. पी. एड. |
| ◂ श्रीमती एस. एस. पाटील | एम. ए. एम. पी. एड. |

### ग्रंथालय विभाग

| | |
|---|---|
| ◂ श्री. जे. पी. जाधव<br>ग्रंथपाल | एम. ए. एल. एल. बी. |



## • वाणिज्य विभाग •

| | |
|---|---|
| ◀ श्री. एस. व्ही. बागल | एम. कॉम. डी. एच. ई. |
| ◀ श्रीमती व्ही. व्ही. मैंदर्गी | एम. कॉम., एम. फिल. |
| ◀ श्री. ए. एल. नरके | एम. कॉम. एम. फिल., डी. एच. ई. |
| ◀ श्रीमती यु. डी. इंदुलकर | एम. कॉम., डी. एच. ई. |
| ◀ श्रीमती एम. आर. शिंदे | एम. कॉम. (कॉस्टिंग) एम. कॉम. (इंडस्ट्रियल अॅड बिझिनेस अॅड.) एम. फिल., बी. एड. |
| ◀ श्री. पी. ए. गोखले | एम. कॉम., सी. ए. |
| ◀ श्रीमती एम्. एस्. पाटील | बी. ए. (ऑनर्स), एलएल.बी., (स्पेशल) एल. एल. एम. |
| ◀ श्री. ए. एन. बसुगडे | एम. एस्सी. |
| ◀ श्री. एम. ए. लोहार | एम. कॉम., एम. फिल., जी.डी.सी. अॅंड ए., आर. जे. सी. |

## • व्यवसायाभिमुख विभाग •

| | |
|---|---|
| ◀ श्री. ए. जी. गोसावी, लघुलेखन निर्देशक | बी. ए. जी. सी. सी. |
| ◀ श्रीमती सुहासिनी साटम, टंकलेखन निर्देशक | बी. ए. जी. सी. सी. |
| ◀ श्री. व्ही. जी. कुलकर्णी, अधिव्याख्याता | एफ. ए. सी. एस. |

## • विज्ञान विभाग •

| | |
|---|---|
| ◀ श्री. ए. एस्. जाधव | एम. एस्सी., डी. एच. ई. |
| ◀ श्रीमती एस. ए. पाटील | एम. एस्सी., डी. एच्. ई. बी. एड्. |
| ◀ श्रीमती ए. ए. रांगणेकर | एम. एस्सी., डी. एच. ई. |
| ◀ श्री. पी. एस. जाधव | एम. एस्सी., बी. एड. |
| ◀ श्रीमती एस्. डी. नांद्रेकर | एम. एस्सी., बी. एड्. |
| ◀ श्रीमती आर. एन. मोटे | एम. एस्सी., बी. एड्., एम. एड. |
| ◀ श्री. एम. एन. जाधव | एम. एस्सी., बी.एड्. |
| ◀ श्रीमती एस. आर. दंडगे | एम. एस्सी. बी. एड्. |

## • माहिती व तंत्रज्ञान विभाग •

| | |
|---|---|
| ◀ श्रीमती एम. आर. रानडे | बी. एस. सी., एम. सी. एम. |

## • संगणक विभाग •

| | |
|---|---|
| ◀ श्रीमती एस. पी. वायचळ | बी. एस्सी., एम. सी. एम. |



## • शिक्षकेतर कर्मचारी •

| | | |
|---|---|---|
| ◀ श्री. एम. व्ही. शिंदे | अधिक्षक | बी. ए. |
| ◀ श्री. बी. डी. सुतार | मुख्य लिपिक | एल. डी. सी. |
| ◀ श्री. पी. आर. पाटील | वरिष्ठ लिपिक | बी. कॉम. |
| ◀ श्री. व्ही. डी. निचिते | वरिष्ठ लिपिक | बी. एस्सी. |
| ◀ श्रीमती यू. पी. शिराळकर | कनिष्ठ लिपिक | |
| ◀ श्री. एस. बी. शिंदे (भोई) | कनिष्ठ लिपिक | बी. ए. |
| ◀ श्री. आर. व्ही. इंगवले | कनिष्ठ लिपिक | बी. कॉम. |
| ◀ श्री. टी. एल. कांबळे | कनिष्ठ लिपिक | बी. कॉम. |
| ◀ श्री. पी. एम. सावंत | लघु टंकलेखक | बी. कॉम. |
| ◀ श्री. एम. जी. कंग्राळकर | कनिष्ठ लिपिक | बी. एस्सी. |
| ◀ श्री. सी. बी. ठाकुर | प्रयोगशाळा सहाय्यक | बी. ए. |
| ◀ श्री. व्ही. एम. चिमणे | ग्रंथालय परिचर | बी. ए. |
| ◀ श्री. व्ही. एस. मोटे | ग्रंथालय परिचर | |
| ◀ श्री. सी. एम. स्वामी | ग्रंथालय परिचर | |
| ◀ श्री. एम. एच. संकपाळ | ग्रंथालय परिचर | |
| ◀ श्री. ए. जी. शिगावे | प्रयोगशाळा परिचर | |
| ◀ श्री. डी. जी. काटकर | प्रयोगशाळा परिचर | |
| ◀ श्री. जी. एन. बेटक्याळे | प्रयोगशाळा परिचर | |
| ◀ श्री. वाय. बी. निवळे | प्रयोगशाळा परिचर | |
| ◀ श्री. एम. जी. मोरे | प्रयोगशाळा परिचर | |
| ◀ श्री. एस. एस्. शेळके | ग्रंथालय परिचर | |
| ◀ श्री. डी. बी. कोले | सेवक | |
| ◀ श्री. जी. एम. मेथे | सेवक | |
| ◀ श्री. एस. एस. सनगर | सेवक | |
| ◀ श्री. आर. आर. भरमकर | सेवक | |

''निर्मातुं शिवम् सुंदरम्''

# ताराराणी विद्यापीठ

# कमला हेल्थ क्लब, कोल्हापूर

## करवीर नगरीतील महिला विश्वाचे भूषण

करवीरनगरीतील विद्यार्थिनी व महिला यांच्या शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा इत्यादी विकासासाठी तारांराणी विद्यापीठ अविरत सेवारत असणारी एकमेव शिक्षण संस्था आहे.

महिलावर्गाची शारिरीक सुदृढता व मानसिक उत्साह वाढविण्यासाठी आता आम्ही 'कमला हेल्थ क्लब' हा नवीन उपक्रम हाती घेत आहोत. महिलांना आपला फुरसतीचा वेळ सत्कारणी लावून निरामय आनंद व आरोग्यपूर्ण जीवनाचा लाभ मिळविण्याची सुवर्णसंधी प्राप्त होत आहे.

'कमला हेल्थ क्लब' आपल्या अनेक शारिरीक तक्रारींवरील रामबाण उपाय ठरणार आहे. कारण व्यायामाची नियमित सवय हेच जगातील एकमेव उत्कृष्ट औषध आहे.

आजच 'कमला हेल्थ क्लब' च्या स्वास्थ्यप्रेमी सभासद व्हा आणि नवी शक्ती, नवी स्फूर्ती, नवा आनंदपूर्ण जोम आपल्या जीवनात निर्माण करा व ते ही माफक फीमध्ये.

'कमला हेल्थ क्लब' ही कोल्हापूर शहराची शानही आहे काळाची गरजही आहे.

'कमला हेल्थ क्लब'ला पर्याय नाही. सभासद नोंदणी सुरू आहे.

**कमला हेल्थ क्लबची वेळ**

**सकाळी ६.३० ते १०.३० ◆ दुपारी ३.३० ते ५.३०**

## ◆ आमची खास वैशिष्ट्ये ◆

- योग्य प्रकारच्या शारिरीक व्यायामासाठी आधुनिक साहित्याची सुसज्जता, योगासन व अेरोबिक्सची सुविधा.
- तज्ज्ञ डॉक्टर्स व व्यायामतज्ज्ञांचे वैयक्तिक मार्गदर्शन व मोफत सल्ला.
- उपकरणांच्या हाताळण्यासंबंधी तंत्रांचे शिक्षण.
- जिम्नॅशियमच्या शास्त्रीय पध्दतीच्या साधनांमुळे नवा जोम, नव्या शक्तीचा खात्रीलायक लाभ.
- अवास्तव चरबी कमी करण्याची खात्री.
- कांतीच्या तजेलदारपणाची निश्चित प्राप्ती.
- मन व शरीर यांना शिस्त व सुखाचा निश्चित लाभ.

**नांव नोंदणी व इतर माहितीसाठी**

**कमला कॉलेज कार्यालय, कोल्हापूर. फोन : ५२२२१६**

ताराराणी विद्यापीठ

# कमला कॉलेज, कोल्हापूर

## संगणक प्रशिक्षण केंद्र



नव्या सहस्रकात संगणक साक्षरता ही काळाची गरज आहे म्हणून आम्ही यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मान्यताप्राप्त संगणक प्रशिक्षण केंद्र आमच्या महाविद्यालयात कार्यरत केले आहे. आमच्या या केंद्राची वैशिष्ट्ये

◀ विद्यार्थिनींना महाविद्यालयाच्या परिसरातच प्रशिक्षणाची सुविधा.

◀ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे खालील प्रमाणपत्र, पदविका कोर्स शिकविण्याची सोय.

१. सर्टिफिकेट इन ऑफिस कॉम्प्युटिंग ........................................ ६ महिने

२. सर्टिफिकेट इन कॉम्प्युटराईज्ड फायनानशियल अकौंटिंग ................ ६ महिने

३. डिप्लोमा इन ऑफिस कॉम्प्युटिंग ............................................ ६ महिने

४. डिप्लोमा इन कॉम्प्युटराईज्ड फायनानशियल अकौंटिंग .................. एक वर्ष

५. डिप्लोमा इन कॉम्प्युटर ऑपरेशन्स ........................................ एक वर्ष

◀ माफक फी मध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध

◀ सुसज्ज प्रयोगशाळा आणि ग्रंथालय

◀ अनुभवी आणि उच्च विद्या विभुषित असा अध्यापक वर्ग

◀ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने निर्धारित केलेल्या फी मध्ये प्रशिक्षण.

◀ महाविद्यालयातील व महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थिनी आणि महिलांसाठी प्रवेश खुला.

◀ मर्यादित प्रवेश असल्यामुळे मार्च २००२ मधील बॅचसाठी त्वरीत नोंदणी करा. प्रवेशासाठी केंद्र समन्वयक प्रा. श्री. एन् व्ही. पोवार (अर्थशास्त्र विभाग) व संगणक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

केंद्र प्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मान्यताप्राप्त
संगणक प्रशिक्षण केंद्र,
कमला कॉलेज, कोल्हापूर.




**"कौतुक सोहळा"**

वार्षिक पारितोषिक
वितरण समारंभप्रसंगी
मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील
विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना.

**फूड फेस्टिव्हल**

फूड फेस्टिव्हलची
पाहणी करताना मा. प्राचार्य
व प्राध्यापक वर्ग





**व्हरायटी शो!**

मंत्रमुग्ध विद्यार्थीनी

स्थापना: सन १९८४ ॥ निर्मातुं शिवं सुंदरम्॥ फोन : ५२२२१६

# ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

**संस्थापक- अध्यक्ष : कै. डॉ. व्ही. टी. पाटील**



**शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाची सोय. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाय्याने वाणिज्य शाखेच्या पदवी विभागाकडे ऑफिस मॅनेजमेंट व सेक्रेटरीयल प्रॅक्टिस या व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाची सोय आहे. तसेच ११ वी १२ वी कला. वाणिज्य व विज्ञान शाखेचे वर्गही या महाविद्यालयात सुरू आहे.**

## वैशिष्ट्ये

- विद्यार्थिनींच्या विकासाला अनुकूल व पोषक असे संपूर्णतः सुरक्षित वातावरण.
- अभ्यासाबरोबरच ललित कला, क्रीडा, वाङ्मय इ. क्षेत्रातील गुणांना प्रोत्साहन.
- उत्कृष्ट वसतिगृहाची सोय. केंद्र सरकारच्या वसतिगृह सुधार योजनेखाली इ. ११ वी १२ वी च्या हुशार होतकरू निवडक विद्यार्थिनींना मोफत भोजन सुविधा
- ताराराणी विद्यापीठ स्कॉलरशिप फंडातून प्रत्येक वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या व इतर क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थिनींना पारितोषिके
- एच्. एस्. सी. व शिवाजी विद्यापीठ परीक्षेतील उज्ज्वल यशाची परंपरा.
- १२ वी साठी उन्हाळी सुट्टीत इंग्रजी, अकौंटन्सी व विज्ञान विषयांचे खास वर्ग.
- १२ वी च्या हुशार विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्कॉलर बॅच व दर्जेदार मार्गदर्शनाची सोय.
- बी. ए. भाग ३ साठी इंग्रजी, अर्थशास्त्र, गृहशास्त्र, समाजशास्त्र व हिंदी, बी. कॉम. भाग ३ साठी ॲडव्हान्स अकौंटिंग ॲंड ऑडिटिंग व इंडस्ट्रियल मॅनेगमेंट या विषयांची सोय. कॉमर्स शाखेतील ज्युनियर व सिनियर वर्गांना इंग्रजी माध्यमातून शिकविण्याची सोय.
- वर्षभर अभ्यासासाठी क्रमिक पुस्तकांचा संच बुक बँकेतून देण्याची सोय.
- गरीब व होतकरू विद्यार्थिनींना सर्व प्रकारचे सहाय्य.
- शिवाजी विद्यापीठ निरंतर शिक्षण योजनेतंर्गत फूड प्रिझर्व्हेशन, बेकरी कन्फेक्शनरी, ड्रेस डिझायनिंग व ज्युदो कराटेचे अल्प मुदतीचे कोर्सेस चालविले जातात.
- महिलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी कमला हेल्थ ची स्थापना
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संगणक प्रशिक्षण केंद्राची स्थापना.
- कॉमर्स विभागाकडे इंग्रजी माध्यमाची सोय.

राजहंस प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर. फोन : ६६६३६०